REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला रविवार ता० ३ माहे सप्तंबर सन १८७६ इ० अंक ३६

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचें अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

## नोटिस

### जलम आणि खामगाव स्टेट रेलवे.

लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावे कीं जी. आय. पी. रेलवेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासेंजर ( उतार करू ) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास ................... १ रुपया
नेटिव लोक .... ............... ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

घाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोचविण्याचा खर्चही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.

## जाहिरात

IN THE PRESS
THE CODE OF CIVIL PROCEDURE
Acts VIII of 1859 & XXIII of 1861. With Decisions contained in the Bombay High Court and in the Indian Law Reports.

Understanding that the want of this book in English is much felt by the candidates for the Offices of Pleader and Subordinate Judge, we have undertaken the publication of it. It will be ready at the beginning of September next. The price of the book will be Rs. 2--8 besides postage for those who subscribe their names before the end of August next and Rs. 3 afterwards exclusive of postage. Letters should be addressed to the undersigned or to the Manager of the "Dnyan Chaxu."

GUNGADHUR VISHNOO LIMAYE
Pleader,
Residing in Shunwar Peit
Poona.
PANDURANG BACHAJEE
Pleader,
Shanwar Peit Poona near
Panjrapole,

Poona
17th July 1876

## नोटिस.

पंढरी वल्लद विटोबा पाटील मौजे पासुर्डे तालुके जळगाव यांस लक्षुमण वल्लद गोबाजी दभाडे पाटील रहाणार सोनाळ तालुके जळगाव जिल्हे अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं माझी पुतणी नामे पार्वती ही तुह्मास लग्नानीं दिली असतां ४ वर्षांपासून माझे एथें आहे तर तुह्मी तिला घेऊन जावे अगर तिचे अन्न वस्त्राबद्दल ४ वर्षांचा पैसा २०० रुपये नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत द्यावा अगर तिची फारकती द्यावी हें सर्व काम तुह्मी न केलें तर तुह्मावर फिर्याद करून रुपये घेतले जातील आणि तुह्मी पूर्वी फारकती दिली ही बरोबर नाहीं सबब नोटिसीनें कळविलें आहे. कळावें तारीख १६ आगष्ट सन १८७६ इसवी.

( सही ) लक्षुमण वल्लद गोबाजी दभाडे निशाणी रेघ

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि० वि० आपले महाराष्ट्र देशांत पंडित दयानंद सरस्वती ह्मणून विख्यात व्यक्ति आले होते त्यांविषयीं आपले वाचकांस पुष्कळ ठाऊक आहेच. ते वेदाचे अर्थ करीत होते व त्यांच्या विद्वत्तेविषयीं मोठी ख्याति होती. वेदांत मूर्तिपूजा नाहीं ह्मणून ते प्रतिपादन करीत व कोणी वादास सिद्ध व्हावें अशी इच्छा धरीत, हेंही आपणास ठाऊक आहेच. पण विद्वत्तेविषयीं साऱ्या हिंदुस्थानांत आदिपीठ जें श्री काशीक्षेत्र तिकडे या पंडित महाराजांची कशी काय लायकी आहे तें आपल्या वाचकांस कळावें ह्मणून मी' कविवचनसुधा' या नावाचें तिकडील वर्तमानपत्र घेत असतों त्यांत गेल्या महिन्यांत एक जाहिरखबर प्रसिद्ध झाली आहे तिचें भाषांतर करून या सोबत पाठविलें आहे. मर्जीनुरूप प्रसिद्ध व्हावें. कळावें ही विनंती.

उमरावती

आपला एक वर्गणीदार.

### जाहिरखबर.

दयानंदानें शहरांत एक जाहिरखबर दिली आहे, त्यास सर्व लोकांना असें विदित व्हावें कीं तो मनुष्य महाप्रतारक, धूर्त शिरोमणि, वितंडवादी, आणि जगत्प्रवंचक आहे. याचे बोलण्याचें कांहीं प्रमाण नाहीं. प्रथम. यानें दिल्ली एथें एक जाहिरखबर छापिली तींत असें प्रसिद्ध केलें कीं श्रीमद्भागवत १८ पुराणांच्या अंतर्गत नाहीं. त्या वेळेस यानें दुसऱ्या पुराणांस आर्ष मानिलें होतें, तदनंतर यानें काशीमध्यें येऊन प्रथम जें पत्र प्रचार केलें त्यांत त्यानें सर्व पुराणांस अनार्ष मानिलें! आतां पहा. हें कसें पाखंड आहे कीं, ज्या वस्तूला त्यानें पहिल्यानें आर्ष मानिलें होतें त्याला नंतर अनार्ष मानिलें. नंतर त्यानें दुसरें पत्र गप्पाष्टकाच्या नावानें काशीमध्यें छापून त्यांत २४ अगर ३२ ग्रंथांचा आधार मानला. नंतर तिसऱ्या जाहिरखबरींत सर्वांना अप्रमाण केलें. पहिल्यानें हा दिगंबर व नंतर लंगोटी बांधणारा होता व फलहार मात्र लोकांच्या हातचा करीत असे. पुढें जेव्हां पूर्वेकडून आला तेव्हां यानें लाब व सैल असें धोतर आणि सर्वांच्या हातची पुरी कचोरी परंच वरण भातही खाऊं लागला. नंतर जेव्हां मुंबईस गेला तेव्हां तर यानें कोट पाटलून धारण केलें. याचे मताला ठिकाण कांहीं नाहीं. हा ज्या गोष्टीचें आज पतिपादन करितो त्याच गोष्टीचें उद्या खंडन करितो. अक्षरांचा अर्थ प्रकृति व सहज अर्थ सोडून आपला मनःकल्पित अर्थ करितो. पहिल्यानें हा केवळ संस्कृत बोलत होता पण आतां देशभाषेंतही बोलूं लागला. वादविवाद करण्याचें याचे हें धोरण आहे कीं आपलें एकही मत स्थापन करीत नाहीं व दुसऱ्याच्या मताचें खंडन करूं लागतो. व जेव्हां एकाद्या गोष्टीचें उत्तर येत नाहीं तेव्हां मोठ्यानें हसून किंवा गलबा करून त्या गोष्टीस उडवून देतो. अथवा ( शेषं कोपेनपूरयेत्" याप्रमाणें करून देतो. ज्या ग्रंथांना हा प्रमाण मानतो त्यांतच जर एखादें वाक्य त्याच्या विरुद्ध निघालें तर असें सांगतो कीं हें वाक्य क्षेपक आहे. 'गोड गोड गप्प, कडू कडू थू' एकाच ग्रंथांत जें याच्या प्रमाणाचें आहे तें खरें व बाकीचें खोटें आहे असें ह्मणतो. त्र्यंबक शब्दाचा अर्थ तीन डोळयाचा असा असतां तो सोडून त्रिगुण विभूतिसंपन्न आहे असें सांगतो.

दूषण मालिकेंतले जे याला ६४ प्रश्न केले होते त्यांचीं उत्तरें अजून यानें दिलीं नाहींत. याप्रमाणेंच याला कधीं कोणी लेखी प्रश्न करितो त्याचें उत्तर हा देत नाहीं. कारण याला ठाऊक आहे कीं लिहिण्यानें याचें सगळें उघडें पडेल. ईश्वराचें अस्तित्वाचें जर याला प्रमाण विच्यारिलें तर प्रश्नकारास नास्तिक असें ठरवितो. कारण कीं उत्तर देउच शकत नाहीं. ज्या मनुष्यांनीं फक्त वेदाचें नांवच ऐकिलें आहे परंतु ते कसे झाले हें स्वप्नींही माहित नाहीं व इंग्रजी ज्ञानलवाच्या थेंबानें ज्यांचें अंग दुर्विदग्ध होत आहे असे जे लोक ते स्वयं संस्कृत ग्रंथांत अनभिज्ञ असल्यानें सत्यासत्याच्या अनुशासनास असमर्थ होऊन याच्या ( दयानंदाच्या ) लांब लांब गोष्टी व श्रुति प्रमाण मानून मोहित होत्साते असें जाणतात कीं यानें चतुर्वेदांचा सिद्धांत काढून घेतला आहे.

याजकरितां सर्व लोकांस व दयानंदास असें विदित व्हावें कीं आह्मी मूर्तिपूजनावर शास्त्रार्थ सांगण्यास प्रवृत्त आहों. जे प्रश्न आह्मी छापूं त्यांचीं उत्तरें त्यानें द्यावीं व जे ते छापतील त्यांचीं आह्मी उत्तरें देऊं. या वादविवादाविषयीं आह्मी" कविवचन सुधां" नामक पत्राचे मालक बाबू हरिश्चंद्र यांस विनंती करून त्यांची आज्ञा घेतली आहे कीं दोघां पक्षांचें उत्तर प्रत्युत्तर ते आपल्या पत्रांत निःपक्षपातानें छापतील. दयानंद किंवा त्याचे मतापैकीं ज्याला पांडित्याचा अभिमान अथवा आपल्या मताचें संस्थापन करणें असेल त्यानें या कागदाच्या मैदानांत यावें व आपलें पांडित्य सर्व लहान मोठ्यांना प्रकट करून दाखवावें. नंतर कोणीही मनुष्यानें असें ह्मणूं नये कीं दयानंदाच्या प्रश्नाचें कोणी उत्तर दिलें नाहीं. ज्याला कांहीं लिहिणें असेल त्यानें बिनहरकत लिहून कविवचन सुधेच्या मालकाच्या जवळ पाठवून द्यावें.

आतां आह्मी दोन प्रश्न करितों त्यांचीं उत्तरें दयानंद किंवा त्याचे मतानुयायी यानीं एका महिन्यांत द्यावीं. नाहीं तर आह्मी असें समजूं कीं त्या लोकांना उत्तर येत नाहीं व हार मानून उगीच राहिले.

[ प्रश्न १ ] --वेद सूत्र महाभारत इत्यादि ग्रंथ ज्यानां तुह्मी प्रमाणभूत असें समजता त्यांचे आधारभूत होण्यास कोणती युक्ति आहे?

( प्रश्न २ ) —या ग्रंथांमध्यें ज्या वाक्यांना तुह्मी अप्रमाण मानता वा ज्यांचा अर्थ तुह्मी पालटता त्यांचा तुमचाच केलेला अर्थ खरा आहे व आमचा नाहीं असें ह्मणण्याची युक्ति सांगा व जे भगवान व्यास देवानें एखाद्या विशेष आकाशवाणीद्वारा

हें वाक्य आमचे केलेलें व अमुक आमचें नाहीं. असें सांगितलें असेल तर तेंही सांगा?

विशेष या दोन प्रश्नांचीं उत्तरें मिळाल्या नंतर.

काविवचन सुधा ३ जुलै १८७६

आर्य

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यास:—

वि० वि० पत्रकर्ते महाराज मी आपणाकडे च्यार ओळी पाठविल्या आहेत त्यांचा आव्हेर न करितां येत्या अंकीं जागा द्याल अशी पूर्ण आशा बाळगून आहे.

मौजे जळगावनाटें हा गांव अकोट तालुक्याचे पश्चिमेस दोन कोसांवर आहे. गांव खेडें असून झाडोण फार असले कारणानें फार सुशोभित दिसतो आणि बागाईत असले कारणानें लोक फार सुखी आहेत. एकंदरीनें पहातां फार देखणा गांव आहे. येथें मुख्य जाति दोन आहेत माळी व कुणबी. पाटील दोन आहेत हे आपले कामांत फार हुशार आहेत गावाचा बंदोबस्त फार उत्तम रीतीनें ठेविला आहे. आणि रयतेस लेकराप्रमाणें बाळगितात. या गावीं मास्तर असला तर फार चांगलें होईल.

सदर्हू गांवीं एका माळ्याचा मुलगा बाळपणापासून अवलिया आहे. लक्षांत येईल तिकडे फिरतो आणि एका वटाचे वृक्षावर लघवी करितो कदाचित् दोन प्रहर रात्र जरी झाली असली तरी लघवी त्या झाडाशिवाय करीत नाहीं. त्यास सर्व लोक देवाप्रमाणें मानितात. आणि तो गावांतील लोकाचे नवसासही पावतो आणि पुष्कळ दूरदूरचे नवस येतात. तो कोणाशी बोलत नाहीं. मोठे मोठे वृक्षावर चढतो आणि तिकडून कोणी मनुष्य आला तर त्या झाडावरून खालीं कुदी मारून पडतो. मग झाड कितीही उंच असो. या गावांत एक ताडाचा वृक्ष होता तो सरकारी कामाकरितां तहशिलदार साहेबाचे हुकुमावरून अकोटास नेला त्याची उंची सुमारें ६०।७० हात होती आणि चोपडाही फार होता कधी हात जर लाविला तर निसरे पण हा अवलिया त्या झाडावर चढून वर त्याचे शेंड्यावर बसे. एके दिवशीं हा झाडावर बसला असतां तिकडून याचा भाऊ आला तर हा वरून खालीं कुदी मारून पळून गेला. अशा अनेक गोष्टी याचेकडून घडतात. सर्व लिहित बसलों तर पत्र विस्तार फार होईल. गावांत गढी आहे तिचे पश्चिमेचे बुरजावर जर तो गेला तर आग लागून सर्व गाव जळून जातो. या गावीं नरसिंग बावा साधु अकोटकर यांचें घर आहे. येथील लोक त्यांस नमीत नाहींत. त्यास दोन मुलें आहेत.

पाणी या सालांत अगदी थोडें आहे. इकडे पुष्य व आश्लेषा दोन नक्षत्रांचें पाणी अगदी आलें नाहीं. ढग आकाशांत इतकी गर्दी करितात कीं जणू आतांच सगळी अवनी जळमय करून देतात परंतु कांहीं अवकाशानें निरभ्र होऊन भानुराज सगळे तेजानें प्रकाशतो. तेणेंकरून सर्व लोकांचें लक्ष मेघराजाकडे च्यातक पक्षाप्रमाणें लागलें आहे. पशु पक्षी देखील मेघरायाची मार्गप्रतीक्षा करितात. आगाइतेऊन धरितात, धान्याचा भाव दिवसेंदिवस चढत चालला आहे, रोगराई कांहीं नाहीं अवकाशानुसार बातमी लिहित जाईन. अस्तु. पत्र विस्तार फार झाला करितां पुरें करितों. कळावें तारीख ११ माहे अगष्ट सन १८७६ इसवी.

आपला हितेच्छु

प्रे.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १५ शके १७९८.

## वऱ्हाडांतील जंगलखातें.

वऱ्हाड प्रांत लहान असून चांगला सुपीक आहे. तरी यांत जंगलही पुष्कळ आहे. त्यांत राखलेलें व न राखलेलें असे २ भाग आहेत. राखलेले जंगलांत उत्तर भागांत विराटगड नावाचें ४०० चौरस मैलाचें जंगल आहे. व दक्षिण भागांत गेरूमाटरगाव ७३ मैल, केळापुर ५० मैल, घाटबोरी ५० मैल, किनवटकोरट ८३ मैल, पेणगंगा १८ मैल व किरकोळ १ मैल मिळून २६१ चौरस मैलाची बेरीज आहे. व न राखलेल्याची बेरीज ३७७७ चौरस मैल आहे. जंगलखात्यापासून सरकारास उत्पन्न काय आहे व खर्च काय आहे याची दोन वर्षांची माहिती पुढें लिहिल्याप्रमाणें:—

| सन | उत्पन्न | खर्च |
|---|---|---|
| १८७३।७४ | २६११४७ | ८५४६० |
| १८७४।७५ | २६०६२२ | ९०७७७ |

यावरून दिसतें कीं सरकारास या खात्यापासून निवळ फायदा सालीना १॥। लक्ष रुपयांचा आहे व आज हें खातें बाल्यस्थितींत आहे तें उत्तरोत्तर सुधारून उत्पन्न वाढत जाणार आहे.

प्रस्तुत या खात्याकडे एक डिपुटी कान्सरवेटर ५०० रुपये पगार व १०० रुपये अलोवेन्सचा युरोपियन आफिसर आहे. त्याचे हाताखालीं एक असिस्टंट व सबअसिस्टंट असे दोन आफिसर अडीचशें व तीनशें रुपये पगाराचे युरोपियन आहेत. शिवाय नेटिव्ह दरोगे ८ त्यांस १००, ८०, ६०, ५० असे चार प्रतीचे पगार आहेत, एक इन्स्पेक्टर ५० रुपयांचा आहे व ती जागा १२० रुपयांची होणार आहे.

जंगलास वणवा लागतो व त्यापासून त्याचें नुकसान होतें तें होऊं नये ह्मणून तजवीज योजिली आहे. सन १८७३ सालीं ३३७२०० एकर जंगलाचें रक्षण केलें व सन १८७४ सालीं ३६४८०० एकराचें रक्षण केलें. त्याकरितां या सालीं १२०६ रुपये खर्च आला. २३३८ एकर जंगलामध्यें नवीन रोपे लावण्याची तजवीज केली तीकरितां १४१० रुपये खर्च आला. याशिवाय त्यांतील तन काढणें गड्डे भरणें याकरितां २५९० रुपये खर्च आला. यांपैकीं १२०० एकरांत सागवान आहे बाकीच्यांत बाभळी, बांबू वगैरे आहेत.

सन १८७३।७४ सालच्या अखेरीस इमारती लाकडाचे डाग जंगलखात्याकडे ३४८९५ शिलक होते, नव्या सालांत २२९०० निघाले मिळून ५७७९५ पैकीं ३३२३८ विकले गेले. व बाकीचे शिलक.

मेळघाट नंबर ३ चा ब्लाक यांतून सागवान वगैरे २१९३८७ डाग बाहेर गेले त्यांची किंमत २५६२९ रुपये होती.

बिन राखलेल्या जंगलांतून लाकडाशिवाय इतर पदार्थांपासून या खात्यास उत्पन्न झालें तें:—

| | रु. |
|---|---|
| सर्पण | ४४४९ |
| चुना | ४८ |
| कोळसा | २६३९ |
| गवत | २१८४ |
| लाख | ४३३ |
| सागाचीं पानें | ४७७ |
| बांबू | १३९६५ |
| ताटया | ३०३ |
| मुळ्या व फळें | ४१०७ |
| डीक | ८३ |
| किरकोळ | २४७ |

जंगलास वणवा न लागू देण्याची तजवीज योजिली तीपासून जे फायदे आहेत त्यांविषयीं गुदस्त सालच्या रिपोर्टांत येणें प्रमाणें लिहिलें आहे.

चांगले वृक्ष वाढावयाचे टेकड्यांवरून आतां गवत कमी कमी होत चाललें आहे व जमीनीचे सपाटीवर पानाचे आणि दुसऱ्या वनस्पतीचे थर जमून व कुजून त्यांचें खत बनत चाललें आहे. उघड्या भागावर थोडें थोडें गवत पुन्हा उगवूं लागलें आहे. व इतर सामान्य झाडांपेक्षां सागाचे वृक्ष त्वरेनें वाढत चालले आहेत. व कांहीं रिकाम्या जागीं नवे रोपे आपोआप उत्पन्न होऊन तें व्यवस्थित रीतीनें लावल्याप्रमाणें सुशोभित दिसत आहेत, व वाढत आहेत. झाडास रोगाचें कोठें नाव नाहीं.

हे जंगलांतील वृक्षसंबंधानें फायदे झाले याशिवाय हवेच्या वगैरे संबंधानें जे फायदे झाले आहेत ते येणेंप्रमाणें:—

१. जंगल राखलें व तें अधिक झालें या संबंधानें हवेंत ओलावा अधिक रहातो व त्या योगानें उन्हाळ्यांत हवा विशेष उष्ण होत नाहीं. व उघड्या प्रदेशावर हिवाळ्या दिवसांत थंडी चांगली पडते.

२. थोडे वर्षांमागें राखल्या जंगलांत पाणी नसे तें आतां जागजागीं विपुल सापडतें. मागें फेब्रुवारी महिन्यापुढें मोठे प्रवाहाचे ओढे खेरीज करून कोठेंही पाणी मिळत नसे पण आतां उष्ण काळांतही लहान सहान ओढ्यांत देखील थोडें बहुत पाणी आढळतें.

३. सिप्रा, काप्रा, कांडू या नद्यांस दरसाल बरसात सुरू होतांच अकस्मात पूर येत असत ते सन १८७१ सालापासून उशिरानें येऊं लागले आहेत व त्यांपासून दगे फटके कमी होऊं लागले आहेत. कारण वर्षास न जळाल्यामुळें वाढत असलेल्या भूपृष्ठावरील वनस्पति आपलेकडे ओलावा प्रथम ओढून घेतात व याविषयीं चांगलीं खात्रीचीं प्रमाणें बांधण्याकरितां हवा मोजण्याचें, पर्जन्य मोजण्याचें, पाणी मोजण्याचें व जमीनींतील ओलावा मोजण्याचें अशीं यंत्रें मागविलीं आहेत. तीं आल्यावर या गोष्टी विशेष स्पष्ट होतील.

४. पर्जन्यकाळ लागला ह्मणजे गुरें मरत असत त्यांची संख्या आतां राखलेल्या जंगलाच्या प्रदेशांत पुष्कळ कमी झाली आहे व गुरें हल्लीं चांगल्या स्थितींत आहेत. जाळलेल्या जंगलांतील नवीन उगवणारे कोंवळे तृणांकुर जनावरें जसे गपगपा खातात तसे राखलेल्या जंगलांतील खात नाहींत. राखलेल्या जंगलांत ओल्या गवताबरोबर वाळलेलेंही गवत असतें व त्यालाही पावसाळ्यांत शेंडे फटत असतात तेणेंकरून वाळलेंही गवत त्यांचे पोटांत जातें व त्या योगानें त्यांस कांहीं उपद्रव होत नाहीं.

सदरीं लिहिल्याप्रमाणें जंगलें राखल्यापासून फायदे आहेत त्याचप्रमाणे एक दोन तोटे आहेत त्यांचे निवारणाविषयीं तजवीज निघाली पाहिजे. एक तोटा हा आहे कीं त्या जंगलांतील हवा रोगी होते व मनुष्यें आजारी पडतात. व दुसरा तोटा हा आहे कीं जंगल न जाळिल्यानें उंदीर मनस्वी होऊन ते नवीन रोपाची नासाडी करितात.

---

## चंद्रग्रहण व केरोपंती पंचांग.

आज रात्रौ चंद्रग्रहण आहे तें केरोपंती पंचांगाप्रमाणें ४८ घटिका २२ पळें ह्मणजे रात्रौ बारावर एक वाजून सात मिनिटांनीं लागेल व तीन वाजून २१ मिनिटांनीं सुटेल. एरवीच्या पंचांगांत या ग्रहणास आरंभ १२ वाजून ५० मिनिटांनीं व मोक्ष २ वाजून १५ मिनिटांनीं लिहिला आहे. ह्मणजे दोहोंत सुमार एका तासाचा फरक आहे तेव्हां कोणतें पंचांग खरें याचा प्रत्यय पहाण्यास ही चांगली संधी आहे. व याप्रमाणें बहुत वेळा ग्रहणाचे व ग्रहांचे अस्तोदयाचे प्रसंगीं केरोपंती पंचांग खरें व जुन्या गणिताचें खोटें अशी प्रचीति आलेली आहे. तरी जुनें वेड अजून मोडत नाहीं. दानधर्मास व इतर धर्मकृत्यास खरी वेळ समजणें अत्यंत अवश्यक आहे याजकरितां लोकांनीं दरसाल केरोपंती पंचांगाचा संग्रह करावा हें आह्मास योग्य वाटतें. देशी कारागिरी व परदेशी कारागिरी असा यांत आवड नावड करण्याजोगा कांहीं भेद नाहीं. केरोपंत कोणी युरोपियन नाहींत ते छत्रे उपनावाचे कोंकणस्थ ब्राह्मण धर्मशील, पापभीरु व सत्यासत्यविवेचक असे भले गृहस्थ आहेत. ते गणित विद्येंत व शा-

स्त्रीय विषयांत फार प्रवीण आहेत. त्यांनीं आपले ज्योतिष ग्रंथ पाहून व इंग्रजांचे पाहून चुका सुधारल्या आहेत व दुर्बिणीनें ग्रहांचे वेळोवेळ वेध घेतले आहेत व या कामाचीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. कोणी ही या गोष्टी संबंधी त्यांस शंका विच्यारल्यास ते यथास्थित रीतीनें त्यांचें समाधान करणारे आहेत व ३० वर्षे त्यांनीं सतत् परिश्रम करून हें काम एथपर्यंत आणिले आहे व पुढेंही त्यांचा नित्य व्यासंग चालू आहे. शिवाय इतर गावभटाप्रमाणें किंवा जोशी धर्माधिकाऱ्याप्रमाणें आपलें पाताडें पुढें करून दिनचर्येकारितां त्यांस तांदूळ मिळवावयाचे आहेत असें नाहीं. ईश्वर कृपेनें त्यांस डेकन कालेजांत हजार बाराशें रुपये पगार आहे. तेव्हां त्यांचें पंचांग लोकांचे प्रचारांत सर्वत्र यावें ह्मणून आह्मी जी शिफारस करितों ती त्यांचे फायद्याकारितां कारितों असें बिलकूल नाहीं. त्यांच्या विद्येच्या महत्वाकारितां व गोष्टीच्या खरेपणाकारितां कारितों हें वरील माहितीवरून सर्वांस स्पष्ट दिसून येईल. आणि पुढील सालचीं पंचांगें खरेदी करण्याचे प्रसंगीं आमचे लोक ही गोष्ट विसरणार नाहींत असें आह्मी इच्छितों.

**नेटिवांस** अभिमानाची गोष्ट — आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं रुरकी एथें इंजिनियरी विद्येचा अभ्यास करण्याकरितां आपलें सरकारानें कालेज स्थापन केलें आहे त्यांत प्रतिवर्षी परीक्षा होत असतात त्याप्रमाणें या वर्षीही झाली, आणि तिचें फल इतिहासांत लिहून ठेवण्याजोगें झालें ह्मणजे, मि. कृष्ण चंद्र बोंडपाडे या नावाचे हिंदु गृहस्थ या परिक्षेंत पहिले आले. आजपर्यंत कोणीही नेटिव या परिक्षेंत पहिला आला नव्हता. कृष्ण चंद्र यांस पाहिले नंबरामुळें एक हजार रुपयांचें व एक अडीचशें रुपयांचें अशीं दोन बक्षिसें मिळालीं. दुसरे गृहस्थ मि. ग्रय नवील व तिसरे मि. मेकडानल हे आहेत. युरोपियन व नेटिव यांच्या हुशारींत व बुद्धिमत्तेंत देश व जाती या संबंधानें कांहीं न्यूनता नसून कांहीं गोष्टींत नेटिव हे युरोपियनांहून अधिकही असतां नेटिवांस पगार शेकड्यांनीं व युरोपियनांस हजारांनीं मिळतो व नेटिव ह्मणजे मूर्ख असा विलायतीं ग्रह होतो व तो प्रत्ययास येतो हें दैवगतीचें लक्षण समजावयाचें आहे! वस्तु महात्म नव्हे! अस्तु. परमेश्वर अशीच नरचेवर कृपाकरून नेटिवांची श्रेष्ठता सर्वांचे प्रचीतीस आणो असें आह्मी इच्छितों.

## वऱ्हाड.

मेजर ट्रेव्हर साहेब सेकंड असिस्टंट रेसिडेंट दिवाण साहेबांबरोबर विलायतेस गेले होते ते परत येऊन आपले कामावर रुजू झाले. आतां मि० डनलप साहेब इकडे परत येतील. क्या० बुलक साहेबांचे रजेंत त्यांस आफिशियेटिंग डिपुटी कमिशनर उमरावतीस नेमणार असें समजतें. त्यांच्या वरील हुद्याचे क्लिक गृहस्थ इकडे असतां त्यांचे हक्क बुडवून डनलप साहेबांस जागा देत आहेत याचें कारण काय असेल तें असो.

या आठवड्यांत दोन तीन दिवस पाऊस फार चांगला पडला. व नदीला एवढा मोठा पूर आला होता कीं, पांच वर्षांत तसा पहाण्यांत आला नाहीं. ऐन प्रसंगास हीं ईश्वरानें कृपा केली तीबद्दल त्याचे उपकार स्मरावे.

तुरुंगावर देखरेख ठेवण्याचें काम स्यानिटरी कमिशनर यांजकडे आहे तें पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल यांजकडे देण्याविषयीं वाटाघाट चालली आहे.

देऊळगावराजा येथील उपजलेलें मूल मारणारी विधवा चिमणाबाई ही पोलिसानें बुलढाण्यास नेली असतां चवकशी सुरू होण्यापूर्वीं ती मरण पावली असें समजतें. बाळंतबायको पावसापाण्यांतून व वाऱ्यावावधनांतून चांगले काळजीनें आणिली नसेल ह्मणून ती मरण पावली असावी. याविषयीं तपास होईलच.

रा. सा. नारायण भाई दांडेकर विद्याखात्याचें डायरेक्टर यांनीं गणेशचतुर्थीचे उत्साहानिमित्त आपले एथें गावतील ब हुतेक सभ्य नेटिव गृहस्थांस पानसुपारीस बोलाविलें होतें. रा. रा. गंगाधर बुवा बाळापुरकर यांचें सतारीवर गाणें झालें. मंडळीचे आदर आतिथ्य व बेतबात फार चांगला ठेविला होता. व त्यांकडे हा असा पाहिलाच प्रसंग व तो चांगला झाला ह्मणून सर्वांस फार संतोष झाला.

रा. रा. नारायण विनायक साठे बी. ए. धुळ्यास हायस्कुलावर आफिशियेटिंग हेड मास्तर गेले होते ते पुण्यास परत जातानां एक दिवस एथील मंडळीस भेटण्याकारितां आले होते.

स्यानिटरी कमिशनरचे हेडकार्क मि. ज्यार्ज सा० यांस १७५ रु. पगार होता तो २०० रु. झाला व आणखी कांहीं त्यांचे इस्टाब्लिशमेंट वाढविलें.

रा. रा. वामनराव बाळाजी ओझरकर वाशिमास डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर नेमल्याप्रमाणें शुक्रवारीं दोनप्रहरीं ते तिकडे रुजू होण्याकारितां एथून गेले. वामनरावांचा वियोग आह्मांस फार खेदकारक वाटतो. ते वऱ्हाडांत आल्यापासून सतत् दहा वर्षे एथें होते. ते चांगले हुशार, मेहनती. व सार्वजनिक कामांत हौस बाळगणारे होते. शिवाय त्यांच्या सारखे मनाचे मोकळे, खरे, चलाख, व स्नेहास तत्पर असे गृहस्थ फार थोडे मिळतील. ह्मणून त्यांचे जाणें मंडळीस आपला एकादा हात किंवा पाय गेल्यासारखें दुःखास्पद वाटत आहे पण त्यास उपाय नाहीं. ते आतां आपल्या स्वतंत्र अधिकाराच्या ओळीस लागले आहेत तर त्यांस परमेश्वर वरचेवर बढती देवो असें आह्मी इच्छितों.

वाशिमाहून यवतमाळास नेमलेले डिपुटि इ० इन्स्पेक्टर रा. रा. विनायक रामचंद्र भाटवडेकर बी. ए. या आठवड्यांत तिकडे जातील व त्यानंतर रा. रा. बजाबा रामचंद्र एथें येतील.

दिवाण साहेब सर सालरजंग जी एस आय डी सी एल हे शनिवारीं सकाळीं ९ वाजतां हैदराबादेस जाऊन सुखरूप पोंचले. तेथील पारशी मंडळी मे० रतनजी जामासजी प्रमुख ७।८ गृहस्थांनीं दिवाण साहेबांस मानपत्र दिलें. व कांहीं हिंदु गृहस्थांनींही एक मानपत्र दिलें त्यांचे पुढारी रा. रा. रामचंद्र पिले हे होते. हुद्देदार पारशी लोकांची संख्या व भरभराट निजाम सरकारच्या राज्यांत चांगली आहे व दिवाण साहेब या लोकांच्या हुशारीस चहातात असें दिसतें. मुंबईस यांचे एजंट पारशी गृहस्थ आहेत, व पुण्यास हे दीड तास मुक्कामास राहिले होते तर आमचे मि० दस्तुर बहिमनजी साहेब यांचे घरींच राहिले होते हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

कर्नल अलार्डाईस साहेब जुडिशियल कमिशनर काल सायंकाळीं उमरावतीहून एथें आले. उद्या सेशन चालावयाचें त्यांतील साक्षीदार लांबून यावयाचे आहेत ते येण्यास कदाचित् उशीर लागून एक दोन दिवस सेशन पुढें जाण्याचा संभव आहे.

रा० रा० गोविंदराज अय्या मोर्शीचे तहशिलदार रजा घेऊन काल सायंकाळीं एथें आले आहेत.

## सिंक्लेर मेमोरियल फंड.

| | रु. |
|---|---|
| रा. विष्णु केशव हे. मा. टुणकी | २ |
| रा. सदाशिव विष्णु भागवत अकोला | १० |
| मि. बाबा वलद शेख हिं. ताजानापेठ | १ |
| | १३ |
| मागील बेरीज | १२०७८ |
| एकंदर बेरीज | १२२०८ |

## वर्तमानसार

मि० प्रसन्नकुमार राय एडिंबरो युनिव्हर्सिटींत डी. सी. ची डिग्री मिळविलेले यांस लंडन युनिव्हर्सिटीकडून डाक्टर आफ सायन्स ही पदवी मिळाली.

मि० दादाभाई नवरोजी येत्या वर्षीं विलायतेस जाणार आहेत.

मि० करशेटजी रुस्तुमजी आणि मि. रत्नावली चेटी हे सिव्हिल सर्व्हिसच्या परिक्षेंत सन १८७४ सालीं पास झाले व ते हिंदुस्थानांत आतां लवकरच येतील. पहिले वायव्य प्रांतांत व दुसरे मद्रास इलाख्यांत नेमण्याची योजना झाली आहे.

धुळ्याच्या हाय स्कुलाचे हेड मास्तर रा. रा. महादेव विष्णु काणे रजेवरून परत येऊन आपले कामावर रुजू झाले.

रा. रा. विष्णु बाळकृष्ण सोहनी खानदेशचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर हे ईशान्य भागाचे आफिशियेटिंग इन्स्पेक्टर झाले.

काठेवाडांत वेगवेगळ्या धातूच्या पुष्कळ खाणी सापडण्याचा संभव आहे ह्मणून त्यांच्या शोधार्थ १००० रुपये पगारावर त्या कामाचे माहितगार एक युरोपियन गृहस्थ सरकारानें नेमिले आहेत.

जोधपुरचे महाराज प्रतापशिंग यांस प्रिन्स आफ वेल्स यांनीं विलायतेस येण्याकरितां आग्रहानें बोलाविलें आहे. व त्यावरून ते तिकडे जाण्याकरितां जोधपुराहून निघून जयपुरास आले असें समजतें.

अलीगडास मुसलमान लोकांचे विद्याभ्यासाकरितां कालेज आहे त्यास प्रतिवर्षी ६०० रुपये देण्याचें हिंदुस्थान सरकारानें कबूल केलें. या कालेजास या शिवाय १७००० रुपयांची मदत या पूर्वीं मिळालेली आहे.

नेपाळचे दिवाण व हैदराबादचे दिवाण विलायतेस जाऊन प्रसिध्धीस आले त्याप्रमाणें बडोद्याचेही नामांकित दिवाण सर टी माधवराव पुढील वर्षी विलायतेस जातील असें ह्मणतात.

या आठवड्यांत पर्जन्य बहुत ठिकाणीं चांगला पडला असें दिसतें तथापि तारीख २४ आगष्टच्या सरकारी खबरे वरून समजतें कीं, मुंबई इलाख्यांत खानदेश, नाशीक, दक्षिण, व दक्षिण महाराष्ट्र देश यांत पाऊस कमी आहे व त्या वाचून हाकाहाक आहे. नागपुर इलाख्यांत पाऊस चांगला पडला तरी चांदा व भंडारा या जिल्ह्यांत तांदळाकारितां अजून पाऊस पाहिजे आहे.

आग्रा आणि ग्वालेर रेलवेचे दरम्यान जमीन खोदण्याचें काम चालू असतां एके ठिकाणीं मोहरांनीं व रुपयांनीं भरलेले ४ हांडे सापडले.

तुर्कस्थानचा नवीन बादशहा सुलतान मुराद आजारी आहे व तो बरा होण्याचें लक्षण दिसत नाहीं ह्मणून प्रधान लोकांनीं त्यास गादीवरून काढून त्याचा धाकटा भाऊ अबदुल हमीद यास बादशहा केलें.

सर लुईस पेली साहेब पंजाबांत सर एच डेविस यांचे जागेवर ले० गवरनर होणार असें वर्तमान आहे.

तुर्कस्थान व सर्व्हिया यांचा तह होण्याची वाटाघाट चालू आहे.

विलायतेहून नुकतेच आलेले २ पारशी बारिस्टर मेसर्स नसरवानजी पेस्तमजी कामा आणि नवरोजी पेस्तमजी कामा हे मुंबईस कामें करूं लागले.

मि. एन आर मोटाभाई हे लंडनच्या इनमध्यें बारिस्टरच्या जनरल परिक्षेंत पास झाले हे बाटलीवाल्यांचे जावई आहेत.

पुण्यास हजामती करणारे ब्राह्मण तयार झाले आहेत त्यांपैकी २ मुंबईस गेले आहेत.

तुर्कस्थानामध्यें सर्व संस्थानेंसुध्धां ख्रिस्ती लोक १,४३,९६४०० आहेत व मुसमान ३५९८००० आहेत.

### नागपुरचे चीफ कमिशनर

एका इंग्रजी पत्राचा नागपुरचा बातमीदार कळवितो कीं, चीफ कमिशनर मि० मारिस हे एके दिवशीं आपल्या बंगल्याच्या पडवींत उभे असतां एक नेटिव मनुष्य बंगल्याच्या परसांत येऊन शेजारच्या एका विहिरीचें पाणी काढण्याकरितां जात आहे असें त्यांनीं पाहिलें. मि० मारीस यांणीं त्यास बोलावून काय करतोस असें विचारलें. त्यावर तो नेटिव ह्मणाला मी विहिरीचें पाणी काढून नेण्याकरतां आलों होतों, पण या बंगल्यांत बडे साहेब रहातात हें मला माहीत नव्हतें; तसें माहीत असतें तर मी आंत आलों नसतों. हा नेटिव मनुष्य जुडिशियल कमिशनर कर्नल मेकंझी यांचा चाकर होता. मि० मारिस यांणीं लागलीच पोलिसास हुकूम केला कीं या मनुष्यास पकडून त्यावर खटला करण्याकरितां त्यास माजिस्त्रेटाकडे पाठवावा. पोलिसानें हुकुमाप्रमाणें त्यास पकडून खटला तयार करून माजिस्त्रेटाकडे पाठविला. डेपुटी कमिशनर व माजिस्त्रेट मि० फाक्स यानीं बारकाईनें चवकशी केली व त्या मनुष्यास निर्दोषी ठरवून असले खटले पाठवून देण्याबद्दल पोलिसास दोष दिला. ही गोष्ट थोड्याच वेळांत बडे साहेब मि० मरिस यांस समजल्यावर त्यांणीं लागलीच दुसरा एक डेपुटी कमिशनर क. मानिक यास हुकुम केला कीं, या मनुष्याची चवकशी पुन्हा करावी व त्याप्रमाणें चवकशी होऊन त्या बिचाऱ्या नेटिवास ४ रुपये दंड झाला. ही बातमी ऐकून, ज्या गुन्ह्याची चवकशी एका माजिस्त्रेटानें करून कोणा मनुष्यास निर्दोषी ठरविला त्याच गुन्ह्याची चवकशी करून त्याच मनुष्यास शिक्षा देण्याचा दुसऱ्या माजिस्त्रेटास अधिकार आहे काय असें एका खासगी चिठीनें मि. फाक्स यांणें क. मानिक यांस विचारलें, पण त्याचा जबाब न आल्यावरून मि. फाक्स यांणें त्याच बाबदींत हुद्याच्या नात्यानें एक पत्र लिहिलें. त्यावर असा प्रश्न करण्याचा तुह्मास अधिकार नाहीं अशा प्रकारचा क. मानिक यांणीं जबाब पाठविला. हें सर्व खरें, पण त्यास एका माजिस्त्रेटानें सोडला कां व दुसऱ्यानें गुन्हेगार ठरविला कां हें जें इंग्रजी कायद्यांतलें गुप्ततत्व तें तसेंच राहून लोकांच्या मनाचें समाधान झालें नाहीं. पुढें जुडिशियल कमिशनर कर्नल मेकंझी यांजकडे अपील झाल्यावरून त्यांणीं दोन्ही खटल्यांचे कागद लक्षपूर्वक वाचून दंड परत देण्याचा हुकूम करून डिपुटी कमिशनरास दोष दिला. या खटल्याची ही सर्व हकीकत एका इंग्रजी पत्राच्या मार्फतच बाहेर आलेली असल्यामुळें ती बेभरवशाची ह्मणण्यास कांहीं कारण नाहीं, सबब आह्मी आपल्या वाचकांस विच्यारतों कीं, हा सर्व प्रकार योग्यच आहे ना? डेपुटी कमिशनर कर्नल मानिक यास, त्याची पुन्हा चवकशी करण्याचा काय अधिकार? चीफ कमिशनरचा हुकूम हाच कायदा असें मानून त्याच आधारानें त्यानें ही चवकशी केली असेल तर यावरून काय दिसतें? कर्नल मानिक हा माजिस्त्रेटच्या कामास नालयाक ठरत नाहीं काय? पण हा बिच्यारा डेपुटी कमिशनरच आहे! पण त्या चीफ कमिशनरची काय वाट? पुन्हा चवकशी करण्याचा हुकूम करण्याचा चीफ कमिशनरास काय अधिकार? शिवाय विहिरींतून थोडें पाणी नेलें असतें तर चीफ कमिशनर मि० मारिस यांचें कोणतें नुकसान झालें असतें? आपल्या विहिरींतील फुकटच्या पाण्याचाही नेटिवांस उपयोग होऊं नये इतक्या दुष्ट मनाचे मि. मारिस हे आहेत कीं काय? असतील तर असल्या दुष्ट मनुष्याच्या ताब्यांत नागपुर प्रांतांतील लाखों लोकांचे प्राण देणें किती भयंकर आहे!

अ० द०

## नाणें

( मागील अंकावरून पुढें चालू )

नाण्याच्या अंगीं इष्ट असा शेवटील गुण हा आहे कीं जो पदार्थ नाण्याचे ऐवजी चालविण्याचा असेल तो पदार्थ खरोखरीच व्याख्येप्रमाणें नेहेमीं मध्यस्थच राहील असा असावा. ह्मणजे त्या पदार्थाचा देवघेवींचे साधन याशिवाय दुसरा उपयोग करतां येऊं नये. ह्या गुणाची अवश्यकता कां असावी याचें कारण उघड व सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. पहा एकादा खाण्याचा गोड पदार्थ, उदाहरणार्थ साखर, हेंच एकद्या देशांत चलन आहे अशी कल्पना करा. तेथें एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्यापाशीं एक शेर साखर देऊन बाजारांत ती मोबदला देऊन तेथून अन्य जिन्नस आणण्यास त्यास सांगितलें. आतां सर्व मनुष्यांचें मन गोड व खाण्याच्या पदार्थाकडेस सहजच वळतें. सबब त्या मनुष्याचें मन सहजच तो थोडा फार खाऊन घेण्याकडेस वळेल यांत कांहीं नवल नाहीं. कदाचित् तो मनुष्य प्रामाणिक असल्यास मन वळलें तरी खाणार नाहीं. ही गोष्ट खरी आहे पण असे लोक थोडे निघतील. फार कशाला त्या धन्यालाच अगर त्याचे बायका माणसास व मुलास घरांत जर एक पोतें साखर भरली आहे. तर सहजी दर जेवणास थोडी फार त्यांतून काढून घेऊन खावीं असें वाटणें हें केवळ मानवी स्वभावाला अनुसरून आहे. असा क्रम चालला ह्मणजे अर्थांतच कांहीं दिवसांत त्याचें सर्व नाणें संपून जाईल व अदलाबदलीचे साधनाची त्यास तूट पडेल व तेणेंकरून त्याची फारच गैरसोय होईल. या देशांतील कांहीं भागांत गोड बदाम न घेतां कडू बदामांचेच नाणें चालत होतें त्याचा उद्देश हाच असावा. आतां हें उघडच आहे कीं, धातूचा व विशेषत: सोनें रुपें याचा नाण्याहून अन्य उपयोग थोडा आहे. कोणी ह्मणतील कीं, कां? सोनें व रुपें यांचीं नाण्याशिवाय दागिने भांडीं वगैरे करितां येत नाहींत काय? व मनुष्यमात्र करवित नाहींत काय? त्यांस उत्तर हेंच कीं, खरें आहे. सर्व मनुष्ये वरील कामीं सोनें व रुपें याचा उपयोग थोडा फार करितातच. परंतु खाणींमधून सोनें व रुपें या पृथ्वीचे पाठीवर एकंदर निघतें त्याचा वर सांगितलेल्या कामीं लागणारें सोनें व रुपें हा इतका अति लहान भाग व अंश आहे कीं त्याचा कांहींच भाग अन्य कामीं लागत नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. यावरील लेखावरून नाण्यामध्यें वरील गुणाची अवश्यकता वाचकांचे ध्यानीं आलीच असेल असें आह्मास वाटतें.

आतां कोणी असें ह्मणतील कीं सोनें व रुपें ह्याच धातू कां पसंत कराव्यात? हिऱ्याचे भावांत सोन्या रुप्याचे भावाइतका सुद्धां फेरफार होत नाहीं. सबब हिऱ्याचें नाणें कां करूं नये? त्याचें उत्तर हेंच कीं हिरे हे फारच थोडे सापडतात. सोन्या इतके पुष्कळ सापडत नाहींत हें एक कारण; दुसरें, हिरे फोडणें व नाणीं नेमकीं करणें फार कठीण आहे; तिसरें, जसजसा हिरा मोठा तसतशी त्याची किंमत अधिक. सबब एका मोठ्या हिऱ्याचे लहान तुकडे केले तर मोठ्या हिऱ्या इतकी त्याची स्वत:ची किंमत उभी रहाणार नाहीं. अशी गोष्ट सोनें व रुपें यांची नाहीं. सबब हिरे हे नाण्याचे कामीं नापसंत ठरले गेले आहेत असें समजावें.

कोणत्याही देशांत २ प्रकारचे ह्मणजे सोन्याचें व रुप्याचें असें नाणें नसावें. कोणते तरी एका धातूचेंच असावें. तरी सर्व धातूंमध्यें सोन्याचें नाणें असावें हें उत्तम असें मागील लेखावरून लक्षांत येईलच. आतां २ प्रकारचीं नाणीं असलीं ह्मणजे व्यापारास मोठी खराबी येणार आहे ती अशी- समजा कीं एका देशांत सोन्याचीं व रुप्याचीं अशी दोन नाणीं चालताहेत व कांहीं कारणामुळें ह्मणजे रुप्याची नवी खाण सापडल्यामुळें वगैरे रुप्याचा मात्र भाव शेकडा ५ रुपये कमती झाला असें झालें ह्मणजे अर्थांतच एक तोळा सोनें दिलें ह्मणजे शेकडा ५ रुपये प्रमाणें पाहिल्यापेक्षां रुपें अधिक येईल. आतां दोन्ही नाणीं सुरू असणें ह्मणजे हव्या त्या मनुष्यास हाल. एकाद्या मनुष्यास दुसऱ्यास कांहीं रकम देणें असेल तर तो सोन्याचें नाण्यांत न देतां रुप्याचेच नाण्यांत देण्याचें पतकरील व यामुळें त्या सावकाराचें शेकडा ५ रुपयेप्रमाणें नुकसान होईल व त्या कुळाचा तितका नफा होईल. अते सर्व देवघेवींत घोटाळे होऊन जातील सबब २ प्रकारचीं चलनें नसावींत ही गोष्ट निर्विवाद दिसत आहे.

( पुढें चालू. )


## जाहिराती.

ADVERTISEMENT.

Sealed tenders will be received by the Khamgaum Municipality at the office in the Cucherry up till Noon on Friday the 15 th September 1876, for the construction of a tramway at the Lessee's own expense from the Railway station to the factories in the town to be worked by the Lessee, who will be allowed to runorriesl but not worked by steam.

The Lessee will have to make his own arrangements as to laying down the tramway, and working it from the gates, of the factories to the buildings, also he will have to make his own arrangement with Fxecutive Engineer in charge of State Railway to carry the tramway to the goods shed. The tenderer will have to deposit 5000, Rupees in money or Government Securities on acceptance of the tender as a guarantee that the work will be completed by the 15th November 1876. The Municipality do not bind themselves to accept the highest or any tender.

The tenderer should produce letters showing what Cotton Psess Co's have agreed to his constructing and working tramway within their limits.

D. W. Laughton, Major
Vice Presedent
Municipality

Khamgaum, 23 rd
Augast 1876.

जाहिराती.

जाहिरात देण्यांत येते कीं, खामगाव एथील रेलवे स्टेशनापासुन शहरांतील फ्याक्टऱ्या पावेतों कंट्राक्टरानें ( पट्टा घेणारानें ) आपले खर्चानें ट्रामेव बांधून उपयोग करण्याची व वाफेचे सहायाशिवाय चालणारी लारिसें चालण्याची परवानगी दिली जाईल. ज्या लोकांची पट्टा घेण्याचि खुषी असेल, त्याणीं आपलीं मोहोरबंद टेंडरें शुक्रवार तारीख १५ माहे सपटंबर सन १८७६ रोजीं दोनप्रहर पावेतों मुनसिपल कमेटीचे आफिसांत ( कचेरींत ) पाठविलीं असतां घेतलीं जातील.

पट्टा घेणारानें फ्याक्टरीचे दरवाजापासून फ्याक्टरीपर्यंत ट्रामवे बांधणें, व त्याचा उपयोग करणें ह्याविषयींचा बंदोबस्त त्यास फ्याक्टरीचि मालकाबरोबर करावा लागेल, तसेच ( गुडसशेड ) रेलवेकडील माल ठेवण्याचि जागेपर्यंत ट्रामवे नेण्याचा बंदोबस्त स्टेटरेलवेचें काम पाहाणारे एक्झिक्युटिव इंजिनियर यांजबरोबर करावा लागेल.

टेंडर देणारा याचें टेंडर ग्रह्य झाल्यावर त्याणे काम तारीख १५ नोवेंबर सन १८७६ पावेतों पुरें केलें पाहिजे. व त्याचे हमीबद्दल रुपये ५००० रोख अगर गव्हर्नमेंट सिक्युरिटीज अमानत ठेविल्या पाहिजेत.

म्युनिसिपलकमिटी मोठ्या रकमेच अगर कोणतेंही टेंडर ग्रहण करण्याबद्दल जबाबदार नाहीं.

टेंडर देणारानीं कोण कोणते कपासी दाबण्याचे कारखानदारानीं ट्रामवे त्यांचे हद्दींत बांधू देणें व उपयोग करूं देण्याचे कबूल केलें आहे त्यांचीं पत्रें हजर केलीं पाहिजेत. मुक्काम खामगाव तारिख २२ माहे आगष्ट सन १८७६ इसवी

D. W. Laughton, Mejor.
व्हाइस प्रेसिडेंट
खामगाव म्युनिसिपल कमेटी


हें पत्र अकोलें एथें खेडरात बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. मध्ये…

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० | अकोला रविवार ता० १० माहे सप्तंबर सन १८७६ इ० | अंक ३७

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| टांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिस

## जलम आणि खामगाव स्टेट रेलवे.

लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावें कीं जी. आय. पी. रेलवेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासेंजर ( उतारू ) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास .................. १ रुपया
नेटिव लोक .... ............... ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोंचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

घाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोंचविण्याचा खर्चेही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.

## जाहिराती.

ADVERTISEMENT.

Sealed tenders will be received by the Khamgaum Municipality at the office in the Cucherry up till Noon on Friday the 15 th September 1876, for the construction of a tramway at the Lessee's own expense from the Railway station to the factories in the town to be worked by the Lessee, who will be allowed to runorriesl but not worked by steam.

The Lessee will have to make his own arrangements as to laying down the tramway, and working it from the gates, of the factories to the buildings, also he will have to make his own arrangement with Fxecutive Engineer in charge of State Raillway to carry the tramway to the goods shed. The tenderer will have to deposit 5000, Rupees in money or Government Securities on acceptance of the tender as a guarantee that the work will be completed by the 15th November 1876. The Municipality do not bind themselves to accept the highest or any tender.

The tenderer should produce letters showing what Cotton Psess Co's have agreed to his constructing and working tramway within their limits.

D. W. Laughton, Major
Vice Presedent
Municipality

Khamgaum, 23 rd
August 1876.

जाहिराती.

जाहिरात देण्यांत येते कीं, खामगाव एथील रेलवे स्टेशनापासून शहरांतील फ्याक्टऱ्या पावेतों कंट्राक्टरानें ( पट्टा घेणारानें ) आपले खर्चानें ट्रामवे बांधून उपयोग करण्याची व वाफेचे सहायाशिवाय चालणारी लारिसें चालण्याची परवानगी दिली जाईल. ज्या लोकांची पट्टा घेण्याचि खुषी असेल, त्याणीं आपलीं मोहोरबंद टेंडरें शुक्रवार तारीख १५ माहे सपटंबर सन १८७६ रोजीं दोनप्रहर पावेतों मुनसिपल कमेटीचे आफिसांत ( कचेरींत) पाठविलीं असतां घेतलीं जातील.

पट्टा घेणारानें फ्याक्टरीचे दरवाजापासून फ्याक्टरीपर्यंत ट्रामवे बांधणें, व त्याचा उपयोग करणें ह्याविषयींचा बंदोबस्त त्यास फ्याक्टरीचे मालकाबरोबर करावा लागेल, तसेच ( गुडसशेड ) रेलवेकडील माल ठेवण्याचे जागेपर्यंत ट्रामवे नेण्याचा बंदोबस्त स्टेटरेलवेचें काम पाहाणारे एक्झिक्युटिव इंजिनियर याजबरोबर करावा लागेल.

टेंडर देणारा याचें टेंडर ग्राह्य झाल्यावर त्याणें काम तारीख १५ नोवेंबर सन १८७६ पावेतों पुरें केलें पाहिजे. व त्याचे हमीबद्दल रुपये ५००० रोख अगर गव्हर्मेंट सिक्युरिटीज अमानत ठेविल्या पाहिजेत.

म्युनिसिपलकमिटी मोठ्या रकमेचें अगर कोणतेंहीं टेंडर ग्रहण करण्याबद्दल जबाबदार नाहीं.

टेंडर देणारानीं कोण कोणते कंपनी दावण्याचे कारखानदारांनीं ट्रामवे त्यांचे हद्दींत बांधू देणें व उपयोग करूं देण्याचें कबूल केलें आहे, त्यांचीं पत्रें हजर केलीं पाहिजेत. मुक्काम खामगाव तारीख २२ माहे आगष्ट सन १८७६ इसवी

D. W. Laughton, Mejor.
व्हाइस प्रेसिडेंट
खामगाव म्युनिसिपलकमेटी

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### पोस्टाकडील अधिकाऱ्यांस प्रार्थना.

अलेगाव तालुके बाळापुर, तारीख १४ आगष्ट १८७६ इ०

मेहेरबान वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

महाराज आपण लोकांच्या अडचणी दूर होण्याविषयीं सरकारांत दाद लावणारे आहा करितां खालील उपयुक्त मजकूर छापण्याची कृपा करावी.

आमचे गावीं बाळापुर पोस्टांतून रुरल मेसेंजर ८—९ दिवशीं पूर्वीं येत असे. परंतु मागील खेपेस तो १६ दिवसांनीं आला ह्मणजे तारीख २९ । ६ । ७६ रोजीं आला होता त्याजवर तारीख १४ ७ । ७६ रोज शुक्रवारीं आला तेव्हां दोन दोन आठवड्यांचीं वर्तमानपत्रें आमच्या हातीं आलीं ह्मणजे पहिला अंक अर्थांतच १२ दिवसांनीं पोंचला याचप्रमाणें खासगी पत्रें कोणाचीं १५, कोणाचीं १३।१४।११ दिवसांच्या अंतरानें पोंचलीं. याचें कारण रुरलमेसेंजर यास विच्यारलें तर त्यानें सांगितलें कीं. पावसाळा आहे तेव्हां ह्याच्या पुढें १५ दिवसांचे आंत पत्रें मी आणणारच नाहीं. तुह्मी पाहिजे तर सरकारास अर्ज करा. त्यावरून पोस्टाकडील सबइन्स्पेक्टर पश्चिम वऱ्हाड यांजकडे या मजकुराचा अर्ज केला आहे. अकोलें तालुक्यांत शाळेचे गावीं ४थे दिवशीं पत्रें वाटणारा शिपाई जातो त्याचप्रमाणें याही तालुक्यांत पोस्टाचे अधिकारी कृपा करून करतील तर बरें होईल कारण वर्तमानपत्रें व खासगी पत्रें यांजकडेस सर्वांचे डोळे चातक पक्षाप्रमाणें लागून तीं केव्हां हातीं येतील याजविषयीं काळजीनें वर पहात १२।१४ दिवस पर्यंत बसावें लागलें तर वर्तमानपत्रें घेऊन उपयोग काय? ४थे दिवशीं पत्रें येण्याविषयीं बाळापुरापासून शाळेचे बहुतेक गाव समोर मार्गांतच आहेत ते असे:—

बाळापुरापासून ३ कोश वाडेगाव, तेथून १ कोस विवरें, तेथून ३ कोस आलेगाव, व जातेवेळेस लाखनवाडा वगैरे दुसऱ्या रस्त्यानें वेडे वाकडे नसून बहुतेक सोयीचे गाव आहेत करितां पोस्टाकडील आफिसर कृपाळुपणें बाळापुर तालुक्यांतील लोकांची दाद घेऊन त्यांस ४थे दिवशीं ( शाळेच्या तरी गावीं ) पत्रें पोंचतील अशी तजवीज करून त्यांची काळजी दूर करतील तर आह्मावर मोठे उपकार होतील. पत्रकर्ते महाराज आपणही या योग्य तजविजीविषयीं पोस्टाकडील हुद्देदारास सूचना कराल अशी आशा आहे व ती परमेश्वर पूर्ण करो.

त्वरित पत्रें मिळण्याविषयीं
इच्छा करणारा

मोर्शी— तारीख १।९।७६

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. महाराज बरेच दिवस झाले आपल्या सेवेस हजर झालों नाहीं याची माफी असावी. इकडील कैफीयत आपल्या पत्रीं छापून लोकांपुढें ठेवावी असें वाटल्यावरून च्यार ओळी लिहित आहे याला जागा द्यावी.

हल्लीं या तालुक्यांत पावसानें आनंदी आनंद करून दिला आहे. मध्यंतरीं पाऊस नसल्यानें बरीच धास्ती लोकांस पडून धारण सरकत चालली होती. परंतु पोळ्यापासून आजपावेतों पाऊसच पाऊस होऊन राहिला आहे. आतां त्याणें आपली माया गुंडाळावी असें सर्वांचें मत असून जर असाच प्रेमाचा पूर वाहूं लागला तर ,,आति तिथें माती" याप्रमाणें पिकांची खराबी होईल. लोकांस फार त्रास आला आहे.

साल मजकुरीं महामारी बाईची ममता या देशावर आहेच असें इतर जागच्या बातम्यांवरून समजतें. या जिल्ह्यास लागून असणारा सें० प्रा० च्या बैतूल जिल्ह्यांत या बाईचा बराच अम्मल गाजतो आहे असें तिकडील प्रवाशांच्या सांगण्यावरून समजतें. शिवाय आमच्या मोर्शीस बाईची स्वारी पाळें वगैरे गावीं आहे. लोकांस गुदस्ताची धास्ती असल्यामुळें जरा तशा विकारानें कोणी मेला किंवा हैराण झाला ह्मणजे,, तीच" ह्मणून बोंभाट करतात. सालमजकुरीं तद्रूप विकार व्हावा व मरावा असा गांवोगांव क्रम आहे मग हें तिचें पिलूं असेल तर कोण जाणे? असो अशास कोणी विशेष भित नाहीं मात्र स्वत: कोणास बाईनें दर्शन देऊं नये हीच परमेश्वरास प्रार्थना आहे. पोटदुखी, हगवण, ताप, हींव वगैरे चिल्हर रोगांचा इकडे बराच तडाखा असल्यानें वृध्दांस मृत्युलोक लौकर सोडावा लागतो.

हल्लीं आमच्या समजण्यांत असें आलें आहे कीं वरूड एथील पोस्ट आफिस रहाण्याविषयीं, असावें तसें पोस्टास उत्पन्न नसल्यामुळें ( भवति न भवति ) असें चाललें आहे करितां या कामीं सरकारानें पोक्त विच्यार करावा कारण वर्धेपासून मोर्शी १८ कोस आहे तेव्हां सर्वांचे कागद मोर्शीहून मिळावयाचे किंवा त्या टप्पांत टाकावयाचे ह्मणजे त्या लोकांस किती त्रास होईल हें सांगण्यास नको. तशांत या पहाडी मुलखांत जाण्या येण्यास वगैरे जसे आपल्या जिल्ह्यांत सोयस्कर मार्ग आहेत

तसे या तालुक्याला नाहींत. मोर्शीचें पोस्ट देखील चांगल्या रीतीनें चालत नाहीं परंतु सरकारी तहशिल कचेरी असल्यानें ठेवणें भाग आहे. मला वाटतें मोर्शीपेक्षां वरूडचें पोस्ट बरें चालेंल वरूडच्या पोस्टापासून लोकांस सोय आहे याकरितां तें राखलें असतां ठीक होईल. कळावें. तारीख १ सप्तंबर. १८७६

तुवचा बातमीदार
वर्धा तीरनिवासी.

## जाहिरात


### न्यायप्रकाश

सदर्हू मासिक पुस्तकांत इंडियन लॉरिपोर्टांत प्रसिद्ध झालेले सर्व हायकोर्टांचे निवाड्यांचें मराठींत हशील, मुंबई हायकोर्टाचें सविस्तर व इतर हायकोर्टांचें थोडक्यांत देण्यांत येईल. शिवाय • कायद्यासंबंधी विषयाचें विवेचन सवडीप्रमाणें करण्यांत येईल. इंग्रजी अंकाचे मानानें या मासिक पुस्तकाचीं पानें ३० पासून ४० होतील. वर्षाची अगाऊ किंमत दोन महिन्यांचे आंत देणारास रुपये ४॥८ व शिवाय टपाल हशील ८६. मागाहून देणारास टपालहाशिलासुद्धां ७ रुपये.

अहमदनगर ३० जुलई १८७६.

रामचंद्र कृष्ण जोशी.
शंकर रामचंद्र हतवळणे.
न्यायप्रकाशकर्ते अहमदनगर.



वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ७ शके १७९८.


## सर टी माधवराव यांचें कलाकौशल्याकडे लक्ष

आमच्या हिंदुस्थान देशाची दुर्दशा होण्यास हें एक मुख्य कारण झालेलें आहे कीं, ज्यांच्या हातून ज्या गोष्टी उत्तम रीतीनें व्हावयाच्या त्यांस त्या गोष्टीकडे लक्ष देण्याची आस्था नाहीं; व ज्यांस त्या गोष्टी विशेष आस्थेनें कराव्या अशा वाटतात त्यांस त्या उत्तम दशेस पोचविण्याचें सामर्थ्य नसतें. असा प्रकार बहुत गोष्टींत आढळतो. तरुण विद्वान् लोक सभांतून अमुक वाईट गोष्ट करूं नये ह्मणून निबंध करितात पण त्याचा अंमल होणें सर्व गावावर अवलंबून असतें ह्मणून ते निबंध अमलांत येत नाहींत. वर्तमानपत्रकर्ते हमेशा लिहितात कीं, सरकारानें अमुक अमुक गोष्टी करूं नयेत व अमुक अमुक कराव्यात आणि त्याप्रमाणें सरकार करीत नाहीं तर त्या गोष्टींत सुधारणा होणार नाहीं. त्याचप्रमाणें कोणी आगकाड्याच्या पेट्या करितात, कोणी चाकू कात्री करितात, कोणी स्वदेशीय कापडाचीं दुकानें घालतात, कोणी मेणबत्त्या करितात, कोणी कागदाचे कारखाने मांडूं इच्छितात तर त्यांस त्या कामीं द्रव्याची मदत व खपास उत्तेजन सर्व लोकांनीं दिलें पाहिजे. आणि तें प्रसंगास न मिळालें तर शोधक व कुशल सद्गृहस्थाची निराशा व नाउमेद होते व तेणेंकरून साऱ्या देशाचें मोठें नुकसान होतें. ह्मणून अशा कामीं अनुकूल प्रकार घडून आले ह्मणजे त्या घडून आणविणाराची स्तुति केल्यावाचून रहावत नाहीं.

पुण्यास नुकतेंच स्वदेशीय कारागिरीचें प्रदर्शन झालें. त्यांत जे जे कलाकुशलतेचे पदार्थ मांडिले होते त्यांची यादी बडोद्याचे नामांकित दिवाण सर टी माधवराव यांनीं पाहून तींतील कांहीं पदार्थ प्रत्यक्ष पहावयास मागविले होते व ते पाहून त्यांस फार संतोष झाला व त्यांनीं बडोदे सरकाराकडून प्रदर्शनफंडास ३०० रुपये देवविले. व एक पत्र पाठविलें त्यांत असें लिहिलें आहे कीं हा तुमचा उद्योग फार स्तुत्य आहे. हल्लीं हें तुमचें कृत्य अगदीं अल्प दिसतें तरी तुह्मी कांहींमात्र निराश होऊं नये. हा नुकता आरंभ आहे. मोठमोठ्या विस्तीर्ण नद्याही आरंभास अति अल्प असतात हें उदाहरण लक्षांत ठेवून झटून उद्योग चालवावा.

फूलबगीच्याचे चांगले स्टयांड करणारास ७० रुपये बक्षीस देण्याचें कबूल केल्याप्रमाणें त्यांनीं पाठवून दिले. व या पत्रांत स्वदेशीय चांगल्या प्रकारचीं कुलपें करण्यास उत्तेजन यावें ह्मणून ७ रुपयांचें बक्षीस देण्याचें कबूल केलें आहे व हस्तीदंती सामान, चहाचें सामान, घड्याळें, चाकू, कातऱ्या, लाख, शाईच्या पुड्या वगैरे स्वदेशी सामानाची फार तारीफ केली व हे जिन्नस दुसरे संस्थानचे दिवाणाकडेसही पाठवावे असें प्रदर्शन कमिटीस त्यांनीं सुचाविलें आहे.

सर टी माधवराव यांची या गोष्टीबद्दल आह्मी तारिफ करितों. व हे सदरील स्वदेशी कारागिरीचे जिन्नस ते बडोदे संस्थानांत सर्वत्र उपयोगांत आणण्याची आस्थापूर्वक खटपट करितील असें आह्मी इच्छितों व तसें करण्याविषयीं त्यांस शिफारस करितों. आणि त्यांचा नमुना इतर दिवाणांनींही घेतल्यास देशाचें नष्टचर्य लवकर संपेल अशी आह्मी उमेद बाळगतों.

## सर सालरजंग साहेब यांस मानपत्र.

पुण्याच्या सार्वजनिक सभेनें आमचे दिवाण साहेब सर सालरजंग यांस उर्दू भाषेंत मानपत्र दिलें तें येणेंप्रमाणें:—

बहुजूर फैज गुनजूर जनाब टू हिज एक्सेलेन्सी नबाब सुजा उदवला मुखत्यार उल मुलुख **सर सालरजंग बहादुर** जी. सी. एस. आय. डी. सी. एल. दामहशमतहू वोइक्बालहु.

अज् ई सूब शहर पुणे के सार्वजनिक सभेके सरदार और दुसरे लोगोकी अंजुमनसें पस् अज् आदाय मरासीन बंद गीयात् व तसलीमात् मारूज़ आं कें

सिपास बेकियास उस रबुल्लास को और दरूद नाम हादूत उसके नबी माहमूद और उसकी आले मसऊद पर लायक सजावार है के जिस्ने दीनकी हिदायद व दुरुस्ती के वास्ते नबी व रसूल और. दुनियाकी बेहेतरी व बेहेबुदी के लिये बादशाहा उजरा उमर मब ऊस किया. आलल खूसुस ये: जनाब नबाब मुस् ते ताब मो आल्ला आल् काब खुरसीद इष्तेहार रुकनुस सलतनत् आसफीया नबाब हिज एक्सेलेन्सी सुजा उदवला मुखत्यार उल मुलक सर सालरजंग बहादूर जी. सी. एस. आय. डी. सी. एल के फी जमानेना दानाये जमान् व आकूले दवरान् आदी मुल मिसाल करी मुलखिसाल् उन्का सिफत् के जिनकी औब साफ हामीदा: मे जवान् इन्सान् गुंग है आपने म मालिके महेरूसाके इस्ते फादे ओ बहबुदीके इरादेसे मर्मालिक युरोपको सदहा तकलीफें माला योताक् उठाकर तबरीफ शरीफ लेगये और आसनाये राह मेकदरे तक्लीफ नसीब आदा आयद हाल हुयी जिसके बायस इस आतराफ ओ जवानिबके साकेनीन् हिंदु मुसलमीन को फिकर व तरद्दूद लाहिक हाल होयीती सो बहौलिल्ला बइनायत रब्बूल इज्जत मिजाज ओकदस दुरुस्त व बहाल होकर म आल खैर बोखोबी ब मुलक खुद तशरीफ शरीफ अरजानी फरमाये. और आमदसे उइस जनाबके हं लोगोको खुशहाली और फारेगुल बाली कमायं वगी हासिल हुयी और ज्यो विलायदमे पेशगाह दरबार जनाबा मलिका मोआज्जमा दामइकबाल हा इज लालहा और फरजंद कलाम जनाब शाहजादये आलम व आलमिया प्रिन्स आफ वेल्स दाम उमरहूसे और तरफसे दीगर सलातीन किबार व उमदाये नामदार व मुतसद्दी यान् आली मिकदार सलतनद के और ज्यानि बसे लंदन कार्पोरेशन व म्यांचेस्टर, चैंबर्स आफ कामर्स और आक्सफोर्ड युनिव्हर्सिटी और ईस्टइंडिया असोसियशन वगयराके ताजीम व इकराम इजत व एहतेशाम किये गयी, के साबिकीन रविदगान हिंदुस्थानसे किसीको नसीब न होयीथी, खुदा येलायेजाल रब्बुल मुताल मुबारक करे आमीन इलाही बखत तो बेदार बादा. तुरा दौलत हमेशा यार बादा, गुले इक बालतो दायम शुगुफ्ता बचष्मे दुष् मनानत् खार बादा और जनाब तो दिवाण मुखतार म मालिक आसफिया हैं, तोबी हम लोक ब बायस हम वतनी और इलाका रुयासतूके हंम जिनसीयत रखते है. इस लिये येह ज्यो जनाब इज्जद व एहतेषाम और ताजीम व इकरामसे मुकरम हुये. हम लोगोको ऐसी खुषी व खुररमी हुसूल हुयी केही तये तहयरीर व तकरीरसे बाहेर है, और आं जनाबने मन सब व ओहुदा दिवानीको मुद्दते मदीद व आरसे वईदसे इस आंदाज और करीनें और दानायीसे अंजाम फरमाया केम मालेके आसफिया मे सेकडो तऱ्हेकी बेहतरी और दिनबदिन तरक्की होती आर चली जात है. पर वरदीगार करीम आव कीं जाबको सलामत बा करामत रखे, और ममालिके निजाम सरकारने रेलवे आपहीके इसतिसवाब और इसतिमदादसे ज्यारी व शाया हयी है. और इस रेलवेके इलाकेमे ज्यो ब्यांक इज्याद फरमायी, के जिस्मे रेआया पैसा भरती है ये, भी आ जनाबकी दानायी और दूर अंदेशीके नतायज है, और नेटिव संस्थानमे ब्यांक जो कायम होयीहै और रेआयाको थोडे सूदपर पैसा मिलताहै और लोक पैसा भरणे मुसतइदहै. ये आमर नादेरुल वज्यूद और खैरखाही व बेहबुदीयें खलायकहै और किसी जाय येह बात बिलकूल नथी. बेद बूदाक गोया येह मिसाले अव्वल है. और ममालिक निजाम सरकारमे पेषतर लोग ज्यानेको निहायद खायीफ होतेथे, बसबब दुज्जदवो कुत्ता उत्तरीक वगयराके सो उन तकलीफोको ऐसा नेस्त व नाबूद कर दियाके सुरागधी किसीका बाकी न रहा और मुलुक मे सफायी और आमन होने के लिये, जो जो उमूरात और हरकातके मुद्दते मदीदसे राइजथी उन्को गीगाये आमन होनें देतें दानाई व फैमाइष वो तजवीजसे बमुजित ममालिक कवायिद मुजारियाके बंद, वो नसदूद फरमाया और मुलुकमे कसरते दौलत बसबब जियादती बेपारकी होती है सो उसतरवभी जनाबकी मंदे नजर अज हदहै. साले गुदस्तां नुमाइष गाहब मुक्कामें गुलबुर्गा जो इजाद फरमायेथे उस्सेभी हजारहा तिजारत पेशाको फायदा और इषतियाक आइंदा हुवा और इराजी ममालिक निजाम सरकारकी निहायत पैदावार हैं लेकिन जैसाके फवाइद चाहिये उस्से आखज किया नैंजाताथा आब आबकी तदाबीर साइब और तजवीज आहासनसे होने लगा और आइंदा भी होगा और आ जनाबकी बसबब होने रेलवेके आमद उरफ आबकी जो होने लगी सो साकिनीन शहर पुनासे रिश तये मोहिधत मुस्ताहकहो ये: उम्मयदकवी है ताहरदो ममालिकम बेहेतर और आहसन बो अनसब तजवीजहों और होंगी येह जनाब खूब जानतेहैं. जयादाचे हद्दे अदब बाजीब बूद बा अर्ज रसानीद

इलाही आफ ताबू उमरो दौलत वो एक बालबो माहे हशमत वो इजलाल ताबा बोदरखशाबाद बिननूने व सुस्बाद बेहुर मतीन् नबीबो आलेहिल आमजाद दस्तखत हाये राकेमान फिदवी यान दाया नवालीयान् सार्वजनिक सभा याने अंजोमन खैरखवा खलाइक.

## वऱ्हाड प्रांत व इंग्रज पत्रकर्ते.

( अरुणोदयांतून )

वऱ्हाड प्रांत निझामास परत देण्याच्या बाबदींत लिहीत असतां एक इंग्रज पत्रकर्ता ह्मणतो कीं, " तो प्रांत आज वीस वर्षांहून जास्त मुदत आमच्या राज्यांत असल्यामुळें आतां त्या प्रांतांतील लोकांस या चांगल्या राज्यव्यवस्थेची गोडी लागली

आहे सबब आतां त्या प्रजेस अव्यवस्थित अशा नेटिव राजाच्या ताब्यांत देणें हें अगदींच रास्त होणार नाहीं. " हे विचार पाहून नवल वाटतें. त्याचे हे विचार पाहून त्यास हिंदुस्थानचा शत्रु ह्मणणें चांगलें हें कोणीही खऱ्या मनाचा मनुष्य झटकन कबूल करील. पण हा शत्रू इतकेंच ह्मणून थांबला नाहीं. तो ह्मणतो कीं, तो प्रांत निझामाच्या ताब्यांत दिल्यास "सालरजंगाच्या हयातीपर्यंत त्या प्रजेस चांगल्या रीतीनें वागविलें जाईल, पण सालरजंग अमर नसल्यामुळें त्यांच्या पश्चात् निझाम त्या प्रजेस वाइट रीतीनें वागवील" याकरतां तो प्रांत निझामास परत देऊं नये. ही तकरार पुढें करणारा शेवटीं असेंही ह्मणतो कीं, " आज सालरजंगाची व्यवस्था चांगली असल्यामुळें परत द्यावा तर त्याच्या पश्चात् होणारा निझाम राजा चांगलाच होईल यासही कांहीं हमी नसून ही तकरार अशीच पुढेंही लागू होणारी असल्यामुळें तो प्रांत कधींही परत देऊं नये." सर्वच नेटिव राजांची राज्यव्यवस्था चांगली नाहीं काय? हा साधारण नियम आहे असें कबूल केल्यावाचून, सालरजंगाची व्यवस्था चांगली असतां तो मरणारा आहे असें ह्मणून तो प्रांत परत देण्यास हरकत करावी हें ह्मणणें कबूल करवत नाहीं. नेटिव राज्यव्यस्था वाईट असेल व कित्येक ठिकाणीं वाईट आहे पण तेव्हड्यावरून सर्वच ठिकाणीं वाईट आहे असें ह्मणतां येणार नाहीं. शिवाय हें इंग्रजांचें पोकळ अनुमान कबूल करण्यापेक्षां प्रत्यक्ष वऱ्हाडांतील प्रजेचे काय मत आहे हें पाहिलें पाहिजे. तो प्रांत परत देण्याच्या बाबतींत आजपर्यंत जी इतकी वाटाघाट चालली आहे त्यांत "परत देण्यास आमची हरकत आहे " असें वऱ्हाडच्या लोकांनीं कधीं ह्मटलें आहे काय? नसेल तर तुमच्या पोटबाबू इंग्रजांच्या कोरड्या अनुमानांस किती वजन द्यावें? शिवाय हिंदुस्थानच्या कल्याणाकरतांच जर तुह्मी इकडे आलां आहांत तर नेटिव राज्यव्यवस्था चांगली नाहीं अशीं कोरडीं दूषणें देऊन त्यांचे प्रांत किंवा त्यांचीं राज्यें हिसकून घेणें हें शोभत नाहीं. हिंदुस्थानच्या कल्याणाकरतांच आह्मी इकडे आलों आहों असें सोंग करून इकडे येऊन अशा रीतीनें नेटिवांची सत्ता हिसकून घेणे हें, प्रवाशांस लुटण्याच्या हेतूनें साधूचें सोंग घेऊन एकाद्या रस्त्यावर बसून वाटसरांस लुटण्यापेक्षां वेगळें नाहीं अगर वगळ्यापेक्षां वेगळें नाहीं. आह्मी आपल्या इंग्रज बंधूस विच्यारतो कीं हा आरोप तुह्मास कबूल आहे काय ? तुमच्या असल्या कृतीवरून किंवा उद्गारावरून "तुह्मी हिंदुस्थानच्या हिताकरितां इकडे आलेले नसून हिंदुस्थान लुटण्याकरतां आलां आहा" असें जें सिद्ध होतें तें तुह्मास कबूल आहे काय ? असेल तर तसें कबूल करा आणि मग न्यायान्यायाकडे पहाण्याचें सोडून देऊन व लोकांच्या तकरारीकडे दुर्लक्ष्य करून, उघड रीतीनें दरवडेखोरांप्रमाणें पुढें या, आणि आपले मर्जीप्रमाणें हिंदुस्थानची लूट करा. तुह्मास तसें करण्यास कोणीही हरकत करण्यास योग्य नसन हिंदस्थानचे २० कोटि लोक एक झाले तरीही ते हरकत करूं सकणार नाहींत असें आह्मी तुह्मास खात्रीनें सांगतों. आतां हे सर्व विचार एकीकडे ठेवले तरी, इंग्रजी राजव्यवस्था तरी सर्वांशीं निर्दोष आहे काय? अमेरिकेंत प्रजासत्ताक राज्य असल्यामुळें त्या प्रजेस जे व जितके हक्क आहेत ते व तितके इंग्रजी अमलांतील प्रजेस आहेत काय? नसतील ,तर ग्रेटब्रिटन व ऐर्लंड आणि हिंदुस्थान हे सर्व देश अमेरिकेच्या ताब्यांत देण्याविषयीं कां शिफारस करीत नाहीं? फार लांब नको, इंग्लंड व हिंदुस्थान या दोहींची राज्यव्यवस्था एकसारखीच आहे काय? नसेल तर कां नाहीं? आणि नसेल तर, एवढ्याच दृष्टीनें पाहिलें तरी, हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यव्यवस्था सदोष ठरत नाहीं काय? असेल तर वऱ्हाडप्रांत "अव्यवस्थित निझामाच्या राज्यव्यवस्थेंतून" काढून "अव्यवस्थित हिंदुस्थानी इंग्रजी राज्यव्यवस्थेंत" कां दाखल करावा? हिंदुस्थानची हल्लींची इंग्रजी राज्यव्यवस्था बदलून पुढें चांगली होईल यास कांहीं जामीनकी आहे काय? असेल तर आज २०० वर्षांत कां चांगली झाली नाहीं? असो, शेवटीं आह्मी ईश्वराचे इतकेच आभार मानतों कीं, हिंदुस्थानांतील इंग्रजी पत्रकर्त्यांच्या मताचे इंग्रज लोक अद्याप राज्यकारभारांत फारसे शिरले नाहींत. कारण जर कां एकदा त्यांचा भरणा राज्यकारभारांत पडेल तर, वादविवाद व न्यायाच्या तकरारी पुढें करण्याचें सोडून देऊन, हिंदुस्थानच्या लोकांनीं दुसऱ्या एकाद्या देशाचा रस्ता धरणें अगदी भाग होणार आहे. ईश्वर करो आणि अशी वेळ न येतां असल्या इंग्रजांची मतें बदलून ते सरळ होवोत व त्या योगानें त्यांचें व आमचें हित होवो.

## वऱ्हाड.

कर्नल नेंभार्ड साहेब कमिशनर उमरावतीहून पेपरकरेन्सी आफिसाचे तपासणी करितां मंगळवारीं सायंकाळीं एथें आले होते व बुधवारीं सकाळीं तें काम पाहून दोनप्रहरचे गाडीनें परत गेले.

कर्नल अलार्डाईस साहेब जुडिशियल कमिशनर काल संध्याकाळचे गाडींतून हैदराबादेकडे जाणार होते परंतु प्रकृति थोडी बरी नसल्यामुळें तूर्त बेत रहित झाला.

मेजर हडलस्टन साहेब एथील डिपुटी कमिशनर यांच्या पत्नीस एथील हवा चांगली मानत नाहीं ह्मणून त्या विलायतेस जाण्याच्या तयारींत आहेत. २२वे तारखेस एथून जातील.

निजामसरकारचे वकील राजाकंद स्वामो मुदलियार हैदराबादेस तिसरे तारखेस मरण पावले.

गेल्या रविवारीं दिवसभर व रात्रींही पर्जन्य असल्यामुळें चंद्रग्रहण लागलेलें व सुटलेलें मुळींच दिसलें नाहीं. ज्या ठिकाणीं दिसले असेल तेथील आमचे मित्र त्याच्या वेळा लिहून पाठवितील तर पंचांगनिर्णयास चांगलें होईल.

एथील नायब तहशिलदार रा. रा. राघो यादव यांनीं दोन महिन्यांची हक्काची रजा घेतली आहे.

अकोटचे नायब तहशिलदार भिकाजी चिमणाजी यांची बाळापुरास बदली केली व ते वारंवार आजारी असतात सबब पेनशन कां घेत नाहींत असें त्यांस विच्यारिल्यावरून मुदत भरण्यास दोन वर्षांची अवकाश आहे तितकें निभावून घ्यावें असें त्यांनीं कळविल्याचें समजतें. बाळापुरचे नायब तहशिलदार रा. रा. बापू मुकुंद यांस अकोटास नेमिलें.

रा. रा. गोविंदराज अप्या तहशिलदार या आठवड्यांत दोन दिवस नागपुराकडे गेले होते ते परत आले. यांनीं १९ दिवसांची रजा घेतली आहे ती भरण्याचे सुमारास मोर्शीस परत जातील.

मूर्तिजापुरचे नायब तहशिलदार रा. रा. जिवनराव नृसिंव्ह यांस उमरावतीस व उमरावतीचे रा. रा. बळवंत बापूजी यस मूर्तिजापुरास नेमिलें.

दारव्ह्याचे नायब तहशिलदार रा. रा. वासुदेव त्रिंबक हे निजाम सरकारांत सर्व्हे खात्यांत मोठ्या हुद्यावर गेले.

**मिं० म्याकिंटाश साहेब**—उमरावतीच्या हायस्कुलाचे हेड मास्तर यांनीं शाळेकडील शिपायास वेताचे छडीनें मारून शाळेबाहेर हाकून लाविलें व काढून टाकिलें असें समजतें. यवतमाळ जिल्ह्यांत शिकारीचे प्रसंगांत अशीच मारामार त्यानीं केली होती. वायव्य प्रांतांतील फुलर साहेबांचे मारामारीचा गवगवा इतका बाहेर दुमदुमत असतां विद्वान म्याकिंटाश साहेबांनीं असें काम करावें हें त्यांस योग्य नव्हतें. सदरहू शिपायानें डाय. साहेबांकडे अर्ज केला आहे ते त्याचा चांगला विच्यार करतील व तो विच्यार करतांना मारणारे गृहस्थ युरोपियन आहेत ह्मणून न्यायास संकुचित करणार नाहींत अशी आह्मांस उमेद आहे. म्या. सा.चें स्कूल चांगलें म्या. साहेबाचें स्कूल चांगलें किंवा ते आपल्या कामांत विशेष प्रवीण किंवा ते गुणांनीं वगैरे युरोपियन लोकांस किंवा नेटिव लोकांस विशेष प्रिय अशी प्रसिध्धि असल्याचें ऐकण्यांत नाहीं तेव्हां त्यांनीं गरिबीनें वागावें हें उचित.

**उमरावती— तारीख ६। ९। ७६**

आजकाल पर्जन्यानें इकडील मुलकांत गर्दी करून सोडिली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. गेल्या आठवड्यांत पर्जन्य फार पडला त्यांत शनिवारच्या रात्रीपासून तों सोमवारच्या रात्रीपर्यंत पडलेल्या पर्जन्याची हकीकत थोडी ऐकण्याजोगी आहे ती अशी: —ह्या दोन दिवसांत सूर्यदर्शन झालें नाहीं. चंद्रग्रहण पावसाच्या योगानें दिसलें नाहीं; एकसारखी झड होती. घराच्या बाहेर पडण्याची लोकांस पंचाईत पडली; पुष्कळ घरें पडलीं. नद्यांस मोठे पूर आले दोन तीन माणसें वाहून गेलीं. असें ह्मणतात कीं गेल्या १० वर्षांत असा एकसारखा झड पाऊस पडला नव्हता. आदितवारीं बाजार भरला नाहीं. आजपर्यंत आजमासें २७ इंच पाऊस पडला असावा. शेतकरी लोक ह्मणतात कीं आतां महिना पंधरा दिवस पाऊस न पडेल तरच चांगलें.

शहरांत पटकीचा उपद्रव कडाक्यानें सुरू आहे. गेल्या महिन्यांत पाऊस नव्हता तेव्हां लोकांस वाटत होतें कीं पाऊस पडल्यावर हा रोग कमी होईल परंतु लिहिण्यास वाईट वाटतें कीं दिवसेंदिवस पटकीनें मरणारांची संख्या जास्त वाढत आहे. इतका पाऊस पडला आणि अजून हा रोग नाहींसा होत नाहीं हें आश्चर्य नव्हे काय?

क्या० बुलक साहेब तारिख ४ रोजीं मि० डनलाप सा. यांस च्यार्ज देऊन आँग गाडींतून गेले. कोणी ह्मणतात कीं ते हैदराबादेस जाऊन नंतर सिमला एथें व्हाईसराय यांच्या भेटीस जाणार. ते दोन महिन्यांचे रजेवर आहेत तोंपर्यंत मि. डनलाप साहेब हे डेपुटी कमिशनरचें काम पहातील.

म्युनिसिप्यालिटीचे च्येअरमन मि० क्यांबेल साहेब एथून लवकरच जाणार. मि० अंडरसन साहेब हे आतां त्यांचे च्येअरमनचे जागीं आहेत. यंदा म्युनिसिप्यालिटीकडून गुदस्तांपेक्षां रस्त्यांची दुरुस्ती बरी आहे. मि. क्यांबेल यांणीं बरीच सुधारणा चालविली होती.

आतांशा आगगाडीच्या जिवास बरेंपण नाहीं असें दिसतें. बहुतकरून २।३ तास उशीर गाडी येण्यास होतो आणि त्यामुळे अर्थातच लोकांस त्या दिवसाचें टपाल मिळत नाहीं. पावसाळे दिवस असल्यानें कदाचित् हरकत होत असेल आणि खेरीज वऱ्हा एथील कोळशाचा उपयोग होत असतो हें दुसरें कारण गाडीच्या उशिराचें आहे असें समजतें. पहिल्या कारणास कोणाचा इलाज नाहीं. पण दुसऱ्याबद्दल कंपनीनें जर सवड काढली तर निघेल.

शहरांत ताप खोकला ह्यांच्या साती बऱ्याच आहेत तथापि पटकीचा रोग कमी झाल्यावर ह्या किरकोळ दुखण्यांची कोणी परवा फारशी करणार नाहीं.

या शहरांत स्वदेश सुधारण्याकडे बरेच मंडळींचें लक्ष लागलें आहे असें दिसतें. २।४ ठिकाणीं आगकाड्या करण्याची खटपट सुरू आहे. कित्येक वकील लोकही अशा खटपटींत आहेत हे सुचिन्ह होय.

इलिचपुरास एथून पावसाळ्याचे दिवशीं जाणें ह्मणजे मोठ्या धोक्याचें आहे ३।४ नद्या फारच मोठ्या आहेत. सरकार इतका पैसा इंजिनियरी कामाकडे खर्च करतें आणि ह्या नद्यांस पूल कां करित नाहीं कोण जाणें. असें ऐकतों कीं रविवार व सोमवार ह्या दिवशीं डांकही बंद होती. खरोखरच अधिकाऱ्यांचें या बाबदींत अवश्य लक्ष जाईल असें इच्छितों.

## वर्तमानसार

देव मामलेदार रा. रा. यशवंतराव महादेव व श्रीमंत अण्णा साहेब विंचूरकर यांच्या स्वाऱ्या पुणें एथें श्रीमंत परमहंस परिव्रजकाचार्य श्री. मध्वाचार्य स्वामी यांस

भेटण्याकरितां जाणार आहेत असें ह्मणतात.

हैदराबादचे निजाम यांचा लग्न समारंभ लौकरच होणार व त्याकरितां बंगलोरचे मुसलमान लोकांस हैदराबादेस लग्न समारंभास येण्याकरितां पांच पांच रुपये मिळणार आहेत अशी बंगलोरचे मुसल्मान लोकांत बातमी उठली आहे.

आमचे संस्थानिकांचें कापड विणण्याच्या गिरण्या घालण्याकडे लक्ष लागल्यासारखें दिसतें ही एक आनंदाची गोष्ट आहे. श्री. होळकर सरकारानें स्थापन केलेल्या गिरणीचें काम चांगले चाललें आहे. बडोदें सरकार गिरणी स्थापन करणार असल्याविषयींची खबर आह्मी मागील अंकीं आमचे वाचकांस कळविली आहे. आतां काश्मीरचे महाराज एक कापडाची गिरणी स्थापन करणार असल्याविषयीं समजतें. आमचे मुंबई इलाख्यांतील संस्थानिकांपैकीं कोणी हें उदाहरण घेईल काय? ने. ओ.

गेल्या ऋषीपंचमीस पत्नीसह दंपत्यभोजनास येण्याचें एका भिक्षुकानें कबूल करून त्याप्रमाणें न येतां जास्त दक्षणेचें आमंत्रण आल्यावरून तो दुसरीकडे गेला सबब त्याच्या तशा करण्यानें धर्मसंबंधी वगैरे जें आपलें नुकसान झालें तें दोन दिवसांत भरून द्यावें अशी सोलापुरच्या एका गृहस्थानें त्या भिक्षुकास दिलेली नोटिस तेथील पत्रांत छापलेली पाहून फार वाईट वाटतें. कित्येक लोभी भिक्षुक कधीं कधीं असे प्रकार करतात व हें त्यांचें कृत्य अति निंद्य व विश्वासघातकीपणाचें आहे हें खरें. पण त्याकरितां कोणा संभावित गृहस्थानें कोणा भिक्षुकास अशी नोटिस देणें व त्यांत लिहिल्याप्रमाणें दिवाणी कोडतांत जाणें हें चांगलें नाहीं. जे भिक्षुक अशा प्रकारचें निंद्य वर्तन करीत असतील त्यांस अशा रीतीनें वागविण्यापेक्षां दुसऱ्या रीतीनें वागवून त्यांची खोडकी मोडणें चांगलें. धर्मसंबंधीं कांहीं कृत्यास भोजनास येण्याचें कबूल करून न येणारास हिंदुशास्त्रांत दोष दिलेला असून तोच त्याच्यावर स्थापित करावा ह्मणजे सरकारांत न जातां सहजीं काम होईल. अ. द.

मि. दादाभाई नवरोजी हे विलायतेस जाणार ह्मणून त्यांनीं मुंबईच म्युनिसिपल कार्पोरेशन व टौन कौन्सिल या मंडळ्याच्या सभासदपणाचा राजिनामा दिला.

विलायतेतील अंडर स्टेट सेक्रेटरी लार्ड जार्ज हामिल्टन हे यंदाच्या हिवाळ्यांत एथें येणार आहेत असें ह्मणतात

युरोपांतील सर्वांच्या फौजा मिळून लढाईच्या उपयोगी ९३.३३,००० लोक आहेत आणि यांजबद्दल एकंदर १,३६,८०,४०,००० रु. खर्च लागतो.

बादशाहीण या किताबाचे नवीन नाणें पाडण्याचा विच्यार चालला आहे.

खानदेश जिल्ह्यांत भयंकर दुष्काळ पडेल अशी मोठी भीति उत्पन्न झाली होती परंतु जळगाव, चाळीसगाव, भोसावळ व त्याजपुढें खंडव्याकडे पुष्कळ पर्जन्य पडल्याचें आनंदाचें वर्तमान आहे.

अमेरिकेतील युनैटेड स्टेट्स देशाच्या स्वातंत्र्यास १०० वर्षे झालीं त्याजबद्दल तेथें उत्सव चालला आहे त्या संबधानें आनंदप्रदर्शकपत्र जर्मनीचे बादशहा विलियम यांनीं अमेरिकेचे प्रेसिडेंट यांस स्वतां ता. ९ जून रोजीं पाठविलें.

विलायतेंत गेल्या जूनच्या २८ व्या तारखेस पुढें लिहिलेले एतद्देशीय गृहस्थ बारिस्टर झाले:—

मेसर्स गिरिजाशंकरसेन, मेरवानजी पेस्तनजी कामा, नसरवानजी पेस्तनजी कामा, नगेंद्रनाथ घोस, अविनाशचंद्र मित्र व फ्रामजी रस्तमजी विकाजी. इं. प्र.

विलायतेतील एक वकील मुंबई येथें नवीनच आला आहे त्यानें वकिलीच्या परिक्षेस जाणाऱ्या उमेदवारांकरितां एक वर्ग काढिला आहे. सुमारें २० उमेदवार नेहेमीं हजर होत असतात.

बंगलोर येथें एक शर्यतीचा घोडा १०,००० रुपये किंमतीस विकला गेला,

चीनमध्यें शांगिपासून उसूनपर्यंत ह्मणजे सुमारें ११ मैल प्रथमच आगगाडीचा रस्ता पुरा झाला. त्या कृत्यास चिनई वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं बराच अडथळा आणिला परंतु तो सिद्धीस न जातां दररोज ४,००० उतारू लोक येतात जातात.

टुवर्स शहरांतील मि० मोनेहाट नावाच्या कारागिरानें एक नवीन चूल तयार केली आहे. त्या चुलींत विस्तवाची गरज न लागतां साधारण अन्न सूर्याच्या किरणांतील उष्णतेनें तयार होतें. ह्या चुलीवर बटाटे, मांस, पोळ्या वगैरे उत्तम तयार होतात असें ह्मणतात. वर लिहिलेल्या चुलीवर अन्न शिजण्यास फार वेळ लागतो असेंही नाहीं; कारण सुमारें वीस मिनिटें सूर्याचें ऊन सतत सांपडलें असतां अन्न तयार होतें. सु. प.

## नेटिव लोकांस सनदी व इतर मोठ्या नोकऱ्या मिळण्याचा संभव.

सनदी व इतर मोठाल्या नोकऱ्या नेटिव लोकांस मिळण्याचा समय नजिक आला आहे असें दिसतें. दिवाणी खात्यांत जज्जाच्या जागा नेटिव लोकांस द्याव्या ह्मणून बंगाल्यांत वाटाघाट सुरू आहे. कलकत्याचे हल्लीचे चीफ जस्टिस सर रिचर्ड गार्थ. यांनीं सरकारास असें लिहून पाठविलें आहे कीं युरोपियन जज्जापेक्षां नेटिव सबार्डिनेट जडज चांगलें काम करतात. सबार्डिनेट जज्जाच्या निवाड्यावर जज्जाकडे अपील झालें ह्मणजे त्याचा योग्य निकाल होत नाहीं. सबार्डिनेट जज्जांनीं केलेला ठराव बहुतेककरून चांगला असतो.

याकरितां पहिल्या अपिल कोर्टापासून न्यायाच्या कामास मदत न होतां उलटी हरकत मात्र येते. अशा कारणाकरितां सर रिचर्ड गार्थ यांणीं सरकारास अशी शिफारस केली आहे कीं, डिस्ट्रिक्ट कोर्टें मोडून त्यांच्या बदला तीन तीन जज्जांचीं कोर्टें नेमावीं व त्यांत एक नेटिव, एक बारिस्टर, व एक सिविलियन असे असावेत. ही शिफारस बंगालचे लेफ्टिनेंट गवर्नर यांसही पसंत पडली आहे असें ह्मणतात. याप्रमाणें कोर्टें स्थापन झाल्यास नेटिवांस मोठाल्या जागा मिळण्याचा संभव आहे. दुसरें नेटिवांस कोणकोणच्या मोठ्या जागा देणें योग्य आहे असें हिंदुस्थान सरकारानें आपल्या हाताखालच्या सरकारास विच्यारलें असल्याविषयीं वाचकांच्या लक्षांत असेलच. गेल्या गुरुवारच्या मुंबईग्याझेटांत अलाहबादची अशी तार छापली आहे कीं कलकत्याच्या रेविन्यूबोर्डांतील सभासदांची जागा नेटिवांस देण्याचा विचार असल्यामुळें बंगाल्यांतील सिविलियन लोकांच्या हातापायांचा तिळपापड झाला आहे. याप्रमाणें नेटिवांस कलेक्टर व असिस्टंट कलेक्टरच्याच नाहीं परंतु त्यापेक्षांही मोठ्या हुद्याच्या जागा देण्याविषयीं विचार चालू असल्याबद्दल थोड्या दिवसांपूर्वीं एका वर्तमानपत्रांत छापलें होतें. याप्रमाणें हल्लीं नेटिवांस मोठ्या जागा देणार ह्मणून गवगवा सुरू आहे. कदाचित असेंही असेल कीं पुढच्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस दिल्ली येथें भरणाऱ्या दरबारांत राणीसाहेब चक्रवर्तिनी असा किताब घेणार तेव्हां या समारंभाच्या निमित्तानें मोठाल्या जागा नेटिवांस देण्याची सुरुवात करावी असाही विचार असेल. आतां आह्मी जी ही कल्पना काढली आहे ती खरी ठरण्याचा कितपत संभव आहे हें जरी सांगतां येत नाहीं तथापि नेटिवांस मोठाल्या जागा देण्याविषयीं खचित घाटत आहे. ने. ओ.

## नाणें

( मागील अंकावरून पुढें चालू )

ज्याअर्थीं रुप्याचा भाव सोन्यापेक्षां लवकर कमज्यास्त होतो त्याअर्थीं रुप्याचें नाणें जर देवघेवीकरितां सरकारानें केलें तर त्या नाण्यांत तांब्याची वगैरे मिसळ घालावी लागते. त्याच नियमास अनुसरून आपले एथील प्रत्येक रुपयांत २ आणे मिसळ आहे. याचें कारण असें कीं, अशी मिसळ न घालतां जर करितां कांहीं कारणानीं रुपयाचा भाव वाढेल तर सर्व लोक रुप्याचीं नाणीं आटून चांदी करून विकित जातील. कारण रुप्याचा भाव चढला आहे. व सरकारांत टांकसाळींत नाणें पाडण्याकरितां पुष्कळ वर्ताळ्यानें रुपें विकत घ्यावें लागेल. जोंपर्यंत भाव अधिक असेल तोंपर्यंत लोक ती नाणीं आटवीत जातील व सरकारास अधिक दरानें चांदी नवीं नाणीं पाडण्यास विकत घ्यावी लागेल येणेंकरून सरकारास मोठें नुकसान येईल. याकरितां सरकारानें मिसळ घालून अशी युक्ती केली आहे कीं जगी चांदीचा भाव एक दोन आणे चढला तरी सरकारचें नुकसान होऊं नये कारण चांदीचा २ आणेच भाव चढला असतां दोन आणे मिसळेचीं कोणीही नाणीं आटण्याचें मनांत आणणार नाहीं. थोडें वर्षांपूर्वीं फ्रान्स देशांत रुप्याचा भाव एकाएकी चढल्यामुळें तेथील नाणें केवळ चांदीचें असल्यामुळें सर्व लोक 'नेपोलियन' नावाचे हजारो रुपये आटवून गट करून विकूं लागले याचा परिणाम असा झाला कीं देशांतील सर्व नाणें आटून जाऊन अगदीं नाहींसें झालें. व फ्रेंच सरकारचें यामुळें फार नुकसान झालें. असला पर्याय इकडेस होऊं नये. ह्मणोनच आपल्या रुपयांत सांप्रतची मिसळ सरकारानें ठेविली आहे.

मागें सांगितलें आहे कीं नाण्याचें काम ब्यांक नोटी, चेक, हुंड्या वगैरे करितात. परंतु हीं नाणीं आहेत असें समजूं नये. हीं सर्व नाण्याऐवजी चालतात याचें कारण कीं सर्वांस सरकारचे व सावकाराचे इमानाची खात्री असते. ही खात्री राखण्याकरितां सरकारास व सावकारास नेहेमीं तिजोरींत पैसा थोडा फार शिलक ठेवावा लागतो. एकादे सावकाराचे दुकानीं एकादा मनुष्य हुंडी घेऊन आला व त्याचेवेळीं त्याचे खजिन्यांत शिलक नसली व त्याणें रुपये देण्यास विलंब लाविला तर तत्काल त्याची अब्रू जाते. व त्याचें दिवाळें निघतें. याचप्रमाणें सरकारचेंही आहे. जर लोकांस असें कळेल कीं खजिन्यांत नोटा चालत नाहींत तर कोणी नोटा घेणार नाहींत परंतु असें होतच नाहीं. सरकार नेमल्या वेळीं जाईल त्यास नोटी घेऊन रुपये देतें अशी सर्वांची खात्री आहे. सबब मात्र हे सर्व कागद नाण्याप्रमाणें चालतात. यावरून नेकी हीही अंशतः नाण्याचें काम करिते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या असल्या नेकीच्या कागदानीं हजारो नाण्यांचें काम होतें व व्यापारासही मोठी मदत होते.

## जाहिरात

IN THE PRESS
THE CODE OF CIVIL
PROCEDURE

Acts VIII of 1859 & XXIII of 1861. With Decisions contained in the Bombay High Court and in the Indian Law Reports.

Understanding that the want of this book in English is much felt by the candidates for the Offices of Pleader and Subordinate Judge, we have undertaken the publication of it. It will be ready at the beginning of September next. The price of the book will be Rs. 2--8 besides postage for those who subscribe their names before the end of August next and Rs. 3 afterwards exclusive of postage. Letters should be addressed to the undersigned or to the Manager of the "Dnyan Chaxu."

GUNGADHUR VISHNOO LIMAYE
Pleader,
Residing in Shunwar Peit
Poona.

PANDURANG BACHAJEE
Pleader,
Shanwar Peit Poona near
Panjrapole,

Poona
17th July 1876

हें पत्र अकोलें एथें लेंडराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला रविवार ता० १७ माहे सप्तंबर सन १८७६ इ० अंक ३८

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| „ अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| „ दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. मी आपले सुंदर पत्रीं खालीं लिहिलेल्या च्यार ओळी पाठवितों त्या प्रसिध्ध करण्याची मेहेरबानी व्हावी.

माझें फिरणें यवतमाळ व वणी तालुक्यांत आहे व मला वारंवार वणीस जाणें पडतें. यंदा या महल्यांत पर्जन्य विपुल पडला आहे व जिकडे तिकडे आबादानी झाली आहे. वणी एथील तलावास भरपूर पाणी आलें आहे व हल्लीं तो तलाव समुद्रासारखा दिसून राहिला आहे. गतवर्षीं या तलावाकरितां ७००० रुपये खर्च केले होते त्याचें फल आतां दिसत आहे. लालगुडचा तलाव भरल्यानंतर वणीचे तलावास स्वछ पाणी येईल असें जें इंजिनियर यांणीं ह्मटलें होतें तें सर्वथैव खरें होतें परंतु दुर्दैवेकरून गतवर्षीं पाऊस कमी पडल्यामुळें लालगुडचाच तलाव भरला नाहीं वतेणेंकरून वणीचा तलाव न भरल्या बद्दल मोठी हाकाहाक झाली होती.

हल्लीं वर्धेस व पेणगंगेस अतिशय मोठाले पूर चालले आहेत व कित्येक दिवस नावही चालविण्याची कोणास हिंमत होत नाहीं. इकडे पिकें उत्तम प्रकारचीं असून रोगराई वगैरे कांहीं नाहीं.

वणी एथें श्री शंकराच्यार्य यांचें ठाणें आज दोन महिन्यापासून आहे व आणखी एक महिनाभर पर्जन्यामुळें राहीलसें वाटतें. हल्लीं त्यांचे ठिकाणीं लोकांची श्रद्धा विशेष नसल्यामुळें त्यांचा आदर सत्कार यथायोग्य होत नाहीं. व प्रत्येक काम अधिकाऱ्याची वाट पहातें.

एथील तहाशिलदार मि० शेषाचलम् ऊर्फ अण्णा साहेब हे एथें आल्यापासून लोकांस सर्वच नवें झालेंसें वाटलें. पूर्वीं मोठमोठ्यांचीं तोंडें धरून गरिबास त्रास होत असे परंतु हल्लीं उलटें झालें आहे. आतां गरिबांची दाद लवकर लागून मोठे तितके खोटे ठरण्याची वेळ आली आहे. पूर्वीचा अमल फार कडक व अण्णा साहेब हे किंचित निरभिमानी असल्यामुळें कित्येक लोक त्यांचें वजन कमती पडतें असें बोलतात. परंतु मला वाटतें त्यांची कारकीर्द केवळ जशी असावी तशीच आहे. त्यांची मोकदम्याची अति बारकाईनें चौकशी करण्याची रीति व त्यांचे खरें स्वरूप ताडण्याची शैली अप्रतिम आहे, ते हल्लीं मराठी अक्षर फारच उत्कृष्ठ व शुद्ध लिहितात. त्यांणीं पूर्वीचा लोकाकडे थकलेला पैसा पुष्कळ वसूल केला व हपिसांतील अत्यंत क्षुल्लक काम सुद्धां आपण स्वत: लक्ष पुरवून तें व्यवस्थित करवीत आहेत. आतां यांच्या लेखांत कधीं कधीं रयतेच्या फायद्याचे उद्गार ज्यास्त येतात व त्यामुळेंच कदाचित् त्यांच्या सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यास आवडत नसतील तर कोण जाणें. परंतु एकंदरीनें रयतेचें कल्याण होऊन सरकारी काम ही उत्तम व्हावें अशाविषयीं ते रात्रंदिवस काळजी बाळगून मोठ्या हुशारीनें काम चालवितातसें दिसतें व ते नवे असल्यामुळें हें करणें त्यांस योग्य आहे.

दुसरें, सुधारणुकीचीं.कामें करण्यास हल्लीं सारे महिना २९ रुपये शहर दुरुस्ती वगैरे मिळून मिळतात. पूर्वीं ९० रुपये दरमहा असून शिवाय वेळोवेळीं ज्यास्त सांगशन करीत होते. असें असून पूर्वींपेक्षां ज्यास्त सुरधाणा हल्लीं व्हावी असें इच्छिल्यास कसें होईल? तथापि हल्लीं वणी एथें स्वच्छता, कोरडे रस्ते, रिपेरी वगैरे सर्व उत्तम प्रकारें चालली आहे.

दुसरें, दवाखाना, पोस्ट आफिस, पोलिस, शाळाखातें या सर्व हाताखालच्या खात्यांत काम चांगलें चालावें ह्मणून त्यांची सर्वांस वारंवार मदत मिळते. एथील मुलीच्या शाळेस सरकारी बुकें व स्लेटी नव्हत्या ह्मणून त्यांणी आपल्या पदरचीं ४०८ रुपयांचीं बुकें देऊन ८ रुपयांच्या स्लेटी मुंबईहून पार्सल करून बक्षीस देण्याकरितां आणविल्या आहेत. तसेंच परवाचे उपद्रवाचे वेळेस हिंगणघाटाहून कित्येक औषधें आणविलीं व असेंच ज्या ठिकाणीं कमी पणा दिसेल त्या ठिकाणीं आपले पैशाकडे व मेहेनतीकडे न पहातां ते एकदम त्या कामासाठीं उडी घालतात. ही शैली सर्वांमध्यें असत नाहीं ! असो पत्रविस्तार फार झाला लोभ करावा ही विनंती.

ता. ४ । ९ । ७६ इसवी-

एक
वारंवार वणीस जाणारा.

### गणेशचतुर्थी सार्वजनिक समारंभ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आमच्या खालीं लिहिलेल्या मजकुरास आपल्या येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा करितों.

आमचें भुसावळ गाव थोडे दिवसांपूर्वीं अगदी कुग्राम असून अगदी मोडकळीस आलें होतें. परंतु प्रस्तुत पहातां एक टुमदार वस्ती होऊन चांगल्या शहराच्या बरोबर योग्यतेस आलें आहे. नेहेमीं थाट चालू असतात. रेलवेच्या संबंधानें गुणी लोक वगैरे पुष्कळ येतात. व एथें असलेल्या मंडळीचा एक कट असल्यानें त्यांच्या शक्तीनुरूप कित्येकांस आश्रय मिळतोच. कोणी गुणी मनुष्य आलेला विन्मुख जात नाहीं.

एथें सर्व मंडळी मिळोन चालू सालच्या गणेशचतुर्थीचा थाट उत्तम केला. गणपतीची स्थापना तारीख २३ आगष्ट सन १८७६ बुधवार रोजीं झाली. त्या दिवसापासून मंगळवारपावेतों सात दिवस गणपतीद्वारीं सदैव मंगल असे. ज्या वेळेस जावें त्या वेळेस कथा, पुराण, गाणें, ( मर्दानी व जनानी ) चौघडा, वाजंत्री, ( सनया अलगुर्झी ) आदिकरून वाद्यांचा गजर पंचानुतें नेमलेल्या वेळीं रात्रंदिवस चालू असे. जागा भुसावळ मानानें चांगली होती. व तीस अति उत्तम रीतीनें रंगवून, छतें, तसबिरी आरसे वगैरे फार उत्तम तऱ्हेनें कळाशींत बसवून शोभायमान केली होती. रोषनाईही फार शानदार मनास आल्हाद होण्यासारखी होती. मुख्यत्वेंकरून गणपतीचें मखर जें केलें होतें त्याच्यावर मिन्याचें वगैरे नकशीदार काम मधील महिरापीसह अनुपम, अवर्णनीय, डौलदार व नेत्रांत भरण्यासारखें झालें होतें.

जागा रोषणाईचा बेत मखर आदिकरून सुशोभित करण्याचे कामीं नाशिककर रा. रा. माधवराव भगवंत भंडारी यांनीं परिश्रम केल्यानें मुख्यत्वेंकरून या गावांत संच बसला. अशा या थाटदार बनविलेल्या श्रीगणपतीच्या जागेंत गेल्या बरोबर सर्व दु:खपरिहार होऊन मन तल्लीन व तदाकार होत असे. नित्य रात्रीं कीर्तन, वेद शास्त्र संपन्न रा. रा. आबाबुवा हरदास नाशिककर यांचें होत असे. सदर्हू हरदास यांची बोलण्याची हतोटी वगैरे चांगली आहे आणि मुख्यत्वेंकरून बुवांचा बोलण्याचा भर मोरोपंती आर्यावर फार दिसला. मागील गाणें साधारणच होतें.

उत्साहामध्यें नामांकित गवई व नायकिणीच्या मजालसी सुरू असत. त्यांत रा. रा. विष्णुपंत छत्रे व वजीरखां नागपुरकर यांनीं रागांच्या सार्णीमध्यें ख्याल, टप्पा व जोडांची सुरावट यांची अति उत्तम मजा केली. वजीरखां हे तर नामांकित गवईच आहेत. परंतु छत्रे मजकूर यांनीं त्या समयीं जें काम केलें तसें आपल्या ब्राह्मणामध्यें या शे दोनशें कोसांत ऐकण्यास मिळणें कठीण! हे ग्रहस्थ स्वभावानें चांगले असून मंडळींतले आहेत.

जनानी गाण्याचाही याचप्रकारें थाट झाला. नर्मदा नाशिककरीण व राधा सातार करीण या दोघींस पाच्यारण होते. नर्मदा ही वयानें बारा तेरा वर्षांची असून ताळसुरांत पक्की आहे व इनें जें काम केलें तें इचे वयाचे मानानें अपूर्व असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं. व तें इतकें उत्तम जाहले कीं, आलिकडील ज्या कांहीं मी मी ह्मणविणाऱ्या त्यांस तें समयीं लाजविल्यावाचून राहिलें नाहीं.

या शिवाय खानदेशांतील पाऱ्होळे येथील यासीनबक्ष तवायफ ही अकोल्यास जाण्याचे उद्देशानें या स्टेशनावर उतरल्यावरून गाण्यास बोलावणें केल्याप्रमाणें तिनेंही येऊन गणपतीपुढें हजीरी दिली. सदरहू तवायफ इचा स्वभाव व गुण उत्तम असून शिवाय फारशी उर्दु मराठी. ( बाळबोध व मोडी ) या भाषा तिला चांगल्या येत असून लिहितां वाचतांही येतें तिचें गाणें वर लिहिलेल्या गवई बावाच्या साम्यतेचें ऐकण्यांत आलें. जनानी गाण्यांत यासीनबक्ष सारखी जोडासह रागांत गाणारीण आपल्या या इलाख्यांत नसेल असें ह्मणवत नाहीं, तथापि फारच विरळा.

गणपती जाण्याच्या आदले दिवशीं गावप्रयोजन पुणें थाटाचें उत्तम झालें.

अखेर मंगळवारीं अस्तमानीं गणपती पालखींत बसवून मशालीसह दारूचे रोषनाईत तासे, वाजंत्री, बंदुकांचे बार, लेजमी, पट्टे, आदिकरून खेळांचे रंगांत भजनांच्या गजर समारंभासह मोठ्या थाटानें रस्त्यानें मिरवत मिरवत नेऊन स्टेशनानजिक सबइंजिनियर यांचे बंगल्यांतील कंपौंडचे विहिरींत त्याचें विसर्जन केलें. सब इंजिनियर यांनींही ते समयीं पानसुपारी, खिरापत यांचा थाट व जनानी गाणेंही बंगल्यांत सुरू केलें होतें. गाणें आटोपल्यावर अत्तर, गुलाब घेऊन गणपतीविसर्जनास आलेली सर्व मंडळी आपआपले घरोघर गेली. सारांश सर्वउत्साहामध्यें एथील मंडळी अतिशय झटल्यामुळें कोणत्याही प्रकारें उत्साहास कमीपणा न येऊन केलेल्या श्रमाचें यश आलें आणि पुढील सालीं सदर्हू काम करण्यास उमेद ही आली.

आतां मोरयापाशीं हेंच मागणें आहे कीं, हल्लीं जी मंडळी या कामीं आनंद मानणारी आहे तिचें उत्तरोत्तर कल्याण होऊन तिजकडून त्यानें प्रतिवर्षींउत्साह समारंभ घेत जावा. कळावें.

भुसावळ—तारीख ८ सेप्टेंबर १८७६ इ.

आपला जनाब
उत्साह पाहाणारा.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि.— या उमरावती शहरांत सवा महिन्यापासून महामारी बाईचें आगमन होऊन आजपर्यंत ६३ मनुष्यें आजा

री होऊन त्यांतून २५ माणसें बाईसाहेबानीं बळी घेतलीं.

गेल्या वर्षीं या शहरांत या बाईसाहेबाची स्वारी आली होती त्या वेळेस मि० दुर्गय्या पिल्ले डाक्टर हे जातीनें जाऊन आजारी माणसांचा समाचार घेत होते परंतु या वर्षीं त्यांची ही कंबर खचून गेली आहे. ते आपलें बिऱ्हाड सोडून आजारी मनुष्याकडे जातांना कधींही दृष्टीस पडले नाहींत. नोकराकडून औषधी पाठवीत असतात असें ऐकतों. याचें कारण असें वाटतें कीं गेल्या वर्षीं याणीं फार परिश्रम केले तरी रेसिडेंट साहेब बहादुरांनीं यांची कांहीं बूज केली नाहीं तेणेंकरून त्यांचे मनांतील उत्साह कमी झाला असावा अथवा गेल्या वर्षीं रा. रा. वामन नारायण तहशिलदार एथें होते ते खबर ऐकतांच डाक्टर साहेबास बरोबर घेऊन आजारी माणसाकडेस जात होते. त्या समागमाचेंच फळ होतें कीं काय अशी शंका ही कित्येक लोक घेत आहेत. असो आतां तरी आमचे डाक्टर साहेबानीं बिच्यारे रोगग्रस्त माणसांचा समाचार घेण्याची योजना करावी.

इकडेस पर्जन्य वृष्टी अतिशय झाल्यामुळें नदी नाल्यास पूर आले होते. उमरावतींत एक आणि खोलापुरांत एक अशी दोन माणसें वाहून गेलीं. शेंकडों घरें पडलीं व हजारों रुपयांचें मालाचें नुकसान झालें. वर्धा काठास धामंत्री ह्मणून गांव होतें तें समूळ वाहून गेलें व बाकीचेही कित्येक गांवांतील घरें वाहून गेलीं आहेत. याप्रमाणें कहर झाला आहे. कळावें. तारीख ८।९।७६ इसवी.

उमरावतीकर
त्र.

## जाहिरात


BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव ऐथील मुंबई ब्यांकेची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्यास तयार आहे. व त्याबद्दलच्या शर्तींची माहिती खामगाव एथील ब्यांकेचे आफिसास अर्ज केला असतां मिळेल.

खामगांव तारीख १४ माहे सप्तंबर सन १८७६ इसवी.

Harry H. Hynes.
Agent.



# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ३० शके १७९८.


## नागपुरास वर्तमानपत्र.

नागपुर प्रांत पुष्कळ मोठा आहे. व त्याखालीं जिल्हे १९ आहेत. इंग्लिश सरकारचा अंमल वऱ्हाडचे पूर्वीं तेथें झाला आहे व तोही इकडच्या सारखा गहाणवट नव्हे, मालकीचा आहे. आणि बाहेरील तरुण विद्वानही इकडच्या प्रमाणेंच तिकडे पुष्कळ गेलेले आहेत. व शहर तर इतकें मोठें व चांगलें आहे कीं त्याच्या मानानें दोन तीनही वर्तमानपत्रांची तेथें वस्ती व्हावी. आमच्या अकोल्याला दोन पत्रें आहेत, सातायाला तीन आहेत असें असतां नागपुरास एकही वर्तमानपत्र नसावें ही त्या प्रांताच्या व शहरच्या सुधारणेस मोठी न्यूनता आणणारी गोष्ट होय असें कोणासही वाटल्यावाचून रहाणार नाहीं.

मागें वेगवेगळ्या वेळीं एक दोन तऱ्हेचीं वर्तमानपत्रें सुमित्र, नागपुरअखबार वगैरे तेथें निर्माण झालीं होतीं पण तीं अल्पायुषी ठरून लवकरच लयास गेलीं. त्यापुढें बरींच वर्षें तेथें वर्तमानपत्र नाहीं. यामुळें तेथील हवापाणी वर्तमानपत्रास मानवत नाहीं व नाशकारक आहे अशी कित्येकांची समजूत होऊं लागली होती पण हल्लीं आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं, अशीही स्थिति असतां तेथें वर्तमानपत्राचा कारखाना मांडण्याचें एका तरुण गृहस्थानीं धारिष्ट केलें आहे याबद्दल आह्मी त्यांची तारीफ करितों.

हे गृहस्थ कोण? अशी सर्वांस सहज पृच्छा होईल ह्मणून आह्मी त्यांस कळवितों कीं रा. रा. चिंतामण रामचंद्र केळकर या नावाचे पुणेकर गृहस्थ जे सुमार तीन वर्षें उमरावतीस आहेत व ज्यांच्या रसीक संभाषणाविषयीं पुण्याकडे व वऱ्हाडांत प्रसिद्धी आहे ते हुशार व उद्योगी गृहस्थ या कामास पुढें सरसावले आहेत. येत्या दिपवाळींत ते नागपुरास वर्तमानपत्र खचित सुरू करणार हें पाहून आह्मांस संतोष होतो. व त्यांच्या प्रयत्नास आड येणाऱ्या सर्व हरकती दूर होऊन त्यांस उत्तम यश यावें असें आह्मी इच्छितों.

नागपुरास तेथील लोक व बाहेरून गेलेले लोक यांच्यांत दुफळी मोठी प्रबल असल्याचें ऐकण्यांत आहे व शिवाय ही वेगवेगळ्या मतभेदाचे वेगवेगळे तट तेथें असतीलच. ह्मणून त्या सर्वांविषयीं चांगलें मनन करून हुशारीनें वागावें व सर्वांशीं सौरस्य राखून वर्तमानपत्राचा पाया दृढ करावा आणि तेथील हवा, तशा कारखान्यास, विवेचक बुद्धीनें वागलें असतां, चांगली पौष्टिक व हितावह आहे असें सर्वांचे नजरेस आणून द्यावे हें फार अवश्यक आहे. व चिंतोपंत त्या प्रमाणें करतील अशी आह्मास उमेद आहे. कारण हें पत्र सुरू होण्यापूर्वींच स्वदेशमित्र, वृत्तधारा, इंदुप्रकाश यांतून अनुकूल व प्रतिकूल लेख प्रसिद्ध होऊं लागले आहेत, सबब फार सावधगिरीचें अगत्य आहे.

## ओसाड गाव कौलानें देण्याविषयीं नियम.

जाहिरनामा नंबर ७९ ता. १ आगस्ट १८७६

मुलुख अमानी हैदराबाद एथें पडीत जमीनी कौलानें देण्याविषयीं पुढें लिहिलेले नियम सरकारानें मंजूर केले ते लोकांचे माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

१. हे नियम जे गाव हल्लीं सगळेच्या सगळे पडित असून स्टेट रिझर्व जंगल खात्याचे हद्दींत नाहींत त्यांस मात्र लागू आहेत.

२. पैमाष खात्याचे सुपरइंटेंडेंट अशा ओसाड गावाचे तीन क्लास करितील.

३. पहिल्या क्लासांतील गाव सरकारांतून तारीख १ माहे एप्रिल सन १८७७ पासून ३० वर्षांचे कौलानें खालीं लिहिलेल्या शर्तीप्रमाणें देण्यांत येतील.

| | |
|---|---|
| पहिलें वर्ष, दुसरें वर्ष, तिसरें वर्ष | सारा माफ |
| चवथें वर्षीं | पैमाष मानानें कमाल सारा बसावयाचा त्याचा पंचमांश |
| पांचवें वर्षीं | दोन पंचमांश |
| सहावें वर्ष | तीन पंचमांश |
| सातवें वर्ष | चार पंचमांश |
| आठव्या वर्षांपासून ३० वर्षांपर्यंत | कमाल आकार |

दुसऱ्या क्लासांतील गावही तारीख १ एप्रिल सन १८७७ पासून ३० वर्षांचे कौलानें पुढें लिहिलेल्या शर्तीं बरहुकूम दिले जातील,

| | |
|---|---|
| पहिलें वर्ष, दुसरें वर्ष, तिसरें वर्ष | सारा माफ |
| ४ थें वर्ष | एक दशांश सारा |
| ५ वें वर्ष | दोन दशांश |
| ६ वें वर्ष | तीन दशांश |
| ७ वें वर्ष | चार दशांश |
| ८ वें वर्ष | पांच दशांश |
| ९ वें वर्ष | सहा दशांश |
| १० वें वर्ष | सात दशांश |
| ११ वें वर्ष | आठ दशांश |
| १२ वें वर्ष | नऊ दशांश |
| १३ वे वर्षांपासून ३० वर्षें पावेतों | कमाल सारा |

तिसरे क्लासांतील गावही ता. १ एप्रिल सन १८७७ पासून ३० वर्षांचे कौलानें दिले जातील. जे गाव तिसरे क्लासांत असतील त्यांची दरबारी वेगळे प्रकारची होईल व ती कमिशनर साहेबांचे मंजुरातीनें अमलांत येईल. अशी दरबारी ठरणें ती कमाल साऱ्याचा एक दशांश व एक पचमांश यांच्या दरम्यान ठरली जाईल.

३. कौलांतील ३० वर्षांची मुदत सरली ह्मणजे सरकारी इतर खालसा गावाप्रमाणें या गावांची पहाणी होऊन सर्वांबरोबर सारखी दरबारी ठरली जाईल.

४. हे गाव ओसाड झाले तेव्हांच त्यांतील वतनदारीचे हक्क मूळच्या लोकांचे रद्द झाले सबब कौलानें गाव घेणारा तोच त्या गावचा पाटील होईल. व गावचा पाटील कामास नाकबगार व चांगले चालीचा असण्या विषयीं जे हमेशाचे नियम आहेत ते त्यास लागू आहेत असें समजावें. तो पाटीलकीचें काम स्वतां करील अथवा तालुका आफिसराच्या मंजुरातीनें गुमास्ता नेमील. दुसरा पटवारी पाहिजे असें अगत्य वाटेल तेव्हां त्याच्या नेमणुकीच्या पैशापुरती मात्र सरकार त्या गावांत दखल करील.

गाव घेणारानें गावांतील आपले कुळाशीं कौलाच्या मुदतीपर्यंत पाहिजे त्या रीतीनें सारा घेण्याचा अपसांत ठराव करावा. त्यांच्यांत वाद पडल्यास कोर्टांतून त्याचा निकाल होईल. कायद्यानें इतर भागांतल्या कुळांस जे हक्क आहेत ते त्या गावांतील कुळांसही आहेत असें सममावें.

६. सरकारचा दर सालचा पैसा पराकाष्ठा दोन हप्त्यानीं घेतला जाईल. आणि हप्ता देण्यास योग्य झाल्यापासून तीन महिन्यांत दिला नाहीं तर कौल रद्द होईल व गाव सरकारांत घेतला जाईल.

७. डिपुटी कमिशनर यांची परवानगी घेऊन कौलदारास आपला हक्क विकण्याची अगर दुसरे रीतीनें कोणास देण्याची मोकळीक आहे.

८. कौलनामा लिहून घेतांना जीं झाडें न तोडतां राखून ठेविलीं पाहिजेत अशीं असतील तीं त्यांत दाखल केलीं जातील, त्याशिवाय जमीन साफ करण्यासाठीं व लागवडीसाठीं पाहिजे तीं झाडें व जंगल तोडण्याचा कौलदारास हक्क आहे.

(हुकुमावरून)
ए जे डनलप
ऑफिसी. से. अ. रेसिडेंट

## रा रा. वामनराव बाळाजी ओझरकर.

एथील डायरेक्टर साहेबाचे हेड क्लार्क रा. रा. वामनराव बाळाजी ओझरकर डिपुटी इन्स्पेक्टरचे जागेवर वाशिमास बदली होऊन गेले ते दहा वर्षें एथें राहून मंडळीशी प्रेमभावानें वागले. व त्यांच्या ठायीं कित्येक उत्तम गुणांची वस्ती होती याजकरितां त्यांस भूषण व त्यांच्या प्रेमास सूचक अशी पद्यात्मक थोडी कविता अल्पमतीनुसार केलेली आहे ती त्यांस व वाचकांस सादर करितों.

श्लोक

१

तारांचा गण अंबरी बहु परी
ध्वांता न तो संहरी ।
होते सोज्वल भूमि सर्व जयिं तो
चंद्र प्रकाश वरी ॥
तैसा वामन एकटाचि स्वकुलीं
उल्हास वृत्ती करी ।
शोभे जो तिलकासमान कुलिं कीं
सत्वांत जेवी हरी ॥

२

सदय हृदय ज्याचें क्रोध कांहीं न वाही ।
सरळ कल मनाचा अंगिं कापट्य नाहीं॥
स्वजन परजनातें सारखी वृत्ति दावी ।
नर वरिति सुशीला कीर्ति त्यांचीच गावी ॥

३

गर्वा कधीं न वरितें हृदयाब्ज ज्याचें ।
पारुष्यभार रसनेस कधीं न पोंचे ॥
उल्लंघि पाद न कदापि सुमार्ग ज्याचा ।
गंभीर फार गमतोचि समुद्र साचा ॥

४

ठेवा तो सकल सुहृज्जनां सुखाचा ।
दाता तो सढळ सदाहि याचकांचा ॥
द्वेष्टा तो परम चहाड निंदकांचा ।
त्राता तो सुगम असे निराश्रितांचा ॥

५

बगीं एकदा देखिली वस्तु, देई
न तोषा पुन्हा, तुच्छ, ती सत्य होई
परी देखतां सर्वदा वामनाला
न कोणा गमे अल्प उल्हास झाला!

**आर्या.**

६

लोकाहितेच्छा जाला,
स्वार्थाहुनि नान्यशी कधीं वाटे
यास प्रत्यय एक न
बहुविध ह्मणतां ह्मणा न हें खोटें ॥

७

असतांहि हडे क्लार्क
अधिकारांचे न दाखवी नातें
स्नेहें तैसें प्रेमें,
वागावि सर्वांसि वर्णवेना तें ॥

८

विद्याखात्यामध्यें,
सत्पुरुषामाजि एक हा गणिला
त्याचें ह्मणणें हें कीं,
"लागो अपकीर्तिचा न डाग मला"

**श्लोक**

९

कनिष्ठावरी प्रीति याची जशी ती
वरिष्ठाचिही यावरी तेवि होती
कसा मत्सरा ठाव होईल तेथें
जनांच्या भल्या बुद्धि उद्युक्त जेथें ॥

१०

सिंक्लेर होता बरवा मनाचा
प्रेमें करी आदर वामनाचा
साही वियोगा न ह्मणूनि याची
अर्था पदाची महती न इच्छी ॥

११

निपुण बहुत पाही ठेवि विश्वास फार ।
अनुदिन दृढ होती प्रेम त्याचे अपार ॥
परि करिच नयातें सोडिना शुद्ध नीती ।
सुमति जन भले जे वागती येच रीती ॥

१२

त्यामागुनी जे अधिकारी आले ।
त्यांनींहि प्रेमास उणें न केलें ॥
जें सत्य त्या कोण कदा विटेल ? ।
येतां करीं रत्न नको ह्मणेल ? ॥

१३

असें वर्ततां सारखी वृत्ति घेतां
कसा वागला वाशिमीं वास चित्ता
अह्मा वाटतीं कारणें यास दोन
हवा चांगली आणि तें काम नूतन

१४

आहे सुमूर्ति तुमची हृदयीं तरी कीं
देखूं तुह्मा न, पडुं वामन राव शोकीं
गेलात, जा, परि अह्मा विसरूं नका हो
ऐश्वर्यपुत्रसुखलाभ तुह्मा निका हो

१५

वियोग तुमचा सदा
बहुत दुःख हो दे मना।
करा सतत लेखनें
मुदित चित्त हो वांमना
कदा न दवडा तुह्मी
उचित संधि हो भेटिची
कशीं मिळति मौक्तिकें
जरि न वृष्टि हो स्वातिची

## वऱ्हाड.

गुरुवारीं व शुक्रवारीं सारा दिवस आकाश मेघांनीं व्याप्त होतें व शुक्रवारीं थोडा पर्जन्य पडला. नदीलाहि थोडें पाणी आलें. हल्लीं पुन्हा हवा चांगली झाली आहे.

कर्नल अलार्डाईस साहेब जुडिशियल कमिशनर या आठवड्यांत हैदराबादेस गेले.

मि० फिटस साहेब असिस्टंट कमिशनर यांची मराठी भाषेची परीक्षा उतरली.

रा. रा. गोविंदराज अप्पा तहशिलदार रजेवरून मोर्शीस परत जाऊन आपले कामावर रुजू झाले.

दारव्ह्यास रा. रा. बाबूराव दत्तात्रय वणीचे शहानवीस यांस नायब तहशिलदार नेमिलें.

रा. रा. चिंतामण रामचंद्र केळकर उमरावतीहून एथें आले आहेत व त्यांनीं नागपुरी कापड कांहीं विकावयास आणिलें आहे. तें एका नेमलेल्या किमतीस विकतात, व त्यांत पाव आण्याची रदबदली ऐकत नाहींत ही गोष्ट पुष्कळ लोकांस केवळ नवीन वाटतें पण हिची फार अवश्यकता आहे. आपले देशांत कापडाचा व्यापार व इतर देखील कित्येक व्यापार लबाडीचे धंदे असे झालेले आहेत त्यांत गिराहीक फसेल तितकें त्यास फसवावें व मालाची ओढवेल तितकी किंमत ओढावी असा प्रचार बहुत असल्यामुळें अजाण लोक फार फसतात सबब अशीं सचोटीचीं दुकानें जितकीं अधिक होतील तितकीं चांगलीं.

नदीच्या पुलाजवळील शहराचे बाजूकडचा लाकडी कठडा जीर्ण झाल्यामुळें गुरें वगैरे पडतात याजकरितां तो बांधण्याची एकूझिक्युटिव इंजिनियर लौकर तजवीज करतील तर फार चांगलें होईल. परवाचे दिवशीं त्या कोपऱ्यावर गायीं गायींचें भांडण होऊन एक गाय खालीं पडून मरण पावली. थोड्या दिवसांमागें पूर्व भागास पुष्कळ लांबलचक कठडा ए० इंजिनियरानीं केला त्याचवेळेस त्यांचें इकडें दुर्लक्ष्य कां झालें तें कळत नाहीं.

खानबहादुर नवाब शाबुदीन साहेब अस्ताची सिकंदराबादेहून परत आले.

उमरावतीचे डिपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण शास्त्री बापट यांचे तीर्थरूपास ११ वे तारखेस देवाज्ञा झाली हें कळविण्यास आह्मांस वाईट वाटतें.

एथील खजिनदार रा. रा. सखाराम मोरेश्वर यांस पोटशूळाचा आजार झाल्यामुळें त्यांनीं ८ दिवसांची रजा घेतली आहे. व त्यांनीं बाळापुरचे नायबतहशिलदार रा. रा. बापू मुकुंद यांनीं आपले गैरहजीरींत काम करावे असा रिपोर्ट केला आहे. काल व परवा खजिना बंद होता.

रा. रा. विनायक रामचंद्र भटवडेकर बी. ए. डिपुटी इन्स्पेक्टर वाशिमाहून एथें येऊन काल दोन प्रहरीं यवतमाळाकडे गेले. रा. विनायकराव भिडे यांचे प्रकरणांत त्यांचे दरमहा २५ रुपयांचे व्यर्थ नुकसान पुष्कळ दिवस झालें. शेवटीं अधिकाऱ्यांची त्यांवर नजर पोचून त्यांची पहिले पगाराची जागा त्यांस मिळाली याबद्दल आह्मांस संतोष वाटतो. विनायकरावांनीं वाशिमास फार चांगले रीतीनें काम केलें असें समजतें याचप्रमाणें ते यवतमाळासही करून अधिकाऱ्यांची प्रीति विशेष संपादितील असें आह्मी इच्छितों. असें ऐकण्यांत आहे कीं यवतमाळचे डिपुटी कमिशनर त्यांस चहात नाहींत व त्यांस यवतमाळास पुन्हा पाठवूं नये असेंही त्यांचें मत होतें. हें खरें असेल तर आह्मांस वाटतें कीं अशा मोठ्या अधिकाऱ्यांनीं असा दुराग्रह धरणें चांगलें नाहीं. नेटिव कामदारांस त्यांचे चांगले कामाबद्दल उत्तेजन द्यावें व त्यांवर प्रीति करावी. जुन्या खट गोष्टी, ज्यांच्या खरेपणाविषयींही खात्री नाहीं, त्या मनांत आणून उगीच भल्या मनुष्याविषयीं दूषित चित्त व्हावें हें थोरास शोभत नाहीं. डिपुटी इन्स्पेक्टर पुढें वाईट काम करतील तर शासन पावतील हें सिद्ध आहे. मग त्याच्या नेमणुकीस आड येण्याचें कारण काय? अस्तु. आह्मांस हें ही लिहिण्यास संतोष वाटतो कीं डाय. सा. नीं त्यांचें ह्मणणें कबूल केलें नाहीं.

जळगावहून आह्मास एका गृहस्थाचें पत्र आलें आहे त्यांत तो लिहितो कीं, बाबू लक्ष्मण प्रसाद बिन गणेशलाल या नावाचा इसम अकोल्यास विलायती कापडाचें लिलाव करण्यास आले आहेत. त्यांचे बरोबर एक युरोपियन आहे. ते भुसावळेस ७।८ महिने हा धंदा करीत होते. त्यास रेलवे माजिस्त्रेट व रेलवे पोलिस इन्स्पेक्टर यांनीं मनाई केल्यावरून ते वऱ्हाडांत गेले आहेत.

खरेच हे लिलाववाले २ आठवडे अकोल्यांत आहेत व त्यांचा लिलाव मोठा चमत्कारिक व संशय घेण्याजोगा आहे सबब लोकांनीं फसूं नये व पोलिसानें नजर ठेवावी अशी त्यांत आमची सूचना आहे.

रा. रा. वामन महादेव कोलटकर नागपुरच्या डायरेक्टर साहेबांचे शिरस्तेदार व क्युरेटर एथें आले आहेत. चार-दिवशीं परत जातील.

मूर्तिजापुरचे व उमरावतीचे नायब तहशिलदार यांच्या परस्पर बदल्या रहित झाल्या.

लोकलफंड इंजिनिअर आफिसांतील दोन क्लार्क बरतर्फ केले होते परंतु हल्लीं असें समजतें कीं रा. गोपाळराव क्लार्क यास तूर्त कायम करून दुसरा हुकूम होईपर्यंत कामावर ठेवावें असा डिपुटी कमिशनर साहेबांनीं हुकूम दिला आहे. व. मि.

**उमरावती**—ता० १३ सपटंबर १८७६

गेल्या आठवड्यांत पर्जन्य अगदी उघडला होता. तथापि दिवसांतून पांच चार वेळ ढगें येतातच. तूर्त पाऊस न पडेल तरच बरें.

गेल्या पांच सहा दिवसांत पटकीचा उपद्रव बराच होता ह्मटला तरी चालेल या सपटंबर महिन्यांत आजपर्यंत निदान १००।१२५ तरी मनुष्यें ह्या रोगानें धरलीं असावीं. तथापि एक चतुर्थांशपेक्षां जास्त मरतात असें ऐकिवांत नाहीं. कधीं ह्या बाईचें एथून जाणें होईल तें होवो.

गेल्या रविवारीं येथील आ० माजिस्त्रेट व तहशिलदार इ०" बड्या लोकांच्या मंडळींत एक लायब्ररी स्थापन झाली. मुसलमान लोकांकारितां ही मुद्दाम स्थापिली आहे असें कळतें. खरोखर एवढ्याशा शहरांत हल्लीं एक लायब्ररी आहे तीच चालण्याची मारामार तोंच दुसऱ्या लायब्ररीचा जन्म झाला. पहावें कशी काय चालते!

एथील सर्वेर रा. वामनराव यांस १५० रुपये पगार झाला हें ऐकून त्यांचे मित्र मंडळीस संतोष होईलच.

हल्लीं आगगाडी नियमित वेळेवर येते हें एक सुचिन्ह होय. आतां ज्या दिवसाची त्याच दिवशीं लोकांस डांक मिळते.

इलिचपुरच्या लोकलफंड इंजिनियरची बदली होऊन बुलढाण्याचे लोकलफंड इंजिनियर इलिचपुरास येणार असें समजतें. ह्यांतील कारण काय तें समजत नाहीं.

## वर्तमानसार

बारामती— या मुलखांत आज तारखेपावेतों एक थेंबसुद्धां पाऊस पडला नाहीं. पुण्यापासून उरळी जेजुरी वगैरे आठकोस पाऊस आहे. व तेथपासून पश्चिमेस पाऊस व पिकें उत्तम आहेत, तसाच सातार प्रांत. पण इकडील देशांत मृगापासून पाऊस नाहीं, बाजरीचें पीक अजी बुडालें व आणखी असें ऐकतों कीं, काशीपासून रामेश्वरापावेतों ह्मणजे इंदूर, वऱ्हाड, खानदेश हैदराबाद गंगथडी इतक्या टापूंत व सोलापुरासही पाऊस नाहीं असें ऐकत होतो पण अलीकडे मघा नक्षत्राचा पाऊस वऱ्हाड व इंदूर प्रांतीं झडीचा १० दिवस अति पडला; पण वाऱ्याच्या उपद्रवानें पुष्कळ माणसें गेलीं अशीं कोणी कोणाचीं पत्रें आलीं. आतां आमच्या देशांत गुरें वैरणीवाचून मरूं लागलीं व धान्यावाचून लोक हवालदील झाले आहेत. साहेब लोक गावो गाव फिरून हवाल पहात आहेत व कांहीं कामें काढण्याचे योजनेंत आहेत व सावकार लोकांस दिलभरवसा देऊन रयतेस दाणे कर्जाऊ घालवित आहेत. जवारी पेरण्याचाही हंगाम गेला. कोणी कोणी पुढें पाऊस पडेल या आशेवर कोरडे जमीनींत जोंधळे पेरीत आहेत असा हवाल आहे!

कामठीस जो पूर आला तसा ४५ वर्षांत आला नव्हता. गोऱ्या बाजारांतील आठ नऊ शें घरांची नासाडी झाली. सहा नेटिवांचा पत्ता नाहीं. तरी ते बुडून मेले अशी खात्री नाहीं. कोणा युरोपियन लोकास कांहीं इजा झाली नाहीं.

बडोदा रेल्वेनें माल घेण्याचें बंद केलें होतें; परंतु आतां ३ मणाचे आंतील बिनडग घेण्याची सुरुवात केली आहे.

बलसाड एथें एका कुणब्याचे घरीं २७००० रुपयांची ठेव निघाली. तिजवर सरकारी पहारा ठेविला आहे.

धारवाडाहून ८ वे तारखेची खबर आली आहे कीं तिकडे पर्जन्यावाचून फार हरकत आहे. कपाशीचे पेरे अजून झाले नाहींत. व जवारीचे पेरे बुडाले.

सरकारचा अजमास आहे कीं दिल्लीचे समारंभास ७० राजे जमतील त्यांत हैदराबादचे निजामही येतील.

सिंदे सरकार काशीस जाणार होते. ते कांहीं कारणाकरितां जात नाहींत,

काबुलचे अमीर दिल्लीचे दरबारास येतील अशी बोलवा आहे.

लखनौस डेंगू तापाचा आजार चालू आहे.

न्यू झीलांड एथें रुप्याच्या खाणीचें काम चालू झालें आहे.

सिविल सर्विस—सन १८७८ पासून सिविल सर्विसच्या परिक्षेकरितां १९ वर्षांची इयत्ता टरली आहे.

पंजाब कुरियरचा खोकंदचा बातमीदार लिहितो कीं, रशियन लोक तेथें पुष्कळ फौज जमवीत आहेत व त्यांनीं त्या प्रांतांत बारा शहरें घेतलीं.

फ्रान्स देशामध्यें गतवर्षीं व यंदा आतिशय चांगल्या प्रकारचीं पिकें आलीं व हल्लीं फ्रान्सचें वर्षाचें सरकारी उत्पन्न एकशें आठ कोटि रुपयांचें आहे.

मि० पिल्किंगटन नांवाच्या फ्लयांटर युरोपियनानें बिगाऱ्यास मारहाण केली त्यामुळें तो मेला. खुनाबद्दल चौकशी होऊन जज्जानें त्यांस आठरा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा दिली असें समजतें.

काश्मिरमध्यें महाराजांनीं पांच वर्षांचा करार करून मोशो हरमान्स ह्मणून एक फ्रेंच गृहस्थ साधारण शेतकीची सुधारणा करण्याकरितां आणिला आहे. तो तेथें द्राक्षें पिकवून वैन दारू करणार, दुसरा आपळ ह्मणून युरोपियन फळें पिकविणारा दुसरा एक पदार्थ पिकवून त्याची साखर करणार आहे. इं. प्र.

---

**पुरामुळें नुकसान**—बडादा रेलवेचें या वर्षीं फार नुकसान झालें. नर्मदा नदीचा भडोच शहराजवळील ५० लक्षांचा प्रचंड पूल १५०० फूट वाहून गेला. ह्मणजे ६७ कमानी पैकीं २५ कमानी वाहवल्या. प्रत्येक कमान १२॥ फुटाची आहे. या पुलाचें सर्व काम लोखंडी असून पाण्याच्या तळाखालीं २५ पासून ४० फूट खोल लोखंडी खांब गाडलेले आहेत. तशासही धक्का बसला! भडोच शहरांत पाणी खेळत असून नावा चालत होत्या. सुरतेजवळ तापी नदी आहे तिचा पूलही हलूं लागला आहे. यामुळें त्यावरून गाडी चालविणें बंद केलें होतें. मही नदीवरील पुलाचीही अशीच दशा होईल असें भय आहे. थोड्या दिवसांमागें साबरमती नदीला ६० फूट पाणी चढून तिजवरील पूल वाहवला. असे मोठमोठाले अपाय बडोदा रेलवेस घडत आहेत. हें पाहून आह्मास दुःख वाटतें.

गेल्या पंधरवड्यांतलि पर्जन्य चहोकडे अतिशय झाला असें दिसतें. नागपुराजवळ कामठी एथें नदीला पूर येऊन १५०० मनुष्यें गेलीं असें टाइम्समध्यें पत्र छापलें होतें. वर्धा नदीला पूर येऊन कांहीं गाव वाहवले व आगगाडीलाही हरकत झाली. इकडील पयोष्णा नदीला ही मोठा पूर येऊन दोन दिवस उतार बंद होता असें कळतें.

---

## नोटिसा.

पांडू वल्लद भगवान चिमटे पाटील मौजे माळेगाव तालुके अकोट यास कुंगरी मर्द पांडू चिमटीण हल्लीं वस्ती मौजे धामणगाव तालुके जळगाव इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्नास सुमार दहा अकरा वर्षें झालीं तेव्हांपासून आजपर्यंत सदर्हू मुदतींत तूं मला २ महिनेही वागविलें नाहीं व तसाच लत्ता कपडाही दिला नाहीं; इतकेंच नाहीं तर लग्नांत केलेलीं लुगडें चोळी वगैरे पांघुरणें देखील ताबडतोब वरातीच्या वेळींच सोडून घेतलीं व पुढें १०।११ वर्षांत माझी परत केली नाहीं अगर अन्नवस्त्र दिलें नाहीं. असें असतांही पुढें तूं माझा सांभाळ करशील या आशेनें तुझे नावावर मी आपले आई बापाचे घरीं खर्च खाऊन दिवस काढले पण तूं पुरुषांत नाहींस असें आतां मला पक्कें समजून आलें. करितां आतां तुझ्या नावावर बसण्यांत हाशील नाहीं- कारण पुढेंही तुझ्या हातून माझा संसार होण्याची आशा मुळींच राहिली नाहीं. ह्मणून ही नोटिस मुद्दाम दिली आहे तर ही पावल्यापासून १५ दिवसांचे आंत मला फारकत देऊन मोकळें करावें. याप्रमाणें सदर्हू मुदतींत फारकत तूं न दिल्यास गंधर्वाचा दुसरा नवरा करण्याची कायदेशीर रीतीनें तजवीज करीन व लग्नाचा हक्क रद्द करून ११ वर्षांचा अन्नवस्त्राचा खर्च सरकारांत अर्ज करून भरून घेईन हें खूप समजावें. कळावें. तारीख १३ माहे सेप्टेंबर सन १८७६ इसवी.

(सही) कुंगरी मर्द पांडू चिमटे
वस्ती धामणगाव तालुके जळगाव इचे हातची निशाणी बांगडी-

---

### नोटिस

चंद्रभान वल्लद विठोबा सांगुळवेढे खंडाळेकर हल्लीं वस्ती मौजे अदमपुरवाडी नजीक तेल्हारें तालुके अकोट यांस अर्जी मर्द चंद्रभान वस्ती पातुर्डे खुर्द तालुके जळगाव इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुझ्यासी माझें लग्न झाल्यास सुमार २० वर्षें झालीं तेव्हांपासून तूं जनरीतीप्रमाणें संसार केला व तुजपासून मला एक मुलगी झालेली आहे. व पुढेंही माझा संसार व्हावा अशी इच्छा आहे परंतु कम नशीबानें ६ वर्षें झालीं तुला पिसें लागलें आहे तेव्हांपासून फार खराबा निघाला आहे- मी तुझे घरीं आले तर तूं बोलत नाहींस, घरीं रहात नाहींस, चार चार दिवस जंगलांत तर जगलांत रहातोस, अन्नावांचूनही आठ आठ दिवस रहातोस, तुला भ्रम झाला आहे, व जनावराची कळा आली आहे तर पुढें माझी निभावणुक तुझ्या हातून होणें नाहीं हें मला पक्कें समजून आलें आहे. याजकरितां तुजपासून आपली सुटका करून घ्यावी हेंच आतां नीट असें मनांत आणून तुला ही नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत तूं आपले लग्नाचे हक्काबद्दल फारखत लिहून पाठऊन द्यावी ह्मणजे मी गंधर्वाचा दुसरा घरठाव करीन. आतां थोडे महिन्यामागें तुजला अशीच एक नोटिस दिली होती परंतु जबाब दिला नाहींस सबब ही दुसरी दिली. आतां नोटिसीप्रमाणें मुदतशीर तुजकडून तजवीज न झाल्यास तुझा लग्नाचा हक्क कायदेशीर रीतीनें रद्द झाला असें समजून मी दुसरा घरठाव करीन मग मजवर तुझा कांहींएक वारस चालणार नाहीं हेंच पक्कें समजावें. कळावें तारीख १३ सप्तंबर सन १८७६ इ.

(सही) अर्जी मर्द चंद्रभान
निशाणी हातची बांगडी

---

### नोटिस.

लक्ष्मण वल्लद सयाजी बोरमाळी वस्ती पास्टूल प्रगणें पातुर शेखबाबू तालुके बाळापुर ज़िल्हे अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडे आमची बाकी सन १८७४ सालची येणें असून त्याचा आजपर्यंत हिशेब करून रोखा अगर रुपये दिले नाहींत याजकरितां या नोटिसीच्या तारखेपासून १ महिन्याचे आंत येऊन आपला हिशेब करून रोखा अगर रुपये द्यावे न दिल्यास रीतीप्रमाणें तुमच्यावर फिर्याद करून नोटिसीचे खर्चासुद्धां रुपये भरून घेऊ, कळावें तारीख ९ माहे सप्तंबर सन १८७६ इसवी.

(सही) वामन पांडुरंग भट मुळे
वस्ती पातुर शेखबाबू
दस्तुर खुद्द

---

## जाहिरात

---

### न्यायप्रकाश

सदर्हू मासिक पुस्तकांत इंडियन लॉ रिपोर्टांत प्रसिद्ध झालेले सर्व हायकोर्टांचे निवाड्यांचें मराठींत हशील, मुंबई हायकोर्टाचें सविस्तर व इतर हायकोर्टांचें थोडक्यांत देण्यांत येईल. शिवाय कायद्यासंबंधी विषयांचें विवेचन सवडीप्रमाणें करण्यांत येईल. इंग्रजी अंकाचे मानानें या मासिक पुस्तकाचीं पानें ३० पासून ४० होतील. वर्षाची अगाऊ किंमत दोन महिन्यांचे आंत देणारास रुपये ४॥८ व शिवाय टपाल हशील ॥६. मागाहून देणारास टपालहाशिलासुद्धां ७ रुपये.

अहमदनगर ३० जुलई १८७६.

रामचंद्र कृष्ण जोशी.
शंकर रामचंद्र हतवळणे.
न्यायप्रकाशकर्ते अहमदनगर

---

## नोटिस

---

### जलम आणि खामगाव स्टेट रेलवे.

लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावें कीं जी. आय. पी. रेलवेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासेंजर (उतारकरू) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास .................. १ रुपया
नेटिव लोक .... ............... ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

घाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोचविण्याचा खर्चही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.

---

## जाहिरखबर.

### IN THE PRESS

THE CODE OF CIVIL PROCEDURE

Acts VIII of 1859 & XXIII of 1861. With Decisions contained in the Bombay High Court and in the Indian Law Reports.

Understanding that the want of this book in English is much felt by the candidates for the Offices of Pleader and Subordinate Judge, we have undertaken the publication of it. It will be ready at the beginning of September next. The price of the book will be Rs. 2--8 besides postage for those who subscribe their names before the end of August next and Rs. 3 afterwards exclusive of postage. Letters should be addressed to the undersigned or to the Manager of the "Dnyan Chaxu."

GUNGADHUR VISHNOO LIMAYE
Pleader,
Residing in Shunwar Peit
Poona.

PANDURANG BACHAJEE
Pleader,
Shanwar Peit Poona near
Panjrapole,

Poona
17th July 1876

---

हें पत्र अकोलें एथें खेडराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. म.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १०    अकोला रविवार ता० २४ माहे सप्तंबर सन १८७६ इ०    अंक ३८

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| टपालहशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| " अखेर | १ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा.

घाशीराम गुलाबराय परदेशी रहाणार मूर्तिजापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आह्मी तुमचा देवळाचा नुस्ता मजुरीचा मक्ता रुपये ५०० पांचशास घेतला होता. व गोटा, वीट, चुना वगैरे सामानाचा पैसा रीतीप्रमाणें नगदी घ्यावा असें ठरलें. त्याप्रमाणें तुमचें काम तयार करून दिलें. व गोटा, वीट, चुना वगैरेचे कामांत उक्त चारशें रुपयें घेऊन तुमचे खात्यावर सही करून दिली. बाकी रुपये ५५० साडेपांचशें मजुरी, गोटा, वीट व चुना याचा जो हिशेबानें पैसा होईल त्यांत तुह्मी वर लिहिल्याप्रमाणें वसूल दिला तो मजरा घेतां बाकी रुपये आठ दिवसाचे आंत द्यावे. याप्रमाणें न दिल्यास रीतीप्रमाणें दिवाणी कोर्टांत नालिस करणें भाग पडेल व सरकारी इंजिनियरिंगप्रमाणें जो पैसा होईल त्याप्रमाणें घेतला जाईल. करितां नोटिस दिली आहे तर खर्चासुद्धां रुपये द्यावे अगर तुमचें काय उत्तर असेल तें मुदतीच आंत द्यावें म्हणजे तजवीज केली जाईल. लोभ असावा. तारीख २० सेप्टेंबर सन १८७६ इसवी.

( सही ) मातादीन रामप्रसाद

दस्तुर खुद.

### नोटिस.

गुनी मर्दे जयराम शिंपी रहाणार मौजे खेडें खुर्द तालुके जळगाव इलाखे खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमची कनिष्ठ मुलगी नामें पुनी मर्दे मोतीराम शिंपी ही माझी विवाहाची बायको असून दोन वर्षांपासून ती आपले वयांत आली असतां माझे घरीं एक वर्ष नीट जनाचे रीतीप्रमाणें वागली. या वर्षांत मी तिला तुमचे घरून व तुमच्या वडील मुलीचा नवरा राजाराम वल्लद रामजी शिंपी नागावकर याचे घरून १०।१२० वेळ माझे घरीं आणली असतां ती एक किंवा दोन दिवस चांगली राहून पुनः माझे घरून तुमचे घरीं किंवा तुमचा जावई याचे घरीं पळून जात आहे. याचें कारण तुमचेकडून असें समजतें कीं तुह्मी खेडें या गावीं नवऱ्यापासून विभक्त रहाता व तुमचें पोट तुमच्यानें भरवत नसल्यामुळें माझी बायको तुमची मुलगी स्वरूपानें चांगली व तरणी आहे करितां तिजकडून तुह्मी जारकर्म करून त्या द्रव्याचे उत्पन्नावर तुह्मी आपला उदरनिर्वाह करिता. असें जनांत प्रसिद्ध दिसत आहे कीं माझी बायको खाती पिती असून तुह्मी तिला माझे घरीं येऊं देत नाहीं व तुमचा जावई कांहीं कांहीं दिवस ठेवितां. करितां ह्या नोटिसीनें तुह्मास असें कळवितों कीं नोटिस पावल्यापासून तुह्मी व तुमचा जावई राजाराम याणें माझी बायको पुनी ही माझे घरीं पंध्रा दिवसांचे आंत आणून घालावी व ती पुन्हा तुमचे घरीं किंवा तुमच्या जावयाचे घरीं पळून गेल्यास तुह्मी उभयतांनीं तिचा अंगिकार करूं नये. नर तुह्मीं ह्यांत लिहिल्याप्रमाणें कोणताही अमल न केल्यास तुह्मावर व तुमचे जावयावर आह्मास योग्य कोर्टांत माझे लग्न पूर्वी तुमचे मुलीशी झालें त्याचा खर्च रुपयें ४०० शिवाय आतां मी पुनर्विवाह करील त्याचा खर्च रुपयें २०० मिळून ६०० रुपयांचा दावा नोटिसीची मुदत संपतांच केला जाईल हें खूप समजावें कळावें तारीख १६ सप्टेंबर सन १८७६ इसवी.

( सही ) मोतीराम वल्लद वेडू शिंपी

कसबे जळगाव

दस्तुर खुद

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस: —

वि. वि. चांदुरबाजार जिल्हा इलिचपुर एथील १० महिन्यांपासून बदली होऊन आलेले नेटिव डाकतर बसवया आया यांची बदली शहर इलिचपुर एथें झाली तेव्हां तारीख १४ माहे सपटंबर रोज गुरुवारीं ते शहरास रवाना होऊन गेले. जाण्याचे पूर्वी डाकतर यास सर्व लोकांनीं बोलाऊन रा. शिवाजी पोलिस पाटील यांचे बठकींत समारंभ केला. अत्तरदान, पानदान, गुलाबदान, दिलें वकयकानी मनाग्य बोलून पूर्ण केलें. डाकटरांनींज भाषण केलें तें असे कोमळ कीं सर्वांस रुचि येऊन त्यांचे मन अभ्यास सोडून जाऊं नये असें झाल्यामुळें सर्वांनीं बहूत खुष होऊन आमची थोडी आठवण राहावी ह्मणून मानपत्र वाचून दाखविलें त्यांतील हाशिल:—

मानपत्र—आह्मी तमाम लोक साहू वेपारी रयत व सरकारी नवकर आपले राजीखुशीनें लिहून देतों कीं बसवया डाकटर आस्पताल चांदुर तालुके इलिचपुर हे डाक्तरीचे कामीं एथें असून त्यांनीं तमाम लोकांस खुष व राजी व आबाद ठऊन दवाई वगैरेची सोई चांगले रीतीनें ठेवून लोकांचे कल्याण व दुःखनिवृत्ति केली हे गृहस्थ चांगली डाक्तरी जाणतात व यांस तेलंगी व उरदु येऊन थोडें संस्कृत येतें. शिवाय हे नामांकित व खानदानीचे असून हुशार आहेत. यांची चालचलन चांगली असून हे गृहस्थ अजमास चांदुर एथें १० महिने झाले बदली होऊन आले दिवसापासून कोणताही रोगी रात्रीं किंवा दिवसा जेव्हां गेला तेचवेळेस त्या रोगाची परीक्षा करून त्याचे मनोरथाप्रमाणें दवाई देत गेले. त्यापासून रोगाची निवृत्ति होत गेल्यानें सर्व लोक चांगले खुष व आनंदांत राहिले. रोगाची मुळींच तुटली असें झालें होतें आणि चांदुरचे आसपास हवेचा उपद्रव झाला तेव्हां यांणीं दवाई रात्रीं किंवा दिवसा जेव्हां कोणी आले तेचवेळेस मेहनत घेऊन द्यावी त्यामुळें पुष्कळ लोकांचे प्राण वाचले. १० महिन्यापूर्वी आस्पतालांत रोगी २० वीस या २५ पंचवीस येत होते. आणि हे गृहस्थ आले दिवसापासून दररोज चांदूरचे व आसपासचे रोगी पांच सात कोसांवरील अस्पतालांत येऊन दवाई घेतात यामुळें सकाळीं व सायंकाळीं दवाखान्यांत पुष्कळ लोकांचा जमाव होत होता कीं डाक्टर कोठें बसले हेही देखील दिसत नव्हतें.

याप्रमाणें हे गृहस्थ वैद्यक्रियेंत नामांकित व दुसऱ्यास दुःखांतून मुक्त करणार, परोपकारी आहेत. याचें वर्णन आह्मी जितकें केलें तितकें थोडेंच आहे. हल्लीं इलिचपुरास बदली होऊन जातात यामुळें आह्मास दुःख होत आहे. असे गृहस्थास दयाळु सरकारानीं आमचे वस्तींत ठेविल्यानें आह्मावर फार आभार होतील पण आमचें अस्पितळ हलकें असल्यानें दयाळु सरकारास अशे जागीं या गृहस्थास पुन्हा आणण्याची विनंती आमचेकडून करवत नाहीं वगैरे.

या मानपत्रावर रयत व वेपारी व सरकारी व साहुकार लोकांच्या सह्या १०० झाल्या.

याप्रमाणें मानपत्र वाचून दाखविल्यावर सभा विसर्जन झाली आणि हे गृहस्थ आपले बदलीचे जागीं रवाना झाले तव्हां त्यांचे समागमें मनुष्य ५०० पासून ७०० होते.

याप्रमाणें मजकूर झाला तो आपणास कळविला आहे. प्रसिद्ध करण्याची मेहेरबानी व्हावी. ता. १५ सप्टंबर १८७६

एक चांदुरकर

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि, वि. मेहेरबानगी करून मी हें पाठविलेलें पत्र छापून प्रसिद्ध केल्यास आपले सर्वांवर मोठे उपकार होतील.

वास्तवीक पाहिलें असतां म्युनिसिपल कमीटी ही केवळ लोकांच्या फायद्याकरितां आहे आणि ज्या रीतीनें आपलें हित होईल त्या रीतीनें करून घेणें हें लोकांचें कर्तव्यकर्म होय. परंतु ह्या देशांत ज्या हल्लीं म्युनिसिपालिट्या आहेत त्यापासून लोकांस जितका फायदा व्हावा तितका होत नाहीं. याचें कारण पाहूं गेल्यास एकच आहे असें नाहीं. तर म्युनिसिपालिटीविषयीं राहूं द्या या उमरावतींतील म्युनिसिपालिटीचा जर विचार केला तर लोकांस फायदा न होतां उलटा त्रास होतो असें ह्मटल्यास हरकत नाहीं. म्युनिसिपालकमीटीचें काम कसें चालतें; त्यांत ठराव काय होतात ही माहिती लोकांस समजणें अगदी जरूरीचें आहे असें मला वाटतें.

अलिकडे सुमारें एक वर्षापासून ह्या कमिटीकडून तीन च्यार प्रकारचे कर निघाले आहेत त्यांचा घोटाळा इतका झालेला दिसतो कीं कोणावर किती कर बसवावयाचा ह्याचाच निकाल न होतां भलत्याच लोकांकडे भलतीच रकम लिहून दिलें गेलीं. ज्यांनीं तक्रारी केल्या त्यांचीं तीं बिलें दुरुस्त झालीं; बाकीचीं अद्याप तशींच घोटाळ्यांत आहेत. म्युनिसिपल फंडांतून जीं अवश्यकतेचीं कामें करावयाचीं तीं एकिकडेच रहातात. नुकतेंच एक "काटन यार्ड" झालें आहे त्या सभोंवतीं दगडाचें उत्तम आवार बांधलें आहे. निदान दोन तीन हजार रुपये खर्च तरी त्या कामास झाला असेल. हें काम झालें नसतें तर त्यावांचून लोकांचें फारसें नडलें नसतें. शहरांत दुरुस्ती करण्याकडे फारच थोडें लक्ष्य एथील म्युनिसिपालिटीचें आहे. एवढ्या मोठ्या शहरच्या प्रसिद्ध रस्त्यांत रात्रीचे दिवे असणें अगदीं अवश्य आहे. शहरांतील लहान रस्ते व गल्ल्या फारच गलिच्छ असतात त्या सफा ठेवणें हें कमिटीचें काम होय. शहरांतील रस्त्यावर मुरूम व रेती टाकून ते चांगल्या रीतीनें ठेविले पाहिजेत. मांग्यांनें पाणी नेण्याचा बंदोबस्त हल्लींच्याहून जास्ती असला पाहिजे; भंगी लोक ह्या शहरास आणवी असल्या खेरीज लोकांचे तारदखानें नेहमीं साफ होणार नाहींत इत्यादि कामांचा कमीटींत प्रथम विचार झाला पाहिजे. कमीटींत जे ठराव होतात ते व कमीटीचा जमाखर्च हीं वेळोवेळीं वर्तमानपत्रांतून छापून प्रसिद्ध झालीं पाहिजेत. म्यानेजिंग कमिटी ही वारंवार भरते तेव्हां त्या कमिटींत चांगले हुषार, सर्व माहिती देणारे असे लोक सभासद नेमावे. ही कमिटी जर ह्या शहरांतील लोकांकरितां आहे तर मेंबर लोकांची निवडही शहरच्या सर्व लोकांची सभा भरवून त्यांच्या अनुमतानें करावी. उगाच एकादा श्रीमान मनुष्य असला ह्मणजे तो

हें काम उत्तम चालवील असें बिलकुल नाहीं. विद्वान लोक अशा कामीं फार उपयोगाचे होतील व ते लोकांच्या अवश्यकता कमिटीपुढें चांगले रीतीनें आणूं शकतील असें मला वाटतें.

तूर्त हें पत्र मी इतक्यावरच पुरें करून वर लिहिलेल्या मजकुरांचा कसा विचार होतो ह्याची वाट पहातों. कळावें तारीख १४ माहे सपटंबर सन १८७६ इसवी. मुक्काम उमरावती.

आपला एक
"शहरवासी."

---

## धर्माचरण.

आर्या.

जरि इच्छितां करावें,
सद्धर्माचें सदा अनुष्ठान;
करणें अवश्य तुह्मां,
आधीं तुमचें अशुद्ध शुद्ध मन॥१॥
धरितां जरी मनीषा,
श्रेष्ठ करावें त्वकीय आत्म्यातें,
स्वीकारावें तुह्मी,
सोडुनि दुर्मद सदैव विनयातें॥२॥
इतरांस इच्छितां करूं,
सात्विक धार्मीक सत्पथी सुगुणी;
दाखविणें उचित तुह्मां,
निजवतन चांगलें तया द्विगुणी ॥३॥
हेत्वर्थ जीवनाच्या
स्थितिकर्में वर्णिलीं बहू असलीं;
त्यजितां दोष न लागे,
दृष्टि प्रभुच्या पदीं सदा असली॥४॥
कामाकाजामध्यें,
व्यवहारीं आठवी प्रभूचरण;
धार्मिक पुरुष तयाला,
जाणावें योग्य हें सदाचरण॥५॥
ग्रहगण फिरुनि रवीच्या,
सभोंवतालीं न सोडि मर्यादा;
तैसे धार्मिक वागुनि,
संसारीं सोडिती न ईशपदा॥६॥
प्रभुवर प्रीती करणें,
मनुजांचें मुख्य कर्म हें कथिलें;
ज्ञात्यांनीं साधूनीं,
अवश्यक पुस्तकीं असें लिहिलें ॥७॥
ईश्वरप्राप्तीकरितां,
समयाविशेषीं विरक्त मनुजाला;
होणें अवश्य कारण,
साधन वैराग्य मोक्षमार्गाला ॥८॥
प्रभु पूर्णकाम आहे,
भक्तांचे सकल हेतु संपूर्ण;
करितो प्रीतीयोगें,
पूर्ण क्षण तो न लागतां तूर्ण॥९॥
लौकिक मार्गानें वा,
संपत्तीनें तसेंच अन्यानें;
जगदीश्वर नच पावे,
विषयाच्या पाविजे विरक्तीनें १०
विषयाच्या सौख्यानें,
नानंदित व्हावया करा यत्न;
सत्य न सुख त्या पासुनि,
घेणें सुख पाहुनी जसें स्वप्न॥११॥
अतएव विवेकानें,
विषयसुखाशीं विरक्त होऊन;
व्हावें कृतार्थ मनुजें,
प्रभुपादीं बहुत प्रीति ठेवून १२
आनंद धर्मपंथीं,
मानाया मानवा असे युक्त;
तदितर वस्तूठायीं,
योग्य नसे राहणें नरा सक्त ॥१३॥
परमात्म्याचे ठायीं,
रत होउनि मानुनी सदा हर्ष;
सत्कर्मशील होई,
त्याचा परमेश घे परामर्ष॥१४॥

---

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुद्ध ७ शके १७९८

---

## जुडिशियल खात्याचा रिपोर्ट

गुदस्त ह्मणजे सन १८७५ सालचा वऱ्हाडच्या दिवाणी व फौजदारी कामाचा रिपोर्ट जुडिशियल कमिशनर साहेबांनीं केलेला रेसिडेंट साहेबांच्या तारीख २५ माहे आगष्ट सन १८७६ इसवीच्या अभिप्राया सहित छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील माहिती आह्मी आपले वाचकांकरितां एथें घेतों.

वऱ्हाड प्रांतांत न्यायाचीं कोर्टें ७३ आहेत. गुदस्त सालीं ६९ होतीं त्यांत ४ नवीं ह्मणजे केळापुर व मंगरूळ या दोन तहशिली व शिगाव आणि अंजनगाव एथील दोन स्पेशियल माजिस्त्रटचीं कोर्टें मिळून ७३

जुडिशियलखात्याचे भाग दोन, फौजदारी आणि दिवाणी त्यांची क्रमानें माहिती अशीः—

### फौजदारी

या सालांत एकंदर फौजदारी हुकद्दमे १४८२२ झाले. यांत १२६२ मुकद्दमे करण्याजोगे नव्हते ह्मणून पोलिसानेंच गाळाऊ केले व ३२९ मुकद्दम्यांतही अपराधी विनाकारण धरले ह्मणून माजिस्त्रटानीं सोडून दिले. तेव्हां बाकी या सालीं खरे गुन्हे घडले ह्मटले ह्मणजे १३२३१ हे गुदस्त सालापेक्षां १२७९ नीं अधिक आहेत. व इतका नंबर वाढण्याचें कारण असें आहे की पोलिस आक्टाप्रमाणें हल्लीं जे मुकद्दमे केले जातात ते वेगवेगळया मनुष्यावर वेगवेगळे केले जातात. वाशिम जिल्ह्यांत गुदस्त सालीं शेकडा ३० मुकद्दमे वाढले याचें कारण असें झालें आहे कीं चोरी व घरफोडीच्या गुन्ह्याच्या रिपोर्टांची तिकडील पहिली रीति चुकीची होती व ती दुरूस्त केल्याच्या संबंधानें तिकडे मुकद्दमे जास्त झाले.

गुन्ह्यांचें थोडक्यांत टिपण असें आहे—नाणीं, स्टांप आणि वजनें मापें यांच्या संबंधानें या सालांत ७३ गुन्हे झाले, गुदस्त सालीं ७६ झाले होते. पब्लिक जस्टिस विरुद्ध गुन्हे या सालीं २२६ झाले, मागील सालीं २५६ झाले होते. सरकारी नोकरीसंबंधी गुन्हे या सालीं १६ झाले. खोटया साक्षीचे गुन्हे या सालीं १७ झाले, मागील सालीं ११ होते. खोटया च्यार्यांचे गुन्हे ९ झाले, मागिल सालीं १६ होते. खोट्या दस्तैवजाचे गुन्हे ५ झाले, मागील सालीं १३ होते. लोकपीडेचे गुन्हे ११२७ झाले, गुदस्त सालीं १८९० होते. लोकांच्या स्वस्थतेविरुद्ध १७२ झाले. मागील सालीं ११७ झाले होते. खून ३० झाले. मागील सालीं ३१ झाले होते. खुनाचे प्रयत्न १२ झाले, मागील सालीं इतकेच होते. सदोष मनुष्य वध ५ झाले. मागील सालीं ७ झाले होते. दरवडे ९ झाले, गुदस्तां ८ झाले होते. जबरीच्या चोऱ्या ५२ झाल्या, गुदस्तां ३२ झाल्या होत्या. घरफोड्या चोऱ्या १०२६ झाल्या, मागील सालीं ९७६ झाल्या होत्या. मालाविरुद्ध जबरीशिवाय गुन्हे गुदस्तेपक्षां १८ कमी झाले. व चोऱ्या ३८४१ ह्मणजे मागील पेक्षां ९८ अधिक झाल्या. विश्वासघात व पैशाचा गैरउपयोग हे गुन्हे मागीलपेक्षां २२६ या सालीं अधिक झाले.

या सालीं घडलेल्या एकंदर गुन्ह्यांतील ८०९६ गुन्हे पोलिसाचे अखत्यारांतील व ४४३५ बिनअखत्यारांतील होते. पोलिसानें आपले अखत्यारांत धरलेले गुन्ह्यांपैकीं ६२३३ माजिस्त्रटाकडे पाठविले व बाकीच्यांचा सालअखेरपावेतों पत्ता लागला नाहीं. १६९०० मनुष्यांवर आरोप होते त्यांतील ६३५४ मनुष्यें शिक्षेशिवाय सुटलीं व १०४६५ लोकांस शिक्षा झाल्या. आनररी ह्मणजे स्पेशियल माजिस्त्रट यांजकडून १५२५ अपराध्यांचे निकाल झाले. आर्डिनरी माजिस्त्रटकडे १४८४२ मनुष्यांचे निकाल झाले. आणि जिल्ह्याचे माजिस्त्रटाकडे ५९३ मनुष्यांचे निकाल झाले. याजवरून आनररी माजिस्त्रटांनीं पुष्कळ काम केलें व सरकारास मोठें सहाय दिलें असें रेसिडेंट साहेबानीं आपले अभिप्रायांत ह्मटलें आहे.

एकंदर जीं कामें झालीं त्यांत शेकडा ९०॥ कामें नेटिव न्यायाधिशांनीं केलीं व ९॥ युरोपियन न्यायाधिशांनीं केलीं. यावरून तहशिलदार लोकांनीं कामें पुष्कळ केलीं असें रेसिडेंट साहेबांस स्पष्ट दिसून आलें आहे वणी जिल्ह्यांत शेकडा ९१ कामें तहशिलदारांनीं केलीं आहेत पण त्या जिल्ह्यांत लोकवस्ती विरळ आहे, ह्मणून त्यांच्याकडे भरवस्तीच्या ठिकाणापेक्षां मुकद्दमे कमी असतात व अकोला आणि उमरावती जिल्ह्यांतील तहशिलदारावर फौजदारी कामाचा फार मोठा बोजा आहे.

डिपुटी कमिशनर लोकांनीं क्रि. प्रो. चे ३६ वे कलमाप्रमाणें गुदस्त सालीं २६२ मुकद्दम्यांची चौकशी केली होती, या सालीं २१० ची केली. त्यांत शेकडा ४५स शिक्षा दिल्या, ५७ इसमास सेशन कमीट केले. व त्यापैकीं ४८ स शिक्षा झाल्या. यावरून रेसिडेंट साहेबांस वाटतें कीं मोठ्या फौजदारी कोर्टांना या सालीं काम भारी नव्हतें.

मुकद्दम्यांच्या निकालाला सरासरी दिवस फार लागू लागले असें रेसिडेंट साहेबांचे लक्ष्यांत येऊन त्यांनीं न्यायाधिशांस तसें न होऊं देण्याकडे चित्त पुरवावें अशी सूचना केली आहे व अकोले जिल्ह्याकरितां विशेष केली आहे. पोलिसाकडून आलेल्या मुकद्दम्याला सरासरी ४॥ दिवस लागले हे फार अधिक आहेत असें रेसिडेंट साहेबांचें मत आहे.

अपराधी लोकांची जातवारी दिलेली असते तिजवरून रेसिडेंट साहेब ह्मणतात कीं, इतर जातीपेक्षां मुसलमान जातींत गुन्हे जास्ती होतात. या वर्षीं मुसलमान गुन्हेगार २१७८, ब्राह्मण ५८० व मारवाडी ५४२ आहेत. वणी जिल्ह्यांतील गुन्हेगारांच्या जातवारीचें टिपण प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून दिसतें कीं, सोनार, शिंपी, तेली, साळी, व इतर जातीचे लोक त्यांत मुळींच नाहींत त्यावरून रेसिडेंट साहेबांस मोठा संशय उत्पन्न झाला आहे. ते ह्मणतात कीं, या जातीचे सर्व लोक या एकाच सालांत इतके चांगले कशानें वागले कीं त्यांपैकीं एकही कोणी अपराधी झाला नाहीं! वणजारी लोक गेले सालीं १५९ गुन्हेगार होते. या सालीं ११६ आहेत व त्यांपैकीं ६६ शिक्षेशिवाय सुटले, २९ ना दंड झाला, १७ ना फटके बसले, ४९ ना एक महिन्याच्या व त्याच्या आंतील शिक्षा झाल्या, २३ ना दोन महिन्यांपासून एक वर्षापर्यंतच्या शिक्षा झाल्या; व १८जणमात्र ५ वर्षांच्या कैदेंत गेले. यावरून वणजारी लोकांना मोठे गुन्हे न करण्याविषयीं वचक उत्पन्न झाला असावा व त्याला कारण त्यांवर पोलिसाची सक्त नजर हें असावें असें रेसिडेंट साहेबांस वाटत आहे.

लोकांचा चोरीस गेलेला माल या सालीं फारच थोडा सापडला असें रेसिडेंट साहेबांस स्पष्ट दिसून आलें आहे. पण त्यांनीं त्यासंबंधानें या रिपोर्टावर कांहीं लिहिलें नाहीं. पोलिसच्या रिपोर्टावर स्वतंत्रपणें लिहिलें जाईल असें त्यांनीं ह्मटलें आहे.

गुन्हेगारांना तीन प्रकारच्या शिक्षा मिळाल्या त्यांच्या इसमवारीची तीन सालची सरासरी पुढें लिहिल्याप्रमाणें आहे.

| शिक्षा सन | १८७३ | १८७४ | १८७५ |
|---|---|---|---|
| कैद | १६५१ | १३०४ | ११३५ |
| दंड | १०१४४ | ७७९८ | ८८०० |
| फटके | ६७८ | ५३७ | ४२९ |
| बेरीज | १२४७३ | ९६३९ | १०३६४ |

यावरून दिसत आहे कीं फटक्याची शिक्षा दिवसानुदिवस कमती होत चालली आहे. याचें कारण मालासंबंधी अपराध कमी घडतात व फटक्याची शिक्षा देण्याचा थर्ड क्लास माजिस्त्रटांना अधिकार नाहीं हें असावें.

या सालीं ८८०० मनुष्यांना दंडाची शिक्षा झाली, गुदस्त सालीं ७७९८ वांना झाली होती. गुदस्त सालीं दंडाची रकम ६६५२२ रुपये होती, या सालीं रुपये ९२१४५ झाली. व त्यापैकीं वसूल रुपये ५४४४७ झाला आहे. जुडिशियल कमिशनर साहेबांनीं ह्मटलें आहे कीं दंडाच्या रकमा फार मोठाल्या झाल्यावरून बाकी येणें राहिली. पण मोठी ह्मणण्यासारखी रकम सेशन जडज्याकडून काय ती एकच झाली आहे ( व ती सर्वांस माहित असेलच, नारायण महिपत नाजर याजकडील १९७१७ रुपये ) याचा रेसिडेंट साहेबांनीं उल्लेख करून ह्मटलें आहे कीं तेवढी गो-

ष्ट बाजूस ठेऊन पाहिलें असतां या सालीं दंडाची रकम ह्मणण्यासारखी फार नाहीं गुदस्त सालची सरासरी दर इसमास ८ रुपये होती व या सालची १० रुपये झाली आहे.

खालंच प्रतीच्या माजिस्त्रेटांनीं ९०५६ मनुष्यांस त्यांचे अपराधाकरितां शिक्षा दिल्या त्यापैकीं १७९ नीं मात्र अपिलें केलीं. यावरून ताब्यांतील अव्वल कोर्टें काम फार चांगलें करितात असें रेसिडेंट साहेबांनीं ह्मटलें आहे. झाल्या अपिलांतूनही शेकडा ४६ त मूळच्या शिक्षा कायम राहिल्या, १७ त कमी झाल्या, १७ त बदल झाल्या, व १९ त रद्द झाल्या.

जुडिशियल कमिशनर साहेबांकडे अपीलें ६३ झालीं, त्यांत ४१ नामंजूर झालीं, ९ त मूळ शिक्षा कायम राहिल्या, २ त कमी झाल्या, ११ त बदल झाल्या, यावरून फर्स्ट क्लास माजिस्त्रेटांनीं ही कामें चांगलीं केलीं असें रेसिडेंट साहेब ह्मणतात.

याप्रमाणें फौजदारी शाखेची माहिती आहे. हिलाच वर्तमानपत्राचा पुष्कळ भाग खर्च झाला व वाचणारेही कंटाळतील ह्मणून दिवाणी भाग अशाच विस्तृत आहे तो पुढील आठवड्यापर्यंत तकूब ठेवितों.

## वऱ्हाड.

सर सालरजंग साहेब दिवा[illegible]च्या विलायतच्या सफरीस ३० लक्ष रु. खर्च आला असें समजतें.

एका वर्तमानपत्रांत अशी एक कल्पना निघाली आहे कीं दिल्लीस महाराणी साहेबांच्या नवीन पदधारणाविषयीं जो भव्य समारंभ होणार तसा मागें कित्येक वर्षें झाला नाहीं. व पुढें होणार नाहीं; तर अशा अपूर्व प्रसंगीं महाराणी साहेब कृपाळू होऊन निजाम सरकारास वऱ्हाड प्रांत परत देतील तर ती मोठी स्मारक गोष्ट होईल. व इतर राजे रजवाड्यांची महाराणी साहेबांवरील निष्ठा दृढ होईल व त्यांचें प्रेम वाढेल.

कारंजें एथें ग्रामस्थांनीं शाळेला मदत करण्याकरितां ६० रुपये दिले व तितक्यांचीं पुस्तकें घेऊन वार्षिक पुस्तकें वाटण्याचे समारंभास गावकऱ्यांनीं हींहि पुस्तकें तारीख १९ रोजीं मुलांस वाटलीं. समारंभ फार चांगला झाला. ही शाळाही चांगल्या स्थितींत आहे. रा. रा. पुरुषोत्तम गणेश केळकर हेड मास्तर हे हुशार असून लोकप्रिय आहेत व लोकांची आस्था व द्रव्य अशा उत्तम मार्गांनीं ते विद्येकडे ओढून घेत आहेत हें पाहून आह्मास संतोष वाटतो.

यवतमाळाकडे गेल्या पावसानें नदीला पूर येऊन १०।१२ गाव मिळून २००० घरें वाव्हलीं. तशा प्रसंगीं कित्येक गावीं देशमुखांच्या मोठाल्या गढ्यांचा फार उपयोग झाला. त्यांनीं गावांतील सर्व मनुष्यें व जनावरें सुद्धां आपल्या गढींत आश्रयास घेतलीं होतीं.

देऊळगावराजा एथील श्री बालाजीची यात्रा जवळ आली. बुलढाण्याहून बंदोबस्ताकरितां रा. रा. श्रीकृष्ण नरहर एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर व रा. रा. बलदेवसिंव्ह पोलिस इन्स्पेक्टर गेल्या आठवड्यांत तिकडे गेले.

रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर यवतमाळाहून एथें येऊन आपले कामावर रुजू झाले.

रा. रा. वामनराव महादेव कोल्टकर नागपुरच्या विद्याखात्याचे हेड क्लार्क व क्युरेटर शुक्रवारीं परत गेले. व त्यांनीं तेरा चवदा महिन्यांची रजा घेतली होती ती पुरी झाली. आतां उदईक ते आपले कामावर रुजू होतील.

डा० आबट साहेब स्यानिटरी कमिशनर रजेवरून गेले रविवारीं परत येऊन आपले कामावर रुजू झाले.

मि. मोफट साहेब असिस्टंट पोलिस सुपरइंटेंडेंट हे क्या. जेमिसन साहेब यांचे जाण्यानें थर्ड क्लास पोलिस सुपरइंटेंडेंट झाले.

इलिचपुरच्या लोकलफंड इंजिनियर आफिसांत[illegible] २९ [illegible]ची गडबड चालू आहे असें ऐ[illegible] हीं क्लार्क बरतर्फ केले, त्यांतून पुन्हा [illegible]मावर लाविलें, बहिरव प्रसाद स्टोर्स कीपर वा बरतर्फ केला व गेल्या आठवड्यांत त्याला कैद केलें तेव्हां लबाडीच्या पुष्कळ गोष्टी उघडीस आल्या. त्याचे घरांत बराच माल निघाला. कित्येक मजूर व गाड्या कामावर लाविल्या नसतां त्याजबद्दल पगार विलात आकारून तो आफिसांतले लोक वाटून घेत असत असें ही समजलें आहे.

व. मि

पुढील महिन्याचे पहिले तारखेपासून वऱ्हाडांतील स्टांप कागदावर स्टांप सुप्रिटेंडेंटची सही असते ती बंद होऊन "रेसिडंटस आफिस हैदराबाद" इतकी अक्षरें त्यांवर असत जातील असा ठराव झाला आहे.

खामगावचे स्मालकाज जडज यांस अकोला तालुक्यांत ५००० रुपया पर्यंतचे दिवाणी दावे पहाण्याचा ५ वे यत्तेचे सबार्डिनेट जडजाचा अधिकार दिला.

असिस्टट कमिशनर, व एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांच्या परीक्षा आक्टोबरचे २५वे तारखेस उमरावतीस होणार- परीक्षेला प्रेसिडेंट कर्नल नेंभार्ड साहेब व मेंबर पोलिस इन्स्पेक्टर जनरल, उमरावतीचे डिपुटी कमिशनर, व विद्याखात्याचे डायरेक्टर हे आहेत.

मूर्तिजापूर आणि चांदुर तालुक्यांतील ५० रुपयांचे आंतील दावे उमरावतीच्या स्मालकाजकोर्टाकडे दिले चांदुरगाव यांत सामील नाहीं.

## वर्तमानसार

**सन्याशाचा मुर्दा**—मद्रासइलाख्यांत मि. वेल्ड असि० माजिस्त्रेट यानें एका सन्याशाचा मुर्दा उकरून काढिल्यावरून सर्व ब्राह्मणांनीं सरकारास अर्ज केला त्यावरून सरकारानें मि० वेल्ड यांस दोन महिने सस्पिंड करून ब्राह्मणांची क्षमा मागावी असा हुकूम केला. व मुर्दा पुन्हा पुरण्याकरितां ८०० रुपये खर्चास दिले.

बडोदा रेलवेचा नर्मदा नदीचा पूल वाहून गेला तो मजबूद कमी नव्हता. पाण्याच्या खालीं चाळीस चाळीस फूट त्याचे खांब गाडले होते व पाण्यांत आणि वरती मिळून ६० फुटांहून अधिक त्यांची उंची होती. नर्मदेंत ओहोटीच्या वेळेला १७ फूट पाणी असते तें भरतीच्या वेळेला २९ फुट होतें. सन १८६५ सालीं पूर आला होता तेव्हां ३८ फूट पाणी चढलें होतें, सन १८७१त ४७ फूट, व सन १८७६त ५४ फूट आणि गेल्या महिन्यांत जो मोठा पूर आला त्यावेळीं ५९ फूट पाणी चढलें होतें. तरी पाण्याच्यावर ४ फूट पूल मोकळा होता. अशा प्रचंड कामास धक्का बसला ही दुर्दैवाची गोष्ट ह्मणावयाची. आतां कोणत्या तऱ्हेचा व किती उंच पूल बांधण्याचा त्याचा विचार चालला आहे. नदीवरील कामीं बोटी ठेवून ८०० कोळी लोक ठेविले आहेत. साबरमतीचा पूल गुदस्त सालीं पडलेला ५॥ महिन्यांत या कंपनीनें बांधून तयार केला व तो पहिल्याहून ५ फूट अधिक उंच व २४० फूट अधिक लांब केला. त्याचप्रमाणें याचेंही काम पहिल्याहून मोठें व लवकर होईल यांत संशय नाहीं.

मुंबईचे हल्लीचे गवरनर सर फिलिप वोडहौस येत्या मार्च महिन्यांत चाकरी सोडून जाणार व त्यांचे जागेवर सर बार्टल फ्रियर साहेब पुन्हा येणार असें वर्तमान आलें आहे. फ्रियर साहेब दिल्लीच्या दरबाराकरितां डिसेंबरांतच एथें येणार व ते परत जाणार नाहींत असें ह्मणतात.

टर्की व सर्व्हियन लोकांची लढायी १० दिवस तकूब झाली आहे. तहाचें बोलणें चालू आहे. व सर्व्हियन लोकांनीं प्रिन्स मिलनयास सर्व्हियाचा राजा करून जाहिरनामेही फिरावेले. पुढें काय होतें पहावें. रशियन शिपाई सर्व्हियन लोकांना वरचेवर मिळतच आहेत.

बडोदा रेलवेचें टाईमटेबल पहिले तारखेपासून बदलणार. मेलट्रेन रात्रीं ९ वाजतां मुंबईहून निघून १२॥ वाजतां अमदाबादेस पोंचेल.

पोस्टाकडे नवीन सहा व बारा आण्याचे स्टांप निघाले आहेत ते विक्रीस तयार आहेत असें पोस्ट खात्याचे डायरेक्टर जनरल यांनीं प्रसिद्ध केलें आहे.

डाका एथील एकानें खबर लिहिली आहे कीं, तथें ब्राह्मणाच्या मुली महाग झाल्या आहेत. एका मुलीचे बापानें तीन जावयांचें मागणें कबूल केलें व एकाचा पैसाही घेऊन त्याला मुलगी दिली नाहीं ह्मणून जावयानें सासऱ्यावर मुलगी द्यावी किंवा रुपये द्यावे ह्मणून फिर्याद केली आहे.

कै० डाक्टर भाऊ दाजीचे चिरंजीव रा. रा. विठ्ठल भाऊ यांजवर कोणी अंबिकाबाई नावाच्या स्त्रीनें फिर्याद केली कीं मी यांचे वडिलांजवळ ४३४७ रुपयांची ठेव ठेवलेली मला परत मिळावी विठ्ठल भाऊ फिर्यादीचा उत्तरपक्ष चालविण्यास हजर नव्हते. हायकोर्टाचे जडज जास्टिस पिन्ही साहेब यांनीं खर्चासुद्धां व व्याज सुद्धां ठेवीचे रुपये देण्याचा ठराव केला.

बडोदा रेलवेच्या गाडींतून एक पारशी मुंबईस येत असतां वाटेंत एका स्टेशनावर मेलेला आढळला. मग त्याचें प्रेत तेथेंच उतरून काढिलें.

तारीख ७ मिनहूस समाप्त होणाऱ्या आठवड्याचा हिंदुस्थानांतलि पावसाच्या व पिकाच्या स्थितिविषयींचा रिपोर्ट— मद्रास इलाख्यांत कर्नुल आणि मधुरा खेरीज करून स्थिति चांगली आहे. सिंध प्रांतांत नदीला पाणी पुष्कळ आलें असून पुरामुळें कांहीं नुकसान झाल्याची नर्दी आहे- गुजराथेंत मोठा पाऊस पडून भडोचेस महापूर आला होता. खानदेश आणि नासिक एथें पाऊस जरी कमी आहे तरी स्थिति अनहितावह अशी नाहीं; देशावर आणि दक्षिण महाराष्ट्र देशांत अधिक पावसाची अतिशय जरूर आहे, स्थिति चांगली नाहीं. वऱ्हाड मध्यप्रांत, आणि मध्यहिंदुस्थानात विपुल पाऊस पडला; माळव्यांत उघाडी पडून स्वच्छ हवा होईल तर बरें असें झालें आहे, दुसरीकडे स्थिति चांगली आहे. रजपुतान्यांत आलवार खेरीज करून चोंहीकडे चांगला पाऊस पडला स्थिति चांगली आहे. बंगाल्यांत सर्वत्र पाऊस झाला, पूर्वेकडील व मध्यप्रांतांतील कांहीं भागांत फारच पाऊस पडला परंतु बहार प्रांतांत साधारण पडला; स्थिति चांगली आहे, परंतु बहार आणि ओरिसा प्रांतांत तांदुळाच्या पिकाकरितां थोडेंशा पावसाची जरूर आहे. वायव्य आणि अयोध्या प्रांतांत साधारण पाऊस आहे, कांहीं भागांत तहकुबीमुळें उपद्रव होत आहे अंबाला खेरीज करून पंजाब प्रांतांत फारच थोडा पाऊस पडला; हिसार खेरीज करून स्थिति चांगली आहे. आसामांत पिकाची उमेद चांगली आहे. ब्रह्मदेशांत पुष्कळ पाऊस पडला व हितावह रिपोर्ट आहेत, म्हैसुर प्रांताच्या भागांत कांहीं पाऊस पडला, परंतु बहुतेक डिस्ट्रिक्टांत स्थिति चांगली नाहीं.

मुंबई इलाख्यांत विशेष हकीकत — रत्नागिरी— हळवे भात व नागलीचे रोपे कणसास आले आहेत, पीक मध्यम चांगलें आहे. कुलाबा— नुकत्याच पडलेल्या पाऊसानें पिकास बराच उपयोग झाला; अधिकाची जरूर आहे; तुरळक वाख्याचा उपद्रव आहे. बडोदें—अतिशय पावसानें कपाशीच्या पिकास थोडी इजा पोंचली बाकीचीं पिकें बरीं आहेत. कलादगी— पाऊस नाहीं, अधिकाची विशेष जरूर आहे; शेतें सुकून गेलीं आहेत. धारवाड—पाऊसावाचून कपाशीच्या पेरण्या होणें राहिल्या आहेत, इतर पिकांचीही स्थिति बरी नाहीं, लोकांस उद्योग नसल्यामुळें उपाशीं मरत आहेत. सोलापुराकडेही हीच स्थिति झाली आहे.

अमेरिकेमध्यें सर्व गिरण्यांत मिळून एकंदर चात्या ९९,३९,३६४ चालतात असें समजतें.

युनैटेड स्टेट्स देशास एकंदर पांचशें कोटि रुपये कर्ज आहे असें कळतें.

बडोद्याचे पोलिस सुपरिन्टेंडेंट मि० तक्क हे गेल्या सोमवारीं मल्हारराव गायकवाड यांच्या रहाण्याच्या बंगल्याची व्यवस्था पहाण्याकरितां गेले.

कामठी एथील पूर— आमचे कामठी एथील एक बातमीदार परवांच्या पुरवणींत असें लिहितात कीं, ता. ४ चे रात्रीं कन्हान नदीस मोठा पूर आला तेणेंकरून कामठी एथील ४,९३० ह्मणजे सुमारें पांच हजार घरें जमीनदोस्त झालीं व लोकांचा अजमासें पांच सहा लक्ष रुपयांचा नाश झाला असावा. या शिवाय या नदीच्या कांठांनीं जीं गांवें होतीं तीं बहुतकरून येथें बहुत वाहून गेलीं. कामठी एथें सकाळीं पहाटेस पूर आला या कारणानें मनुष्यें मात्र फार दगावलीं नाहींत. अजमासें २९ मनुष्यें मेलीं असावीं; परंतु ज्या गांवीं रात्रीं पूर आला तेथील मनुष्यें मात्र पुष्कळ दगावलीं अशी बातमी आहे कामठी एथील कचेरी पडून कागदांचा बराच नाश झाला.

कलकत्ता स्टेट्स्मनकर्ते एतद्देशीय लोकांस जज्जांच्या जागा देण्याविषयीं आवश्यकता दाखवितात. तसेंच त्यांस फिनान्शियल खात्यांत ह्मणजे हिशेबाच्या खात्यांत जागा देण्यास हरकत नाहीं ह्मणतात. परंतु कलेक्टर व माजिस्ट्रेटच्या जागा मात्र त्यांस देऊं नयेत ह्मणून ह्मणतात.

रशियाचें सामर्थ्य— गोलोस पत्रावरून असें समजतें कीं पूर्वींपेक्षां रशियाचें सामर्थ्य फार वाढलें आहे. सन १८५३ साली रशियाजवळ ६,००,००० लोक व १११२ तोफा होत्या परंतु आतां स्वस्थतेच्या वेळेकरितां २,६७० तोफा व १३,४०,००० लोक आहेत व लढाईच्या प्रसंगीं पंचवीस लक्ष लोक जमा होण्याची योजना केली आहे असें समजतें. ई. प्र.

मुंबई इन्फन्टरी ट्रेनिंग कालेजांत न शिकलेले असे जे लोक १८६९ साला नंतर शाळखात्यांत शिक्षकांच्या कामावर लागले असतील त्यास चाकरीवरून काढून टाकण्याचा ठराव झाला आहे असें ह्मणतात.

टर्कीच्या लोकांनीं सर्वियन संस्थानांतील कित्येक गांवें जाळलीं वगैरे प्रकारच्या टर्कीच्या क्रूरपणाच्या ज्या गोष्टी बाहेर आल्या आहेत त्या खोट्या असून लढाईच्या प्रसंगीं अपवादानें तसा कांहीं प्रकार झाला असेल, पण मुद्दाम तसें करण्यांत येत नाहीं इतकेंच नव्हे. तर उलट सर्वियन लोकांनीं मात्र आजपर्यंत ६० गांवें जाळून टाकलीं असें इंग्लंडांत असणाऱ्या टर्कीच्या वकिलानें तेथील वर्तमानपत्रास कळविलें आहे.

हिंदुस्थानांतील पैसा विलायतेस नेण्यास हल्लीं हुंडीचा खर्च फार लागू लागल्यामुळें हिंदुस्थान सरकारास दरसाल लागणारी स्टेशनरी जितकी हिंदुस्थानांत उत्पन्न होणारी घेतां येईल तितकी घ्यावी असा स्टेट से. यांचा हुकूम असून त्याबद्दल तजवीजही चालू आहे. दरसाल स्टेशनरीकरतां किती पैसा विलायतेस जातो हें तीन वर्षांचे आकडे पुढें दिले आहेत त्यावरून समजेल:—

| | | |
|---|---|---|
| १८७३ साली | ७,१९,०६० | रु. |
| १८७४ ,, | १९,८०,४९० | रु. |
| १८७५ ,, | ११,२२,०२ | रु. |

अ. ह.

## युरोपियनाची चाकरी

फुलर यानें आग्रा एथें आपला घोडेवाला मारल्यावर आणखीं कितीएक तशीच प्रकरणें घडल्याविषयीं वर्तमानपत्रांत आमच्या वाचण्यांत आलीं. कराचीकडे एका युरोपियनानें एक मनुष्य मारला, सागर एथें एका सोजरानें एक पंखेवाला मारला, बंगाल्यांत चहाची लागवड करणाऱ्या एका युरोपियनानें एका मनुष्यास मारलें, लंकेंत काफीची लागवड करणाऱ्या एका गोऱ्या शेतकऱ्यानें एका मनुष्यास फार क्रूरपणानें मारहाण करून ठार मारलें; इत्यादिकांतून कितीएक गुन्हेगारांस फार हलक्या शिक्षा झाल्या. एका प्रकरणांत तर लार्ड लिटन यांस फुलर प्रकरणाप्रमाणें फिरून लिहावें लागलें. यावरून आह्मास वाटतें कीं, कोणी नेटिव लोकांनीं युरोपियन लोकांच्या खासगी चाकरास राहूंच नये. त्यांतून बहुतक नांवाचे मात्र ख्रिस्ती असतात. त्यांच्यांतून फार थोडे खरे ख्रिस्ती असतात, ह्मणून ते कोणत्या वेळीं काय करतील याचा नेम नाहीं. अशांची चाकरी करून जिवास मुकावें त्यापेक्षां निकामें राहून भीक मागणें किंवा उपास काढून मरणें बरें. जर युरोपियनांची चाकरी करावयाचीच तर जे चांगले ख्रिस्ती किंवा सभ्य व दयाळू असून चाकरांच्या किंवा दुसऱ्या कोणाच्या अंगावर कधीं हात टाकीत नसतात अशी ज्यांची खरोखर कीर्ति असेल त्यांचीच चाकरी धरावी. सरकारी नौकरी धरली असतां युरोपियनांच्या हातचा मार खावा लागणार नाहीं असें जरी ह्मणवत नाहीं, तरी त्याविषयीं आह्मी एथें कांहीं लिहित नाहीं पण साहेब लोकांची खासगी चाकरी धरण्याविषयीं आमच्या गरीब अशक्त नेटिव लोकांनीं जपेल तितकें जपावें. ज्यांस आपल्या जिवाची कांहीं परवाच नसेल, किंवा ज्यांस जीव जड झाला असेल किंवा राज्यकर्त्यांच्या जातीच्या लोकांच्या हातून मेलें असतां मोक्षप्राप्ति होते असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं खुशाल कोणाचीही चाकरी धरावी. बाकीच्यांनीं फार संभाळावें आणि युरोपियनांची चाकरी करण्याशिवाय पोट भरत नसेल तर पोटांत कांट्या भराव्या हें बरें असें समजावें. ज्ञा. द.

## परस्पर बंधुसेवा.

हेवा, मत्सर, लोभ, द्वेष, अभिमान वगैरे आपले मनोविकार हे एकमेकांशीं बंधुभावाच्या नात्यानें वागण्यास अडथळा करितात, आणि ईश्वराचें कुटुंब यांत सुख व शांति होऊं देत नाहींत. आपली बंधुप्रीति केवढी झाली तरी अशाच नीचांच्या किंवा परीक्षेच्या वेळीं टिकणें फार कठीण आहे. सदरहू मनोविकारांतून एकादा प्रबळ होऊन बंधुप्रीतीच्या उलट त्याचा ओघ असतो तेव्हां त्याचा प्रतिकार करण्यास ती प्रीति समर्थ होत नाहीं. कोणता मनोविकार आड येत नसला ह्मणजे आपण एकमेकांविषयीं अत्यंत प्रेम दाखवूं; परंतु आपल्या बंधुजनांविषयीं आपल्या मनांत मत्सर किंवा राग उत्पन्न झाला ह्मणजे लागलेंच तें प्रेम जाऊन त्याच्या ठिकाणीं द्वेषभाव आणि वैर उत्पन्न होतें. आपण मंदिरांत सर्व एकत्र बसून एका परमेश्वराची आराधना करितों अशा समयीं आपण सर्व एका पित्याचीं लेकरें आहों आणि परस्पर भावंडें आहों असें सहजच आपणास भासतें. परंतु मंदिरांतून निघून गेल्यानंतर गांवांत कामकाजाच्या संबंधानें आपली गांठ पडते तेव्हां आपणास बंधुभावाच्या नात्याचा विसर पाडण्यास आणि एकमेकांवर चिडविण्यास हजारो कारणें प्रतिदिवशीं घडतात. कोणी आमची मानहानि करण्यास कांहीं करितात, कोणी आमचा अपमान करितात, कोणी आमच्या फायद्याच्या आड येऊन आह्मांस राग आणितात. अशा प्रसंगीं बंधुप्रीतीची परीक्षा होते. आणि अशा प्रसंगीं ह्मणजे आमचें कांहीं नुकसान अथवा मानभंग होत आहे तेव्हां देखील आमच्यानें जर एकमेकांवर प्रीति करवत नाहीं आणि शांति धरवत नाहीं तर बंधु ह्या नावास आह्मी योग्य नाहीं. ह्याले तर मोठी जबाबदारी आहे. वल. असें दर्शविणारानें परमेश्वराच्या संबंधाच्या या सर्व बालकांची सेवा [illegible] विनंती सिद्ध असलें पाहिजे. ती सेवा आपल्या मनास मानेल अशी असेल तर मात्र करावयाची असें नव्हे, तर जिणें आपलें नुकसान होणार, आपला मानभंग होणार, आपल्याकडे अगदीं नीचपणा येणार अशीही सेवा केली पाहिजे. आपण एकमेकांविषयीं जी प्रीति बाळगली पाहिजे ती अति गरीबीची व लीनतेची असली पाहिजे. ती गरीब सेवक धन्याविषयीं जशी मर्यादापूर्वक प्रीति बाळगतो तशी असली पाहिजे, धनी सेवकाविषयीं बाळगतो तशी नये कामा. आमचें परस्पर नातें बंधूचें आहे खरें, परंतु तें सेवक धनी यांचेंही आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. इतर लोक आह्मांस मान आणि थोरपणा देतात तेव्हां ही आपण त्यांचे गरीब व नम्र सेवक आहों हें स्मरलें पाहिजे. कारण जे कोणी नम्रतेनें चालतात तेच मोठेपणा पावतात खरें पौरुष इतरांवर धनी ह्मणून सत्ता चालवणें यांत नाहीं, तर गरीब सेवक ह्मणून इतरांची सेवा करणें यांत आहे. तर आपण मोठा अधिकार मिळविण्यापेक्षां, अंगीं लीनता व गरिबी आणणें याविषयीं उमेद धरावी, आणि उद्योग करावा हें उचित होय. आपला परमवत्सल जो पिता त्यास जो कोणी आपल्या बंधुजनांच्या पायांजवळ बसतो तो आवडतो, जो कोणी त्यांवर अहंतेनें अधिकार चालवतो तो आवडत नाहीं. इतरांची सेवा करणें हें प्रथम कठीण वाटेल, परंतु आपलें कर्तव्य आणि आवड हीं जसजशीं एक होत जातील तसतसें तें सोपें आणि सुखकारकही होत जाईल. सु. प.

## जाहिरात


BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव एथील मुंबई ब्यांकिची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्यास तयार आहे. व त्याबद्दलच्या शर्तींची माहिती खामगांव एथील ब्यांकिचे आफिसास अर्ज केला असतां मिळेल.

खामगाव तारीख १४ माहे सप्तंबर सन १८७६ इसवी.

Harry H. Hynes.
Agent.


## न्यायप्रकाश


सदरहू मासिक पुस्तकांत इंडियन लॉ रिपोर्टांत प्रसिद्ध झालेले सर्व हायकोर्टांचे निवाड्यांचें मराठींत हशील, मुंबई हायकोर्टाचें सविस्तर व इतर हायकोर्टांचे थोडक्यांत देण्यांत येईल. शिवाय कायद्यासंबंधी विषयांचें विवेचन सवडीप्रमाणें करण्यांत येईल. इंग्रजी अंकाचे मानानें या मासिक पुस्तकाचीं पानें ३० पासून ४० होतील. वर्षाची अगाऊ किंमत दोन महिन्यांचे आंत देणारास रुपये ४॥८ व शिवाय टपाल हशील ०॥६. मागाहून देणारास टपालहाशिलासुद्धां ७ रुपये.

अहमदनगर ३० जुलई १८७६.

रामचंद्र कृष्ण जोशी.
शंकर रामचंद्र हतवळणे.
न्यायप्रकाशकर्ते अहमदनगर


## नोटिस
## जलम आणि खामगाव स्टेट रेल्वे.


लारी जाणें येणें.

या नोटिसीवरून सर्वांस कळावें कीं जी. आय. पी. रेल्वेची आगगाडी जाण्याचे व येण्याचे धोरणानें जलम आणि खामगाव यांचे दरम्यान दररोज लारी नेण्या आणण्याचें काम चालविलें जाईल. त्यावरून प्यासेंजर ( उतरकरू ) यांस बसविलें जाईल. त्याचा आकार खालीं लिहिल्याप्रमाणें.

फर्स्ट क्लास ..................... १ रुपया
नेटिव लोक .... ................ ४ आणे

मालाचे लारींतून कोणास माल पाठवावयाचा असेल तर दर मणास एक आणा घेऊन माल आणला अगर पोंचविला जाईल.

धान्याचे पोत्यास दोन आणे घेतले जातील.

घाऊक मालाकरितां विशेष रीतीची वेगळी व्यवस्था केली जाईल.

वरील दरांत कार्टिंग ह्मणजे बैल गाडीनें माल पोचविण्याचा खर्चही दाखल आहे.

माल पाठवावयाचा तो लारी कंत्राक्टर यांच्या नावानें पाठवावा.


हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांनी वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.